Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १७३ * * नागपूर *

रविवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## मणिपूरमध्ये हिंसाचार, मैतेई गावात गोळीबार

■ वृत्तसंस्था, इंफाळ, दि. २८:
मणिपूरच्या जिरिबाम जिल्ह्यात शनिवार, २८ सप्टेंबर रोजी पुन्हा हिंसाचार उसळ्ला. पोलिसांनी सांगितले की, जिरीबामच्या मोंगबुंग मैतेई गावात संशयित हल्लेखोरांनी अंदाधुंद गोळीबार केला. गावातील स्वयंसेवकांनी प्रत्युत्तर दिले. सध्या गोळीबार सुरू आहे.

दुसरीकडे, चुराचांदपूर आणि कांगपोकपी जिल्ह्यात आज बंदचा दुसरा दिवस आहे. त्यामुळे बाजारपेठा बंद होत्या. रस्ते निर्जन दिसत होते. कुकी-जो गटांनी रविवार, २९ सप्टेंबरपर्यंत दोन्ही जिल्ह्यांत बंदची हाक दिली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. म्यानमारमधील ९०० कुकी अतिरेकी मणिपूरमध्ये घुसल्याचा दावा कुलदीप सिंग यांनी केला होता.

## थोडक्यात

### हिजबुल्ला प्रमुख नसराल्लाह ठार




■ नवी दिल्ली : इस्त्रायलच्या हल्ल्यात हिजबुल्लाहचा प्रमुख हसन नसराल्लाह मारला गेला आहे. इस्त्रायलच्या संरक्षण दलाने शनिवारी हा दावा केला. टाईम्स ऑफ इस्त्रायलच्या वृत्तानुसार, त्यांनी २७ सप्टेंबर रोजी लेबनीज राजधानी बेरूतमधील हिजबुल्लाच्या मुख्यालयावर बंकर बस्टर बॉम्बने हवाई हल्ला केला, जेथे नसराल्ला देखील उपस्थित होता.
आयडीएफने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर लिहिले की, जगाला आता नसरल्लाहला घाबरण्याची गरज नाही. तो दहशत पसरवू शकणार नाही. दुसरीकडे, इस्त्रायली लष्कराने बेरूतसह लेबनॉनमधील अनेक भागांवर क्षेपणास्त्र हल्ले सुरूच ठेवले आहेत.

### मोदी गोहत्या एजंट : शंकराचार्य

■ अंबिकापूर : छत्तीसगडच्या अंबिकापूर येथील पुरी पीठाचे शंकराचार्य स्वामी निश्चलानंद सरस्वती म्हणाले की, गोरक्षणासाठी आलेले मोदी हे गोहत्येचे एजंट झाले आहेत. गोरक्षणाच्या नावाखाली पंतप्रधान झाले. पंतप्रधान झाल्यानंतर ते गोरक्षकांना गुंड म्हणतात.



शंकराचार्य स्वामी निश्चलानंद म्हणाले की, ते पंतप्रधानपदापर्यंत पोहोचले, पण त्यांना मर्यादेचे ज्ञान राखत नाही. त्यांनी रामलल्लाच्या मूर्तीला अपमानास्पद रीतीने अभिषेक केला. या कारणाने त्यांची घसरणही होत आहे. ते जिथे गेले तिथे भाजपचा सफाया झाला. जय श्री राम म्हणायला विसरले. आधी मोदींची गॅरंटी म्हणायचे, आता नितीश-नायडूंच्या कुबड्यांवर असल्याची टीकाही त्यांनी केली.

### फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट मुलासह ३ जिवंत जळाले

■ सोनीपत : हरियाणातील सोनीपतमध्ये बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या फटाक्यांच्या कारखान्यात भीषण आग लागली. या आगीत ३ जणांचा मृत्यू झाला आहे. आतापर्यंत ३ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. यापैकी एक मृतदेह गावातील महिलेचा, दुसरा मुलाचा आणि तिसरा दुसऱ्या महिलेचा आहे.
कारखान्यात भीषण स्फोट झाल्यानंतर गावकऱ्यांना अपघाताची माहिती मिळाली. स्फोटामुळे लगतच्या घरांच्या भिंतींना तडे गेले. ज्या घरामध्ये फटाके बनवले जात होते ते घरही कोसळले आणि कामगार ढिगाऱ्याखाली गाडले गेले. येथे १०-१२ मजूर काम करत होते.
या अपघातात सहा महिलांसह सात जण गंभीररित्या भाजले. जळालेल्या मजुरांना रोहतक पीजीआयमध्ये पाठवण्यात आले आहे. गॅस सिलिंडरमधील गळतीमुळे ही आग लागली. हे घर गावाच्या मधोमध असून त्याचा ढिगारा हटविण्याचे काम सुरू आहे.

# निवडणुकीपूर्वी सरकारने उघडली तिजोरी
# २७३ आमदारांना २१८ कोटी विकासनिधी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८:
पुढच्या १० ते १५ दिवसांत राज्यात विधानसभा निवडणूक जाहीर होऊन आचारसंहिता लागण्याची चिन्हे आहेत. या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने राज्यातील २७३ आमदारांचा थकलेला २१८.४० कोटींचा विकास निधीचे वाटप करून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.
त्यामुळे आता हा निधी पदरात पडताच सर्वच मतदारसंघांत पुढील ८ ते १० दिवसांत हा निधी खर्च करण्यासाठी विकास कामांचा धडाका लावला जाण्याची शक्यता आहे.



राजकीय अर्थव्यवस्थेला चालना
सर्वाधिक २७ कोटी मुंबईला
पुणे १६ तर ठाण्याला १४ कोटी

### सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचीही चांदी

आमदारांना निधी प्राप्त झाला की पुढील दोन- चार दिवसांत ते या निधीतून करावयाची कामे फायनल करतील. अलीकडे आमदारांजवळ ठेकेदार कार्यकर्ते वाढल्याने सर्वांच्याच पदरात कामे पडतात असे होत नाही. त्यामुळे नाराजी वाढत जाते. मात्र गेल्या ५ वर्षांत ज्यांना कमी कामे मिळाली, अशांची छाननी करून आमदार नाराज कार्यकर्त्यांना कामे देऊन खुश करतील. या निधीतून झालेल्या कमाईचा भाग निवडणूक खर्चासाठीही वापरला जाईल.

यात सर्वाधिक २७ कोटी निधी मुंबई शहर व उपनगरातील ३४ आमदारांना, त्यापाठोपाठ अर्थमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या पुणे जिल्ह्यातील २१ आमदारांना १६.८० कोटी तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातील १८ आमदारांना १४.४० कोटी रुपयांच्या निधीचे वाटप करण्यात आले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर जिल्ह्याला मात्र फक्त ८ कोटींचाच निधी मिळाला.
निधीवाटपात सरकार भेदभाव करत असल्याचा आरोप विरोधी पक्षातील आमदार कायम करत असतात. आता निवडणुकीच्या तोंडावर ही तक्रार येऊ नये म्हणून सरकारने त्यांचीही नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. यात प्रामुख्याने विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे (ठाकरे गट), आमदार नितीन राऊत (काँग्रेस), आमदार अस्लम शेख (काँग्रेस, आता अजित पवार गटात), आमदार अबू आझमी (सपा) आणि जितेंद्र आव्हाड (शरद पवार गट) यांनाही विकास निधी देण्यात आला. अपक्ष आमदार हितेंद्र ठाकूर, क्षितिज ठाकूर, गीता जैन यांनाही सरकारने खुश करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

## २६ नोव्हेंबरपूर्वी उडणार राज्यात निवडणुकीचा बार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८:
महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुकीचा फड रंगण्याची चिन्हे आहेत. गत २ दिवसांपासून राज्याच्या दौऱ्यावर आलेल्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पथकाने शनिवारी पत्रकारांशी संवाद साधला.
त्यात त्यांनी विविध राजकीय पक्षांसह निवडणुकीशी संबंधित सर्वच भागिदारांशी झालेल्या चर्चेचा संक्षिप्त तपशील सांगितला. तसेच निवडणुकीची प्रक्रिया विधानसभेचा कार्यकाळ संपुष्टात येण्यापूर्वीच म्हणजे २६ नोव्हेंबरपूर्वी पार पाडण्याचे संकेतही दिले. त्यामुळे पुढील महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे.
या पथकाने शुक्रवारी विविध राजकीय पक्षांशी चर्चा केली. त्यानंतर आज विविध जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक तथा इतर भागिदारांशी चर्चा करून त्यांची निवडणुकीसंबंधीची मते जाणून घेतली. त्यानंतर आयोजित एका पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी तपशील सादर केला.



राजीव कुमार म्हणाले, आम्ही दोन दिवस विविध राजकीय पक्षांसह सर्वच भागिदारांशी चर्चा केली. त्यात सर्वच पक्षांनी सणवार लक्षात घेऊन निवडणुकीची तारीख निश्चित करण्याची विनंती केली.
राजकीय पक्षांनी निवडणुकीची तारीख आठवड्याच्या मध्यभागी ठेवण्याचीही सूचना केली. त्यांची ही सूचना अत्यंत महत्त्वाची आहे. कारण, निवडणुकीची तारीख आठवड्याच्या शेवटी ठेवल्यामुळे शहरी भागातील मतदार सुट्ट्यांचा मेळ साधून शहराबाहेर जातात. त्याचा फटका निवडणुकीच्या टक्केवारीला बसतो. त्यामुळे मतदानाची तारीख आठवड्याच्या मध्यभागी ठेवली जावी अशी त्यांची विनंती होती, असे राजीव कुमार म्हणाले.

### मुंबईत अतिवृष्टीनंतर आता हाय टायड अलर्ट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८:
मुंबईत मुसळधार पावसानंतर आता हाय टाईडचा धोका निर्माण झाला आहे. मुंबईतील मरीन ड्राइव्हवर भरतीच्या लाटा उसळत आहेत. ही परिस्थिती पाहता भारतीय हवामान खात्याने हाय टायड अलर्ट जारी केला आहे. याशिवाय येत्या काही दिवसांत पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांनी वर्तवला आहे.


## दोन दहशतवाद्यांना कंठस्नान
### कुलगाममध्ये चकमक, ४ सुरक्षा कर्मचारी जखमी

■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. २८:
काश्मीरमधील कुलगाममधील आदिगाम देवसर भागात शनिवारी सकाळपासून सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू होती. दुपारी सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांना ठार केले.
या परिसरात दोन-तीन दहशतवादी लपून बसल्याचा संशय होता. लष्कराचे ३ जवान आणि कुलगामचे एएसपी जखमी झाले आहेत. चौघांनाही उपचारासाठी श्रीनगरला हलवण्यात आले आहे. सुरक्षा दलांनी आदिगाममध्ये शोधमोहीम राबवली होती. दरम्यान, दहशतवाद्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला, परिणामी चकमक झाली.
दुसरीकडे, पोलिसांनी शुक्रवारी अवंतीपोरा, पुलवामा येथे एका दहशतवादी मॉड्यूलचा पदार्फाश केला. जैश-ए-मोहम्मदच्या ६ दहशतवादी साथीदारांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून ५ आयईडी, ३० डिटोनेटर्स, आयईडीच्या १७ बॅटरी, २ पिस्तूल, ३ मॅगझिन, २५ राउंड, ४ हातबॉम्ब आणि २० हजार रुपये रोख जप्त करण्यात आले आहेत.



## नवा भारत घरात घुसून मारतो!
### आतंकवादावरून मोदींचे काँग्रेसवर टीकास्त्र

■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. २८:
जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या अंतिम टप्प्यातील प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी, २८ सप्टेंबर रोजी जम्मूमध्ये पोहोचले. एमए स्टेडियमवर विजय संकल्प महारॅलीला संबोधित करताना ते म्हणाले की जम्मू-काश्मीरमध्ये भाजप पूर्ण बहुमताने पहिले सरकार स्थापन करेल हे निश्चित आहे.
पंतप्रधान म्हणाले, 'गेल्या काही दशकांमध्ये येथे फक्त काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीचे नेते आणि कुटुंबे वाढली आहेत. आठवा तो काळ जेव्हा सीमेपलीकडून रोज गोळ्यांचा वर्षाव व्हायचा. तिथून गोळ्या झाडल्या जायचे आणि काँग्रेसचे लोक पांढरे झेंडे दाखवायचे.
भाजप सरकारने गोळ्यांना गोळ्यांनी प्रत्युत्तर दिल्याने दुसऱ्या बाजूचे लोक ठिकाण्यावर आले. आज २८ सप्टेंबर. २०१६ मध्ये आजच्याच रात्री सर्जिकल स्ट्राईक झाला. हा नवा भारत असल्याचे भारताने जगाला सांगितले होते. तो घरात घुसून मारतो.
सप्टेंबरमध्ये जम्मू-काश्मीरमध्ये पंतप्रधान मोदींची ही तिसरी आणि शेवटची निवडणूक रॅली होती. तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात १ ऑक्टोबर रोजी बांदीपोरा, कुपवाडा, बारामुल्ला, उधमपूर, जम्मू, सांबा आणि कठुआ जिल्ह्यातील ४० जागांवर मतदान होणार आहे.



मोदी म्हणाले, 'एक तो दिवस होता आणि एक आजचा आहे. दहशतवाद्यांना माहीत आहे की त्यांनी काही चूक केली तर मोदी त्यांची शिकार नरकातही करतील. आजही काँग्रेस सर्जिकल स्ट्राईकबाबत पाकिस्तानची भाषा करते.
देशासाठी शहीद झालेल्यांचा काँग्रेस कधीही सन्मान करू शकत नाही. ४ दशके काँग्रेसने लष्करी कुटुंबांना वन रँक वन पेन्शनसाठी तळमळत ठेवले. काँग्रेसने आमच्या सैनिकांशी खोटे बोलले.

## निर्मला सीतारामन विरुद्ध एफआयआर?

■ वृत्तसंस्था, बंगळुरू दि. २८:
बंगळुरू येथील विशेष न्यायालयाने अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या विरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले आहेत. अर्थमंत्र्यांवर इलेक्टोरल बाँडद्वारे बळजबरी वसुली करण्याचा आरोप आहे.



जनाधिकार संघर्ष परिषदचे आदर्श अय्यर यांनी बंगळुरूमध्ये तक्रार दाखल करून केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना देण्याची मागणी केली होती.
मीडिया रिपोर्ट्सनुसार, याचिकेवर सुनावणी करताना कोर्टाने बंगळुरूमधील टिळक नगर पोलिस स्टेशनला एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले. पुढील सुनावणी १० ऑक्टोबर रोजी होणार आहे.

## पोलिसांच्या निलंबनासाठी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८:
बदलापूरच्या अक्षय शिंदेंच्या एन्काउंटर प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली असून या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या माध्यमातून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.
या प्रकरणातील पोलिस अधिकाऱ्यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबित ठेवण्यात यावे अशी मागणी देखील याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

अक्षय शिंदे एन्काउंटर



अक्षय शिंदेचे एन्काउंटर फेक असल्याचा आरोप विरोधकांनी देखील केला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने देखील हे एन्काउंटर वाटत नसल्याचे निरीक्षण नोंदवले होते.

## तिसरा हप्ता बँकेत जमा होण्यास सुरुवात

लाडकी बहीण योजना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८:
राज्य सरकारच्या महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा तिसरा हप्ता बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. सरकारने हा हप्ता २९ सप्टेंबरपासून जमा होण्याची घोषणा केली होती. पण तत्पूर्वीच हा हप्ता खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे.
महायुती सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना घोषित केली होती. या योजनेंतर्गत २१ ते ६५ वर्ष वयोगटातील पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात येणार आहे. सरकारने गत महिन्यात जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांचे ३ हजार रुपये महिलांच्या खात्यात वर्ग केले होते.
त्यानंतर आता या योजनेचा तिसरा हप्ताही महिलांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. यासंबंधीचे अनेक मेसेज लाभार्थ्यांच्या मोबाईलवर येऊन आदळलेत. योजनेच्या लाभासाठी दुसऱ्या टप्प्यात नोंदणी करणाऱ्या महिलांच्या खात्यात तीन हप्ते म्हणजे एकूण ४५०० रुपये जमा होत आहेत.

## तीनही भाऊ लबाड, जाधवांची टीका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८:
राज्यात महिलांसाठी सुरू करण्यात आलेली लाडकी बहीण ही योजना नाही तर ती लाडकी खुर्ची योजना आहे. १ कोटी १३ लाख ३२३ महिलांना याचा लाभ मिळणार असून ५ कोटी महिला मात्र वंचित राहणार आहेत. देवा भाऊ, नाथ एकनाथ, दादा असे तिघेही या योजनेचे श्रेय घेत असले तिन्ही भाऊ लबाड आहेत. अशी टीका भास्कर जाधव यांनी केली.



ते नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकारने महिला, शेतकरी आणि युवकांसाठी विविध योजना जाहीर केल्या तरी सर्व योजनाचा त्यांना निवडणुकीत काहीच फायदा होणार नसल्याचे जाधव म्हणाले.

## राष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवावर 'मायेचं पांघरुण'ची मोहोर




माहितीपटात 'सितारमेकर ऑफ मिरज'ची बाजी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २८:
जागतिक पर्यटन दिनानिमित्त पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि परभन्ना फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवात 'मायेचं पांघरूण' या लघुपटाने, तर 'सितार मेकर ऑफ मिरज' या माहितीपटाने बाजी मारली.
लघुपट, माहितीपट, व्ही-लॉग अशा तीन प्रकारात हा महोत्सव झाला. पर्यटन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल पर्यटनतज्ज्ञ डॉ. विश्वास केळकर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र पर्यटन विशेष ठरलेल्या 'मायेचं पांघरूण'ला १० हजारांचे रोख पारितोषिक व इतर सर्व विजेत्यांना मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.
घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्रात हा महोत्सव झाला. ज्येष्ठ अभिनेते माधव अभ्यंकर, अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मीडिया व मास कम्युनिकेशन विभागप्रमख प्रा. डॉ. माधवी रेड्डी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.
प्रसंगी ज्युरी सिमरन जेठवानी, संयोजक व परभन्ना फाउंडेशनचे संस्थापक गणेश चप्पलवार, पर्यटन संचालनालयाचे आनंद जोगदंड, के. अभिजित, सल्लागार जीवराज चोले आदी उपस्थित होते.

## पुण्याची ओळख कोयता गँग!

■ वृत्तसंस्था
पुणे, दि. २८:
पुणे येथील खराडी येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या सभेत बोलताना शरद पवारांनी महायुती सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे.



पुण्याचे वैशिष्ट्य काय? कोयता गँग. टेल्को, बजाज, किर्लोस्करांचे कारखाने हे पुण्याचे वैशिष्ट्य आणि आजच्या राज्यकर्त्यांनी पुण्याचे वैशिष्ट्य काय केले? असा सवाल शरद पवारांनी उपस्थित केला आहे. ते म्हणाले, आज ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनी काय केले पुण्यामध्ये?
मी देशाच्या कामासाठी दिल्लीला जातो, पार्लमेंटचा सभासद आहे म्हणून दिल्लीला जातो. महाराष्ट्राची वर्तमानपत्र मागवून घेतो, टीव्ही लावतो तर काय बघायला मिळते? पुण्याची चौकशी केली तर लोक सांगतात पुण्याचे वैशिष्ट्य काय तर कोयता गँग. मला जर कोणी विचारले आजची पिढी काय करते, मला माहीत नाही. कसल्या तरी गोळ्या खातात मग चंद्रावर गेल्यासारखे वाटते. आजचे राज्यकर्ते कोयता गँग असो, ड्रग्स व्यवहार असो याचा विस्तार पुणे आणि पुण्याच्या आजूबाजूला करत आहेत. यामुळे पुण्याची नवी पिढी ही उद्ध्वस्त होत असल्याचे ते म्हणाले.

## उद्धव ठाकरेंच्या वाट्याला केवळ ४४ जागा?

■ महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि. २८:
वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी जागावाटपाच्या मुद्यावरून विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीत मतभेद निर्माण झाल्याचा दावा केला आहे.
काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने दावा केलेल्या जागांचा आकडा २४४ वर जात आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या वाट्याला केवळ ४४ जागा येत आहेत. यामुळे मविआत गृहकलह निर्माण झाला आहे, असे ते म्हणालेत.
महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यानुसार, सत्ताधारी महायुती व विरोधी बाकावरील महाविकास आघाडीत जागावाटपावर गरमागरम चर्चा सुरू आहे. प्रत्येक पक्ष आपल्या खात्यात अधिकाधिक जागा खेचण्यासाठी प्रयत्नशील आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी जागावाटपाच्या मुद्यावरून महाविकास आघाडीत बेबनाव निर्माण झाल्याचा दावा केला आहे.

### प्रकाश आंबेडकरांचा दावा



प्रकाश आंबेडकर म्हणाले, शरद पवारांनी विधानसभा निवडणुकीत ८८ जागांच्या खाली एकही जागा घेणार नसल्याचा निश्चय केला आहे. उद्धव ठाकरे यांच्या वाट्याला अवघ्या ४४ जागा येत आहेत. त्यामुळे या प्रकरणी मोठा पेचप्रसंग निर्माण होऊन राजकारण होईल. सर्वात मोठी अडचण उद्धव ठाकरेंची होईल.
लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात एक सर्व्हे करण्यात आला. त्यात शिवसेनेच्या ५.३ मतदानापैकी २.७ टक्के मतदान एकनाथ शिंदे यांच्याकडे वळल्याचे समोर आले. काँग्रेसने त्यावर बोट ठेवले. जागावाटपात ठाकरे गटाला झुकते माप न मिळण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. यावरून महाविकास आघाडीत संघर्ष निर्माण झाला आहे.
दुसरीकडे, संजय राऊत यांनी प्रकाश आंबेडकर यांचा मविआत मतभेद निर्माण झाल्याचा दावा फेटाळला आहे.

# मुंबई गोवा महामार्ग येत्या डिसेंबरमध्ये पूर्ण होणार : उदय सामंत

■ महासागर प्रतिनिधी,
रत्नागिरी, दि. २८ :

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम येत्या डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचा विश्वास रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला आहे. मात्र या महामार्गाचे काम पूर्ण होण्यास आनखी दोन वर्ष जातील असे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी यापुर्वीच जाहीर वक्तव्य केले आहे. त्यामुळे मुंबई गोवा महामार्गाचे काम कधी पुर्ण होणार याकडे कोकण वासियांचे लक्ष लागून राहिले आहे. मुंबई गोवा महामार्गाचे काम २०१२ पासूनच सुरू आहे. ठेकेदारांच्या पळपुटेपणामुळे हा महामार्ग रखडला असून त्याला एकच सरकार जबाबदार नाही. असे उद्योगमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.



ते म्हणाले, मुंबई-गोवा महामार्ग हा बीओटी तत्त्वावर बांधला जाणार होता. मात्र, नरेंद्र मोदी हे पंतप्रधान झाल्यानंतर या महामार्गासाठी केंद्र शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे. परंतु, ठेकेदारांच्या पळपुटेपणामुळे हा मार्ग रखडला. केंद्र व राज्य शासनातील मंत्र्यांनीही या मार्गाबाबत अनेकदा खंत व्यक्त केली असताना आपल्यालाही हा महामार्ग लवकर व्हावा, असे वाटत आहे. राष्ट्रवादी पक्षाचे नेते शरद पवार यांनी चिपळूणमध्ये महामार्ग व कामाबाबत शंका व्यक्त केली होती. याबाबत त्यांना चुकीच्या पद्धतीने माहिती पुरवली गेली असावी, अशी सामंत यांनी शंका व्यक्त केली. काहीही झाले तरी विधानसभा निवडणुका महायुती एकत्रच लढणार आहे. यात शंका नाही. महायुतीमधील राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्याशी शिवसेना व भाजपाच्या नेत्यांचे बाँडिंग चांगले असल्याचे मत सामंत यांनी व्यक्त केले.

आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती म्हणूनच सामोरे जाणार आहोत. रत्नागिरी जिल्ह्यात पाचही आमदार हे महायुतीचे विजयी होणार आहेत, असा विश्वास सामंत यांनी व्यक्त केला.

विधानसभेत पुन्हा महायुतीचीच सत्ता येणार असून विधानसभेला शिवसेनेचा स्ट्राईक रेट राज्यात सर्वात जास्त आहे आणि एकनाथ शिंदेंचे नेतृत्व महायुतीने स्वीकारले असून शिंदे यांच्याच नेतृत्त्वाखाली निवडणूका लढल्या जाणार आहेत, असेही सामंत यांनी सांगितले. महायुतीतील दोन जबाबदार मंत्र्यांनी मुंबई गोवा महामार्गावर वेगवेगळी विधाने केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. मात्र कोकण वासियांच्या दृष्टीने हा महामार्ग लवकरात लवकर होणे अपेक्षित आहे.

# मागेल त्याला सौर कृषी पंप

## महावितरणच्या वेबसाईटला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :

मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत शेतकऱ्यांनी अर्ज करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुरु केलेल्या महावितरणच्या वेबसाईटला उदंड प्रतिसाद मिळाला असून केवळ चौदा दिवसात १ लाख २२ हजार शेतकऱ्यांनी त्यावर नोंदणी केली आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

राज्य सरकारने मागेल त्याला सौर कृषी पंप ही योजना शेतकऱ्यांसाठी सुरू केली आहे. त्यासाठीची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करता यावा यासाठी महावितरणने वेबसाईट तयार केली असून तिचे उद्घाटन मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दि. १३ सप्टेंबर रोजी मुंबईत समारंभपूर्वक झाले होते. त्यानंतर केवळ १४ दिवसात दि. २७ सप्टेंबरपर्यंत राज्यातील १,२२,४२१ शेतकऱ्यांनी वेबसाईटवर अर्ज दाखल केले होते.



मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत वेबसाईटवर अर्ज दाखल करण्यामध्ये जालना जिल्ह्याने बाजी मारली आहे. जालना जिल्ह्यातून ५२,०६७ अर्ज दाखल झाले आहेत. त्यानंतर राज्यात मराठवाड्यातील बीड (२४,५२६ अर्ज), परभणी (१५,०४३ अर्ज), छत्रपती संभाजीनगर (६,८८८ अर्ज) आणि हिंगोली (५,०७९ अर्ज) या जिल्ह्यांचा क्रम लागतो.

या योजनेत शेतकऱ्यांना जमिनीच्या क्षेत्रफळानुसार तीन ते साडेसात एचपीपर्यंतचे पंप मंजूर होतात. शेतकऱ्यांना सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स व कृषी पंप असा सर्व संच केवळ दहा टक्के रक्कम भरून मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी लाभार्थी हिस्सा केवळ पाच टक्के आहे. शेतकऱ्यांना ऊर्वरित रक्कम केंद्र व राज्य सरकारकडून सबसिडीच्या स्वरुपात मिळते. सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने एकदा संच बसविला की, शेतकऱ्याला २५ वर्षे हक्काचे व स्वतंत्र सिंचनाचे साधन मिळते. शेतकरी पारंपरिक ग्रीडमधून मिळणाऱ्या वीज पुरवठ्यावर अवलंबून राहत नाही तसेच त्याला बिलही येत नाही. सिंचनासाठी केवळ दिवसा वीज पुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांच्या सोईचे होते. राज्य सरकारने ही योजना जाहीर केल्यानंतर शेतकऱ्यांकडून तिला खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचा लाभ घेण्यासाठी वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज दाखल करावा. वेबसाईटवर योजनेविषयी संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. तसेच शेतकरी वीज ग्राहकांचे शंका समाधान करण्यासाठी सविस्तर प्रश्नोत्तरेही आहेत. अर्ज दाखल केल्यानंतर पुढील प्रगतीची माहितीही वेबसाईटवर तपासता येते.

## लाच स्वीकारताना तलाठीस अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नाशिक, दि. २८ :

शेतजमिनीवर कर्ज काढण्यासाठी नोंदीत फेरफार करून देण्यासाठी पंचांसमक्ष लाचेची मागणी करून १० हजार रुपयांची लाच शासकीय कार्यालयात स्वीकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिंडोरी तालुक्यातील वणी येथील तलाठी शांताराम गांगुर्डे यास ताब्यात घेतले. त्याच्यावर वणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदाराची वणी येथे शेती आहे. त्यावर कर्ज काढायचे असल्याने तलाठी गांगुडेर्ची भेट घेत शेतगटाच्या नोंदीत फेरफार करण्यास सांगितले. या नोंदी दिंडोरी तहसील कार्यालयात मिळतील, असे तक्रारदारास सांगण्यात आले. त्याप्रमाणे तक्रारदार दिंडोरी तहसील कार्यालयात गेले असता आवश्यक नोंदी मिळाल्या. परंतु, तीन नोंदी वणी येथील तलाठ्याकडे मिळतील, असे सांगण्यात आले. उताऱ्यावरील शेतजमिनीच्या क्षेत्राविषयी चुकीच्या नोंदी आहेत. त्या दुरूस्तीसाठी तक्रारदाराकडे १० हजार रुपयांची मागणी केली. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधला.

त्यानंतर पंचासमक्ष कार्यालयात लाच स्वीकारतांना तलाठी गांगुर्डे यास लाचलुचपत प्रतिबंधकच्या पथकाने ताब्यात घेतले. निरीक्षक नितीन पाटील, पोलीस नाईक विनोद चौधरी, पोलीस शिपाई अनिल गांगोडे, चालक परशुराम जाधव यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# माहिती तंत्रज्ञानाच्या उत्कृष्ट वापरासाठी महावितरणला राष्ट्रीय पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :

माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे वीज ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देणे आणि दजेर्दार ग्राहक सेवेसाठी प्रभावी धोरणात्मक उपक्रम राबविल्याबद्दल महावितरणला द गव्हर्नन्स नाऊ या संस्थेतर्फे दोन प्रवर्गात राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आले. दि. २६ सप्टेंबर २०२४ रोजी हॉटेल हॉलिडे इन, एरोसिटी, नवी दिल्ली येथे हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.




उपमुख्यमंत्री तथा ऊजार्मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणच्या कामकाजात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून ग्राहकांना पारदर्शक व गतिमान सेवा देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार महावितरणकडून माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत ग्राहक सेवेत अधिक सुलभता आणणाऱ्या ऊर्जा चॅटबॉट व ईव्ही मोबाईल ॲपसाठी महावितरणला हे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

महावितरणचे ऊर्जा चॅटबॉट २४ तास ग्राहकांच्या सेवेत आहे. ज्यामुळे वापरकर्त्यांना नवीन जोडणी अर्ज, तक्रार नोंदणी करणे, वीजबिल भरणे इ. सेवा सुलभपणे उपलब्ध झालेल्या आहेत. इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेत ग्राहकांना तत्परतेने, सुरक्षितरितीने माहिती प्रदान करून ग्राहकांचे समाधान करण्यात येत आहे. महावितरणच्या इलेक्ट्रिक व्हेईकल उपक्रमासाठी मानव विरहित ईव्ही चार्जिंग स्टेशनच्या उभारणी व इलेक्ट्रिक व्हेईकल वापरकर्त्यांसाठी मोबाईल ॲप उपलब्ध करुन दिले आहे. हे ॲप वापरकर्त्यांस चार्जिंग स्टेशन शोधणे व ई-वाहनांच्या व्यवस्थापनात मदत करते. हे ॲप महाराष्ट्रातील इलेक्ट्रिक व्हेईकल क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या वाढीला चालना देणारे ठरले आहे.

राष्ट्रीय पातळीवरील हे दोन्ही पुरस्कार महावितरणतर्फे महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) एकनाथ चव्हाण यांनी स्वीकारले. या यशाबद्दल महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. अविनाश हावरे व माहिती तंत्रज्ञान विभागाचे अभिनंदन केले.

## भरधाव पीएमपी बसची प्रवाशांना धडक

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २८ :

भरधाव पीएमपी बसने बसथांब्यावर प्रवासी महिलेसह एकाला धडक दिल्याची घटना नेहरु रस्त्यावरील सोनवणे रुग्णालयासमोर घडली.

अपघातात महिलेसह तिघे जण जखमी झाले, तसेच पीएमपी बसने रिक्षाला धडक दिली. युवराज बबन नवले (रा. कुरण, ता. जुन्नर), कुसुम विश्वनाथ लोंढे (रा. ताडीवाला रस्ता), फारुक शेख अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत.

याप्रकरणी पीएमपी बसचालक गणेश बाळासाहेब नायकल (वय ३५, रा. कोहिनूर हॉटेलजवळ, खराडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत किशोर बालाजी परदेशी (वय ३८, रा. गंज पेठ) यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नेहरु रस्त्यावरील सोनवणे रुग्णालया समोर पीएमपी थांब्यावर शुक्रवारी सकाळी नऊच्या सुमारास नवले, लोंढे थांबले होते. त्यावेळी भरधाव पीएमपी बसने प्रवासी नवले आणि लोंढे यांना धडक दिली. बस थांब्यापासून काही अंतरावर रिक्षाला धडक दिली.

अपघातात नवले, लोंढे आणि रिक्षाचालक शेख जखमी झाले. अपघातानंतर तिघांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातात नवले गंभीर जखमी झाले असून, अपघाताची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक शर्मिला सुतार यांनी घटनास्थळी भेट दिली. बसचालक नायकल याच्या चुकीमुळे अपघात झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. हवालदार येलपले तपास करत आहेत.

## बदलापूर प्रकरणात पोलिसांविरोधातील याचिकेवर शिवसेनेचा आक्षेप

### मनिषा कायंदे यांचा आक्षेप

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :

बदलापूरसारख्या संवेदनशील प्रकरणात वकील असीम सरोदे यांनी पोलिसांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या याचिकेवर शिवसेनेच्या सचिव तथा प्रवक्त्या मनिषा कायंदे यांनी आक्षेप घेतला. वकील सरोदे शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचे ते निकटवर्तीय असल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, ते राजकीय अजेंडा राबवत आहेत का, अशी शंका ही उपस्थित केली. बाळासाहेब भवन येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

बदलापूर प्रकरणानंतर विरोधकांनी आरोपीला ताबडतोब फाशी द्या, अशी मागणी केली होती. याबाबत खटला सुरु होता. मात्र रिमांडमध्ये असताना आरोपीने पोलिसांवर गोळीबार केला आणि स्वसंरक्षणासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त करत वकील सरोदे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. कोर्टात जाण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. मात्र, सरोदे आणि ठाकरेंचे धनिष्ठ संबंध आहेत. अनेकदा सोशल माध्यमातून त्यांचे फोटो समोर आले आहेत. त्यामुळे यांची भूमिका संशयास्पद असल्याचे दिसून येते, असा आरोप कायंदे यांनी केला. कोविड काळात मुंबईत कोविड सेंटर घोटाळा, बॉडीबॅग घोटाळा, खिचडी घोटाळा असे कोट्यवधी रुपयांचे घोटाळे झाले. महाविकास आघाडीच्या काळात मनसुख हिरेन यांची हत्या झाली होती, त्याविषयी सरोदेंनी न्यायालयात धाव का घेतली नाही, असा सवाल त्यांनी केला. लोकसभा निवडणुकीच्या काळात निर्भय बनो आंदोलन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केलेल्या आरोपांचा कायंदे यांनी दाखला यांनी सरोदेंवर जोरदार टीका केली.

## जावयाचा सासू, सासऱ्याने काढला काटा

■ महासागर प्रतिनिधी,
कोल्हापूर, दि. २८ :

जावयाकडून मुलीला वारंवार होणाऱ्या त्रासामुळे चिडलेल्या सासरा आणि सावत्र सासूने ट्रॅक पँटच्या नाडीने एसटी बसमध्ये गळा आवळून जावयाचा खून केला. गडहिंग्लज ते कोल्हापूर मार्गावर कागलजवळ जावयाचा खून केला. मृतदेह कोल्हापुर मध्यवर्ती बसस्थानकातील एका दुकानाच्या पायरीवर ठेवून निघून गेले. शाहूपुरी पोलिसांनी चार तासांत सासू आणि सास-यास ताब्यात घेऊन अटक केली. संदीप रामगोंडा शिरगावे (वय ३५, रा. चिंचवाड, ता. शिरोळ) असे मृत नाव आहे. या प्रकरणी शाहूपुरी पोलिसांनी हणमंताप्पा यल्लाप्पा काळे (४८) आणि गौरवा हणमंताप्पा काळे (३०, दोघे रा. हुनगीनाळ, ता. गडहिंग्लज) या दोघांना अटक केली आहे. कोल्हापूर मध्यवर्ती बस स्थानकातील एस.टी. प्रोव्हिजन स्टोअर्सच्या पायरीवर एका तरुणाचा मृतदेह आढळला. दोरीने गळा आवळल्याचे व्रण दिसताच पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह तपासणीसाठी पाठवला.

# श्री सिद्धिविनायक न्यासाची व्यवस्थापन समिती जाहीर

### कोषाध्यक्षासह ९ सदस्यांची वर्णी

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :

सिद्धिविनायक न्यासाच्या व्यवस्थापन समितीवर कोषाध्यक्षासह ९ सदस्यांची वर्णी लावण्यात आली आहे. याबाबतची अधिसूचना राज्य शासनाने शुक्रवारी जारी केली. पुढील तीन वर्षांसाठी ही नियुक्ती केली आहे. त्यामुळे अध्यक्ष असलेल्या आमदार सदा सरवणकर यांना तीन वर्षांची मुदतवाढ मिळणार आहे.

राज्यात महायुतीची सत्ता स्थापन होताच राजकीय उलथापालथ झाली. यात सिद्धीविनायक मंदिर न्यासाचे अध्यक्ष आदेश बांदेकर यांची उचलबांगडी करत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार सदा सरवणकर यांची ६ नोव्हेंबर २०२४ रोजी तीन वर्षांसाठी नियुक्ती केली होती. आता कोषाध्यक्ष व सदस्यांची निवड करण्यात आली आहे. सिध्दीविनायक गणपती मंदिर न्यासाच्या व्यवस्थापन समितीवर कोषाध्यक्ष व इतर सदस्यांची २२ जानेवारी २०२१ पासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती केली होती. समितीचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने या नव्याने नियुक्ती करण्यात आल्या आहेत.

### सिद्धिविनायक मंदिर व्यवस्थापन समिती

सदा सरवणकर - अध्यक्ष
पवनकुमार त्रिपाठी - कोषाध्यक्ष
मीना कांबळी - सदस्या
राहुल लोंढे - सदस्य
भास्कर शेट्टी - सदस्य
महेश मुदलीयार - सदस्य
गोपाळ दळवी - सदस्य
जितेंद्र राऊत - सदस्य
मनिषा तुपे - सदस्या
सुदर्शन सांगळे - सदस्य
भास्कर विचारे - सदस्य

## राज्यातील पावसाचा जोर ओसरण्याची शक्यता

**मुंबई :** मुंबई शहर आणि उपनगरांत शुक्रवारी पहाटेपासून अनेक भागात पाऊस कोसळत होता. दरम्यान, पुढील दोन ते तीन दिवस मुंबईसह ठाणे, पालघर जिल्ह्यात हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. शहर आणि उपनगरांत शुक्रवारी पहाटेपासून पावसाला सुरुवात झाली होती. शहरातील परळ, कुलाबा, वरळी भागात पहाटे पावसाचा जोर वाढला होता. उपनगरातील वांद्रे, अंधेरी परिसरातही पाऊस कोसळत होता. त्यानंतर दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. दरम्यान, मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांत पुढचे दोन झ तीन दिवस हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. मागील काही दिवस उसंत घेतलेल्या पावसाने शहर आणि उपनगरांत बुधवारी दमदार हजेरी लावून हाहाकार उडवला. बुधवारी संध्याकाळी सुरू झालेल्या पावसामुळे ठिकठिकाणच्या सखल भागात पाणी साचले होते.

## महिला पोलिसाला ठाण्यातच जीवे ठार मारण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी,
कल्याण, दि. २८ :

उल्हासनगर मधील विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेल्या एका महिला पोलिसाला पोलीस ठाण्यातील एका कक्षात कोंडून ठेऊन एका माथेफिरू हल्लेखोराने या महिला पोलिसावर धारदार पातेने हल्ला करून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. गुरुवारी सकाळी ही घटना घडली आहे. या घटनेने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. शितल भगवंत बांबळे (३२) असे गंभीर जखमी महिला पोलिसाचे नाव आहे. त्या विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असतात. बाबासाहेब जंगलु सोनवणे (४२, रा. भीम कॉलनी, उल्हासनगर कॅम्प ४) असे हल्लेखोराचे नाव आहे.

पोलिसांनी सांगितले, महिला पोलीस शितल बांबळे बुधवारी रात्रीपाळीसाठी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर होत्या. त्यांचे कर्तव्य गुरुवार सकाळपर्यंत होते. गुरुवारी सकाळी हवालदार बांबळे पोलीस ठाण्यात असताना पोलीस ठाण्यात स्वतावर धारदार पातेने वार करून रक्तबंबाळ अवस्थेत आरोपी बाबासाहेब सोनवणे आला. तो संतप्त झाला होता. अर्वाच्च बोलत होता. हवालदार बंबाळे यांनी आरोपी बाबासाहेब सोनवणे याला बसण्यास सांगितले. त्याला तातडीने वैद्यकीय उपचारासाठी शासकीय रुग्णालयात जाण्यासाठीची कागदोपत्रांची तयारी त्या करत होत्या. यावेळी संतप्त असलेल्या बाबासाहेबाला त्या शांत राहण्यासाठी समजवत होत्या. पोलीस ठाण्यातील आर. टी. पी. सी. कक्षात हा प्रकार सुरू होता. या कक्षात आपल्या खुर्चीवर हवालदार बंबाळे बसल्या होत्या. बंबाळे यांना काही कळण्याच्या आत हल्लेखोर बाबासाहेब सोनवणे याने त्या कक्षाचा दरवाजा बंद करून घेतला. हवालदार बंबाळे यांना वेठीस धरले.

# मुंबईतील प्रार्थनास्थळातील बंदोबस्तात वाढ

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :

मुंबईमधील प्रार्थनास्थळे, विशेषतः शहरातील मशिदी आणि मंदिरांमधील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. गुप्ताचर विभागाने दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर खबरदारीची उपाययोजना म्हणून मुंबईतील बंदोबस्तात वाढ करण्यात आली. दरम्यान, काही दिवसांपूर्वी हाजीअली दर्ग्याच्या कार्यालयात दूरध्वनी करून एकाने बॉम्ब ठेवल्याची धमकी दिली होती. त्यामुळे गदीर्चीं ठिकाणे आणि प्रार्थनास्थळ परिसरात मॉक ड्रिल करण्यात येणार असून सर्व पोलीस उपायुक्तांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील सुरक्षा व्यवस्थेवर लक्ष ठेवले आहे.



दक्षिण मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तथापि, ही कारवाई एक सुरक्षा कवायत होती. आगामी सणासुदीचा काळ आणि लवकरच होवू घातलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन क्रॉफर्ड मार्केट आणि शहरातील इतर महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा कवायती करण्यात येत आहेत, असे पोलिसांनी स्पष्ट केले.मात्र अधिक तपशीलवार माहिती देण्यास पोलिसांनी नकार दिला.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने चेंबूरमधील मंदिराच्या सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली, तर पोलिसानी सकाळी तपासणी केल्यानंतर माटुंगा येथील मंदिर भाविकांसाठी बंद करण्यात आले. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक नोव्हेंबरमध्ये होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये याद्दष्टीने मुंबईत कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

हाजी अली दर्ग्याचे प्रशासकीय अधिकारी मोहम्मद अहमद ताहेर शेख (४२) यांच्या तक्रारीवरून ताडदेव पोलिसांनी बुधवारी गुन्हा दाखल केला. भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२), ३५२, ३५३(२), ३५३(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. मंगळवारी व बुधवारी दोन धमकीचे दूरध्वनी आरोपीने केले होते. त्यासाठी दोन वेगवेगळ्या मोबाइलचा वापर करण्यात आला होता. पण दूरध्वनी करणारी व्यक्ती एकच असल्याचे तक्रारीत शेख यांनी म्हटले आहे. प्रथम २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास तक्रारदारांच्या मोबाइलवर आरोपीने दूरध्वनी केला होता.

संकेतस्थळावरून त्याने शेख यांचा मोबाइल मिळवल्याचा संशय आहे. दिल्लीवरून मी पवन बोलत आहे. हाजी अली दर्ग्यामध्ये बॉम्ब ठेवला असून दर्गा लवकरात लवकर रिकामा करा. दर्गा रिकामा न केल्यास बॉम्बने उडवून देण्यात येईल. कोणी मध्ये आल्यास त्याला गोळी मारून ठार करण्यात येईल, असे आरोपीने दूरध्वनीवरून धमकावले. त्यानंतर पुन्हा एकदा आरोपीने दूरध्वनी केल्याचे तक्रारीत म्हटले.

# मुंबई विद्यापीठ सिनेट निवडणुकीने ठाकरे सेनेत भरले बळ जागावाटपात काँग्रेसच्या पोटात येणार कळ

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २८ :

मुंबई विद्यापीठातल्या सिनेटच्या निवडणुकीने ठाकरे सेनेत भरले बळ, या निवडणुकीत अभाविप झाली पराभूत, पण काँग्रेसच्या पोटात आली कळ!!, असे म्हणायची वेळ आली आहे. कारण मुंबई शहरामध्ये उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत कुठल्याही छोट्या मोठ्या निवडणुकीत यशाचे बळ भरले गेले, की त्याचा परिणाम महाविकास आघाडीतल्या जागा वाटपावर होणार आणि त्याचा फटका काँग्रेसला जास्त बसणार हे उघड गुपित आहे. वास्तविक कुठल्या विद्यापीठाची सिनेट निवडणूक ही मतदार संख्येने फार मोठी नसते. पण ही तरुणांची निवडणूक असल्यामुळे त्याची वातावरण निर्मिती मात्र नेहमीच कायम मोठी होत असते. सगळ्या राजकीय पक्षांच्या विद्यार्थी संघटना त्यात उतरून आपापल्या पक्षांचे बळ आजमावत असतात. मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत अभाविपने युवा सेनेला आव्हान दिले होते. बरीच न्यायालयीन लढाई त्यात झाली होती. त्यामुळे विधानसभा अथवा लोकसभेसारखी निवडणूक असल्याच्या थाटात ती लढवली गेली होती. मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत १३,४०६ एवढेच मतदार होते. त्यापैकी ५५% मतदारांनी मतदान केले होते. म्हणजे साधारण ७५०० मतदारांनी मतदानात भाग घेतला होता. या निवडणुकीत युवा सेनेने बाजी मारली १० पैकी १० जागा जिंकल्या. त्यामुळे ठाकरे सेनेत बळ भरले गेले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पराभूत झाली.

पण या निवडणुकीचा त्याच्या पुढचा परिणाम म्हणून काँग्रेसला आता जोश भरलेल्या ठाकरे सेनेशी विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपाच्या वाटाघाटी कराव्या लागणार आहेत. एक - एक, दोन - दोन जागांच्या संघर्षात ठाकरे सेना विद्यापीठातल्या सिनेट निवडणुकीतल्या आपल्या यशाकडे बोट दाखवून काँग्रेस कडून जास्त जागा खेचायचा प्रयत्न करणार आहे. मुंबईतला युवा मतदार ठाकरे सेनेकडे कसा आकर्षित झाला, याचे उदाहरण म्हणून सिनेटच्या निवडणुकीकडे बोट दाखवायला ठाकरे सेना मोकळी झाली आहे. त्यामुळेच या निवडणुकीत अभाविप पराभूत झाली, तरी राजकीय कळ मात्र काँग्रेसच्या पोटात आली आहे.

# सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात उद्योजकांनी युवकांना रोजगार देण्यासाठी पुढाकार घ्यावा : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २८ :

नवीन तंत्रज्ञानाचा शोध घेऊन भविष्यातील विकासाचा वेध घेणारे उद्योग सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात उभारणे आवश्यक असून त्याचे नियोजन उद्योजकांनी करावे आणि फक्त संपत्ती निर्माण करण्याऐवजी या क्षेत्रात युवकांना रोजगार मिळेल या दिशेने पुढाकार घेण्याचे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर येथे केले.




कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री - सीआयआयच्या वतीने नागपूरच्या सेंटर पॉइंट हॉटेल येथे आज एक दिवसीय सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग - एमएसएमई परिषद आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या एक दिवसीय परिषदेला संबोधित करताना गडकरी बोलत होते.

ग्रामीण भागातील विकासासाठी कृषी आणि कृषी माल प्रक्रिया उद्योग वाढणे आवश्यक आहे असे गडकरी यांनी यावेळी सांगितले. नागपुरात होत असलेल्या मदर डेअरी प्रकल्पात 15 लाख दूध संकलन प्रति दिवस अपेक्षित आहे या प्रकल्पाचा सामाजिक आणि आर्थिक परिणाम संपूर्ण विदर्भावर पडेल असेही त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय सकल उत्पादनात एमएसएमईचे भरीव योगदान असून एमएसएमई क्षेत्राला भेडसावणाऱ्या समस्यांमध्ये विजेचे शुल्क, एमएसएमई उद्योजक आणि संबंधित भागधारकांना देयकांची पूर्तता अशा समस्यावर केंद्र शासनाच्या स्तरावर उपाययोजना सुरू आहेत असे गडकरी यांनी सांगितले.

याप्रसंगी सीआयआय महाराष्ट्राचे संयोजक राहुल दीक्षित यांनी प्रास्ताविकात महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे औद्योगिक महत्त्व स्पष्ट केले. या परिषदेत कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजच्या राज्य तसेच विदर्भ चाप्टरचे पदाधिकारी, विदभार्तील उद्योजक उपस्थित होते.

# सामुदायिक आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## पहिल्याच दिवशी साडेपाच हजार नागरिकांची आरोग्य तपासणी



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २८ :

नागपूर महानगरपालिका आरोग्य विभाग व राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष मा. उपमुख्यमंत्री यांच्या कार्यालयाच्या वतीने नागपूर शहरात १० दिवस सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. २७ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत आयोजित सामुदायिक आरोग्य शिबिराला शुक्रवारी (ता.२७) पहिल्याच दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शुक्रवारी एकूण ५५४० रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात व अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या नेतृत्वात नागपूर महानगर पालिकेच्या ५१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व ३८ आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये सामुदायिक आरोग्य शिबिर घेण्यात येत आहेत.

सामुदायिक आरोग्य शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून रोग निदान, शिबिरानंतर आवश्यक शस्त्रक्रिया, रक्त व लघवी चाचणी आणि ई.सी.जी. या सर्व तपासणी विनामूल्य करण्यात येतात. याव्यतिरिक्त आवश्यक सीटी स्कॅन किंवा एमआरआय हे संदर्भीत करून विनामूल्य दिले जात आहे. या शिबिराचा मुख्य उद्देश सामाजिकदृष्ट्या मागास व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णाची तपासणी व रोग निदान, महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य योजनांबाबत रुग्णांना अवगत करणे, स्थानिक पातळीवर सर्वसामान्य व्याधींचे उपचार करणे, गरजेनुसार आवश्यकता भासल्यास शिबिरानंतर विशेष संदर्भीत निदानात्मक तथा उपचारात्मक सेवा उपलब्ध करून देणे, हा शिबिराचा उद्देश आहे.

शुक्रवारी २७ सप्टेंबर रोजी आयोजित शिबिरामध्ये २२६६ पुरूष आणि ३२७४ महिला अशा एकूण ५५४० रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी १४४१ रुग्णांची लॅबमध्ये चाचणी करण्यात आली. ५४१७ रुग्णांना औषध पुरविण्यात आले. १० रुग्णांचे सीटी स्कॅन, १४ रुग्णांचे एमआरआय, ३१ रुग्णांचे ३१ यूएसजी करणे आवश्यक असल्याने त्यांना त्यासाठी पाठविण्यात आले. एकूण १८३ रुग्णांना शस्त्रक्रिया करण्याची गरज लक्षात आली. यापैकी ४३ रुग्णांची हृदयरोग शस्त्रक्रिया, ५० रुग्णांची जनरल शस्त्रक्रिया, १२ रग्णांची स्त्री रोग शस्त्रक्रिया व विविध शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

# समलैंगिकांचा सारथी हरपला

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २८ :



वीस वर्षांपूर्वी एका गे तरुणाने नागपुरात समलिंगी नागरिकांची संस्था उभी करण्याचा विचार केला आणि नागपूरच नव्हे तर विदर्भातील समलिंगी नागरिकांच्या आयुष्यात एक पहाट उगवली. तोपर्यंत नागपुरात गे नागरिक नव्हते असे नाही, पण ते कधीच समोर आले नव्हते.

पुण्यातील हमसफर ट्रस्टसोबत काम करताना आनंद चांदरांनी यांना नागपुरातही अशी संस्था सुरू व्हावी, असे तळमळीने वाटले आणि २००५ साली सारथी ट्रस्टचा जन्म झाला. या संस्थेचे जनक आनंद चांदराणी वयाच्या अवघ्या ५१ व्या वर्षी कधी परत न येणाऱ्या वाटेवरून निघून गेले आहे. त्यांचे शुक्रवारी निधन झाले.

समलिंगी नागरिकांच्या हक्कांसाठी, आरोग्यासाठी आणि अन्य अधिकारांसाठी लढणारी सारथी ट्रस्ट ही संस्था नागपूरात सुमारे १९ वर्षांपूर्वी स्थापन झाली. आनंद चांदरानी यांनी ही संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी अवघे आयुष्य समलिंगी व्यक्तींच्या हक्कांसाठी लढण्यात घालवले. समलिंगी व्यक्तींच्या आरोग्य, शिक्षण व नागरी हक्कांसाठी त्यांनी वेळोवेळी आंदोलने केली, उपक्रम राबवले व जनजागरणाचे कार्य केले. त्यांच्या पुढाकाराने विदर्भात समलिंगी व्यक्तींच्या चळवळी उभ्या झाल्या व समलिंगी व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मार्ग खुले होऊ लागले.

समलिंगी नागरिकांचे आरोग्य, त्यांचे शिक्षण, त्यांचे मुलभूत हक्क आदींसाठी लढणारी ही संस्था आहे. गुणवत्ता असतानादेखील निसर्गाच्या विरोधात जाणारे म्हणून समलिंगी व्यक्तींकडे पाहण्यात येऊ लागले.

त्यांना समाजात जे स्थान मिळायला हवे ते मिळत नव्हते. कायदा आणि व्यवस्था या दोन्हीच्या कचाट्यात ते अडकले. त्यांच्याकडे उपेक्षित म्हणून पाहण्यात येऊ लागले. समाजदेखील त्यांना समजून घेण्यास तयार नसल्यामुळे अशा व्यक्तींना समजून घ्या, त्यांना माणूस म्हणून वागवा यासाठी ही संस्था लढा देत आहे.

# बाहोकॉन परिषदेची सुरुवात

## क्लिनिकल रिसर्च डिझाईनिंग वर कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २८ :

नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आज डॉ. शकुंतला गोखले मेमोरिअल हॉल (एपीआय हॉल) येथे दुसऱ्या राष्ट्रीय बाहोकॉन परिषदेची सुरुवात झाली. प्रास्ताविक स्वागत भाषण बाहोच्या अध्यक्षा डॉ.त्रिशला ढेमरे यांनी केले.




आयोजक अध्यक्ष डॉ.शंकर खोब्रागडे यांनी करिअरमधील संशोधनाचे महत्त्व अधोरेखित केले आणि सराव, डेटा संकलन आणि जैव वैद्यकीय संशोधन आणि नवीन ज्ञानाचा उपयोग यांमध्ये विभागणी करण्यास सांगितले. डॉ सुशांत मेश्राम संघटना. कार्यशाळेचे सचिव आणि प्रभारी यांनी सांगितले की हे डिझाइनिंग क्लिनिकल संशोधन का निवडले गेले आणि प्रतिनिधींना अंतर्दृष्टी मिळावी अशी इच्छा आहे. कार्यशाळेचे उद्घाटनः- कार्यशाळेचे संरक्षक आणि प्रमुख पाहुणेः डॉ. राज गजभिये, डीन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय, नागपूर यांनी कार्यशाळेचे औपचारिक उद्घाटन केले आणि विद्यार्थ्यांना आणि कर्मचाऱ्यांना संशोधनासाठी प्रेरणा देणाऱ्या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी शैक्षणिक संस्था निवडल्याबद्दल आभार मानले. वैज्ञानिक सत्रांची सुरुवात आदरणीय वक्त्यांनी क्लिनिकल संशोधनातील आवश्यक विषयांवर त्यांचे कौशल्य सामायिक करून केली.

# दहाही झोनमध्ये भव्य स्वच्छता मोहिम

**नागपूर**: राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्याची पूर्वतयारी म्हणून १७ सप्टेंबर २०२४ ते ०१ ऑक्टोबर २०२४ दरम्यान स्वच्छता ही सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे. याअंतर्गत रविवारी २९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ७ वाजता सर्व दहाही झोनमध्ये भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. मनपा आयुक्त अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांच्या नेतृत्वात हे स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.

# नागपुरात आज ओबीसी महासंघाची बैठक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २८ :

राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे विदभार्तील 11 जिल्हात संवाद सभा आयोजित करणे तसेच राष्ट्रीय ओबीसी महासंघाने सातत्याने आंदोलने, अन्नत्याग आंदोलने मोर्चे काढून सरकारवर दबाव वाढवून सरकार कडून विविध मागण्या मान्य करून घेतल्या व काही मागण्या प्रलंबित असून यावर विचार मंथन करणे तसेच महासंघाच्या संघटनात्मक बाबीवर चर्चा करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची सभा 29 सप्टेंबर 2024 ला रोज रविवारला धनवटे नॅशनल कॉलेज येथिल मातोश्री विमलाताई देशमुख सभागृह ,अजनी रेल्वे स्टेशन जवळ नागपूरला दुपारी 12.30 वाजता ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. सभेत केंद्र व राज्य सरकारशी संबंधित मागण्यांवर विचार विनिमय आणि दिनांक 4 ऑक्टोंबर ते 9 ऑक्टोंबर 2024 पर्यंत होणाऱ्या विदभार्तील 11 जिल्हात संवाद सभा आयोजनावर चर्चा केली जाईल. सभेला राष्ट्रीय ओबीसी महासंघ, महिला महासंघ, किसान महासंघ, युवा/युवती महासंघ, विध्यार्थी महासंघ, कर्मचारी महासंघ, वकील महासंघ सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी काढलेल्या पत्रकातून केली.

# 'देखो अपना देश, पीपल्स चॉइस २०२४' सर्वेक्षण

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २८ :

पर्यटन स्थळे 'देखो अपना देश पीपल्स चॉइस 2024' हे ऑनलाइन सर्वेक्षण भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने आयोजित केले आहे. भारतातील तुमच्या आवडत्या पर्यटन स्थळांना भेट देऊन आणि तुमचे अनुभव शेअर करून तुम्हाला विजेता बनण्याची संधी देखील मिळेल.

या देशव्यापी सर्वेक्षणाचे उद्दिष्ट नागरिकांसह सर्वाधिक पसंतीची पर्यटन स्थळे ओळखणे आणि अध्यात्म, सांस्कृतिक वारसा, निसर्ग, वन्यजीव आणि साहस या पाच श्रेणींमध्ये पर्यटकांच्या धारणा समजून घेणे हे आहे.

"इतर" श्रेणी नागरिकांना त्यांच्या वैयक्तिक पसंतीस मतदान करण्यास अनुमती देईल, ज्यामुळे देशातील अनपेक्षित पर्यटन स्थळे शोधण्यात मदत होईल.

भारतीय लोकांची नाडी समजून घेण्यासाठी पर्यटन मंत्रालयाने प्रथमच देशव्यापी उपक्रम देखो अपना देश, पीपल्स चॉइस 2024 विकसित केला आहे.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHAMMAD HABIB MOHAMMAD QASIM.** MY NEW NAME IS **MOHAMMAD HABIB MOHAMMAD QASIM RAYALIWALE.**
**ADD:** TALAV FAIL GAVALIPURA DHAMANGAON ROAD YAVATMAL

MY OLD NAME WAS **ASMA ANJUM BAIG.** MY NEW NAME IS **ASMA SAJJAD HUSSAIN.**
**ADD:** BASERA 13, JAIHIND NAGAR MANKAPUR NAGPUR

MY OLD NAME WAS **SHAHINA ANSARI.** MY NEW NAME IS **SHAHINA ATEEQUE AHMAD SHAIKH.**
**ADD:** NEAR MATIN LEADER HOUSE MOMINPURA NAGPUR 440018


# पालक व शिक्षकांच्या वादात तीन विद्यार्थीनी होत्या शाळाबाह्य

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :





पण शाळेकडून टीसी देण्यात येत नव्हती तेव्हा नायक यांनी शिक्षण विभागाला त्यांच्या मुलींना होणाऱ्या मानसिक व शैक्षणिक अवहेलनेबाबत अवगत केले व न्यायाची मागणी केली. सुरुवातीला शिक्षण विभागाकडूनही याकडे दुर्लक्ष झाले त्यामुळे शेवटी 12 जुलैला शाळेकडून विद्यार्थ्यांना शाळेत बसण्यास मज्जाव करण्यात आला. शेवटी विचारांती नायक यांनी आपल्या मुलींना घराजवळच्याच विश्वास माध्यमिक व कनिष्ठ विद्यालय या शासकीय शाळेत टाकण्याचा निर्णय घेतला.

पण या शाळेला जेव्हा पूर्व शाळेबद्दल कल्पना मिळाली तेव्हा त्यांनी टीसी नसण्याच्या कारणावरून व शाळेत जागा नसल्याची सबब देत मुलींना शाळेत दाखल करून घेण्यास मनाई केली. पुन्हा नायक यांनी शिक्षण विभागा ला पत्र पाठविले तेव्हा त्यांच्या आक्रमक तक्रारी पुढे शिक्षण विभागाने दोन्ही शाळांना विद्यार्थिनींना शाळेच्या प्रवाहात ठेवण्यासाठी सहकार्य करण्याबाबत पत्र पाठवले व बालरक्षण समन्वय प्रसेनजीत गायकवाड यांच्या मध्यस्थीने जवळपास दोन महिने शाळाबाह्य रहात या विद्यार्थिनींना सप्टेंबरच्या मध्यापर्यंत

**उत्तरार्ध**

विश्वास माध्यमिक व कनिष्ठ विद्यालय येथे दाखला मिळाला. अजून पर्यंत आदर्श संस्कार विद्यालयाकडून पालकांना टीसी देण्यात आलेली नाही. आरटीई ॲक्ट 2009 अंतर्गत कोणत्याही बालकाला कोणत्याही परिस्थितीत शिक्षणाच्या प्रवाहापासून वंचित ठेवता येत नाही असे असताना बालहक्क कायद्याला तुडवणाऱ्या व शिक्षण विभागाकडून देण्यात येणाऱ्या पत्राच्या आदेशाची टायटन करणाऱ्या या शाळांच्या विरोधात शिक्षण विभागाकडून झालेली कारवाई ही मवाळच राहिलेली आहे.

संतोष नायक यांची जर आर्थिक परिस्थिती नव्हती तर त्यांनी आपल्या मुलींचा दाखला मोफत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत करायला हवा होता. आदर्श संस्कार विद्यालय ही शाळा खाजगी स्वयंसहाय्यक असून त्यांचा शैक्षणिक शुल्काचा मुद्दा योग्यच आहे.

**सिद्धेश्वर काळुसे शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**

आरटीई ॲक्ट नुसार विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणे त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देणे शिवाय नापास करणे हा गुन्हा आहे. अशा परिस्थितीत शिक्षण विभागा ने कठोर भूमिका न घेता सामांजस्याचे भूमिका घ्यावयाची असते जेणेकरून इतर विद्यार्थ्यांची नुकसान होणार नाही. व त्याच पद्धतीने शिक्षण विभागाने हा विषय हाताळला आहे. ही बाब जर न्याय प्रविश्ट झाली तर या शाळांची मान्यता रद्द झाल्याशिवाय राहणार नाही.

**प्रसेनजित गायकवाड (बालसंरक्षण समन्वयक)**


**E-TENDER (RFx) NOTICE**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Notice for submission of online bids (RFx) for following**

| S.N. | RFx/Tender No. & Description |
|---|---|
| 1. | **RFx No. 7000033710**<br>Work of fixing of Earth-wire along with required accessories in various 220KV & 132KV Lines under LMSD Kanhan, Mankapur & Ambazari under EHV (O&M) Division Nagpur (E/W supplied by MSETCL)<br>**Estimated cost:- Rs. 56,92,748/- (Including GST & LC)**<br>**EMD Rs. 56,928/- , Tender Fees:- Rs.500/- (+ GST)** |

**Tender Available at:- https://srmetender.mahatransco.in**
**Sale period:- 28.09.2024 to 05.10.2024**
**Submission date:- 05.10.2024 @ 10:00 Hrs**
**Date & Time of opening (Tech. bid):- 05.10.2024 @ 10:30 Hrs (if possible)**
**Date & Time of opening (Price bid):- 05.10.2024 @ 16:00 Hrs (if possible)**
**In case of query mail to se4100@mahatransco.in**

**Superintending Engineer EHV (O&M) Circle MSETCL, Nagpur**

**पाहिजेत**

सरकार मान्य व कायम विनाअनुदानित
**कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक**
द्वारा सव्लग्नित
**मुकुंदराज महाविद्यालय पंचखेडी**
ता. कुही जि. नागपूर
येथे खालील पदे कायम विना अनुदान तत्वावर भरायची आहे

| पदनाम | पदसंख्या | पात्रता |
|---|---|---|
| प्राचार्य | 1 | M. A. NET/SET<br>P.hd. व १० वर्ष अध्यापनाचा अनुभाव |
| सहाय्यक प्राध्यापक | | |
| लोकप्रशासक | 1 | M. A. NET/SET |
| मराठी | 1 | M. A. NET/SET |
| संस्कृत | 1 | M. A. NET/SET |
| इंग्रजी | 1 | M. A. NET/SET |
| इतिहास | 1 | M. A. NET/SET |
| समाजशास्त्र | 1 | M. A. NET/SET |
| क. लिपिक | 1 | B.A/BSC संगणक मराठी / इंग्रजी टायपिंग |

तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी आपले अर्ज दि १०/१०/२०२४ पर्यंत महाविद्यालयात पोहोचतील अशा रीतीने पाठवावीत.

अध्यक्ष/सचिव
नारायणस्मृती बहुउद्देशीय संस्था
बोथली ता. कुही जि. नागपूर

**TENDER NOTICE**

Agriculture Product Market Committee, Mandhal Tah. Kuhi Dist. Nagpur invites percentage rate tenders from reputed & experienced building works contractors for following described work of APMC

| Agriculture Product Market Committee, Mandhal | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of work | Estimated cost put to tender | Earnest Money (1%) | Security Deposit | Class of Contractor | Tender Fee |
| 1) | Construction work of PROPOSED CONSTRUCTION OTTA AUCTION (01) IN THE PREMISES OF SUB MARKET YARD APMC KUHI | Rs. 8,43,561.00 | Rs. 8500.00 | 5% - Rs. 42,200.00 | Appropriate class | Rs. 3000.00 |

Tender form is available through Cash/D.D. of any Nationalized or Scheduled bank in favour of **Chairman / Secretary Agriculture Product Market Committee, Mandhal Tah. Kuhi Dist. Nagpur** of above-mentioned tender cost. from **29-09-2024 to 03-10-2024 between 11.30 am. To 4.30 pm.** (Except Sunday & National Holidays)
Last date of submission of tender will be 06-10-2024 till 3.00 pm. and will be open if possible same day
The Tender will be issued to the contractor, who will fulfill the following criteria:
1) Minimum value of single similar or any other building type of work done in any one year in last 3 years Shall be at least equivalent to the value of respective component of the works given above.
2) Xerox copy of the Income tax, VAT, PF returns for the years Last 3 years.
3) Annual turnover shall be at least equivalent to the value of work in last three years.
4) Blank tender forms shall be issued on request in writing on letter head only.
5) PWD Registration Copy, GST Certificate, Pan Card & Supported Document.
The night to accept or reject any or all tenders without assigning any reason thereof is reserved by Chairman / Secretary **Agriculture Product Market Committee, Mandhal Tah. Kuhi Dist. Nagpur.**

Architect APMC mandhal | Chairman APMC Mandhal | Secretary APMC mandhal

**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**Tender Notice**

Commissioner NMC invites Offline Tenders for the following works. These tenders can be submitted by the Registered Contractors of NMC. The Terms and Conditions of tenders are available in the Tender Form. The sale and purchase of Tender Form at E.E.(Slum) Office, 5th Floor, B-Wing NMC, Nagpur.

| Tender No. | Name of the work | BOQ Cost (Rs.) | EMD |
|---|---|---|---|
| 1 | Providing & Fixing Smart Board For Smart Public Toilet at Shakkardhara | 420058 | 4300 |
| 2 | Providing & Laying Cement Concrete Flooring at Sweeper Colony, Gangabai Ghat & Various Places in pr no 22. | 419995 | 4200 |
| 3 | Providing & Laying of Sewer line & Construction of RCC Manhole Chamber at Bhujade Mohalla, Juni Mangalwari & various Places in pr no 22. | 420110 | 4300 |
| 4 | Repairing & Renovation of Various Civil Works at Indora Mat Mohalla Samaj Bhavan Parisar, Nagpur. | 838659 | 8400 |
| 5 | Repairing & Renovation of Various Civil Works at Buddhistva Indora Mat Mohalla Samaj Bhavan, Nagpur. | 838709 | 8400 |
| 6 | Repairing & Renovation of various Civil works at Savli Sahari Beghar Nivara Hansapuri School, Timki Bhankheda, Nagpur. | 839141 | 8400 |
| 7 | Repairing & Renovation of Various Civil Works at Beauty Kanya School, Sitabuldi Nagpur. | 839837 | 8400 |
| 8 | Providing & Laying Sewer line H/o Sunanda Prasad at Bhivshenkhori in pr no 13. | 415733 | 4200 |
| 9 | Providing & Laying Sewer line at Hajaripahad & Various Places, Slum area in pr no 13. | 830001 | 8300 |
| 10 | Providing & fixing Board & various Work for Smart Toilet at Sugat Nagar. | 419768 | 4200 |

**Note : (1)** Tender sale & submission start date : 27/09/2024. **(2)** Tender submission end date/sales end date : 04/10/2024 up to 5.00 pm. **(3)** Date of opening of Tender (if possible) date : 07/10/2024 up to 5.00 pm. **(4)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in uploaded tender document.

**Advt No : 565/PR, Dt : 27/09/2024** **Executive Engineer (SLUM), N.M.C., Nagpur**

# आरोग्याच्या वाढत्या गंभीर समस्येला जबाबदार कोण?

**जागतिक हृदय दिन विशेष**
**२९ सप्टेंबर २०२४**

देशात घातक आजार, मानसिक ताणतणाव, घटते आयुर्मान आणि अकाली मृत्यू यामध्ये आपल्या आधुनिक जीवनशैलीचा विशेष वाटा आहे. आधुनिक जीवनशैली जगणाऱ्या तरुणांना हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता जास्त असते. आजकाल खेळताना चक्कर आल्याने पडण्याच्या घटना लहान मुलांपासून ते किशोरवयीन मुलांपर्यंत पहायला व ऐकायला मिळतात, लोक बसल्या बसल्या खाली कोसळतात आणि अनेक वेळा त्वरित आवश्यक आपत्कालीन वैद्यकीय मदतीअभावी जीव गमवातात.



**डॉ. प्रितम भी. गेडाम**
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

हृदयविकाराच्या समस्या फार वाढल्या आहेत. आज आपण ते खातो-पितो जे प्राण्यांनाही खाण्यास योग्य नाही. आपल्या पारंपारिक खाद्यपदार्थांची जागा पाश्चात्य फास्ट फूड, जंक फूड आणि अस्वास्थ्यकर आहाराने घेतली आहे. लहानशा जिभेच्या चवीसाठी आपल्या संपूर्ण शरीराला इजा होते.

आपण चवीच्या आधारावर खाद्यपदार्थ निवडतो, हे खूप दुर्दैवाची गोष्ट आहे, जेव्हा की हे नेहमी आरोग्याच्या आधारावर असले पाहिजेत. अनेकदा असे दिसून येते की बहुतेक लोक पोट भरण्यासाठी खातात, परंतु ते किती कॅलरीज, कोणत्या प्रकारात आणि कोणत्या गुणवत्तेत घेत आहेत, शरीरातील वाईट कोलेस्टेरॉलचे प्रमाण सतत वाढत आहे आणि पचनसंस्था कमकुवत होत आहे याचा विचार करीतच नाही.

अन्नात आवश्यक पोषक तत्वांचा अभाव, अस्वच्छता, अशुद्ध हवा व पाणी, पुरेशी झोप न होणे, वाढते वजन, व्यायामाचा अभाव, अशुद्ध वातावरण, गोंगाट, कामाचा ताण, घरगुती कलह, मानसिक ताणतणाव, अंमली पदार्थांचे व्यसन यामुळे आजार झपाट्याने वाढत आहेत. मानवी शरीर मागील दशकाच्या तुलनेत कमकुवत असल्याचे दिसते, आता हवामानात बदल होताच विविध रोगांचा प्रादुर्भाव मानवी शरीरावर लवकर होतो, कारण रोगप्रतिकारक शक्ती कमी होत आहे.

तळलेले पदार्थ, प्रक्रिया केलेले पदार्थ, प्रक्रिया केलेले मांस, जास्त साखर असलेले पदार्थ आणि पेये, चरबीयुक्त पदार्थ, खारट पदार्थ, सोडा, मैदा, जास्त मलाईयुक्त डेअरी उत्पादने, आइस्क्रीम, ट्रान्स फॅट्स, लोणी, लाल मांस, बटाटा चिप्स, फ्रेंच फ्राईज, कुकीज, पाम तेल, पिज्झा, बेक केलेले पदार्थ, पांढरा ब्रेड, पास्ता, सॉसेज, पॉलिश्ड धान्ये, कॅन केलेला सूप किंवा खाद्य कंपन्यांचे प्रक्रिया केलेले पदार्थ मानवी शरीरासाठी हानिकारक आहेत.





कारण ते आपल्या आवश्यक पोषक तत्वांच्या गरजा पूर्ण करत नाहीत, ते वापरले नाही तर चांगले आहे. परंतु आपण साखर आणि मीठ वापरणे थांबवू शकत नाही, परंतु ते मर्यादित करणे किंवा त्यांचा इतर योग्य पर्याय वापरणे आवश्यक आहे. हे पदार्थ शरीरात स्लो पॉयझन म्हणून काम करतात आणि शरीरात सातत्याने वाढत असलेले वाईट घटक जेव्हा मर्यादेच्या पलीकडे जातात तेव्हा ते मानवी अवयव निकामी करू लागतात आणि त्याचे रूपांतर प्राणघातक आजारांमध्ये होते.

भारतातील बहुसंख्य मृत्यू आणि अपंगत्वासाठी हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग जबाबदार आहेत. २०२२ मध्ये भारतीयांमध्ये हृदयविकाराच्या झटक्यांमध्ये १२.५ टक्के वाढ झाली आहे. अस्वास्थ्यकर आहार, उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्टेरॉल, मधुमेह आणि जास्त वजन यासह हे धोके आता देशातील एकूण आजारांच्या ओझ्यापैकी एक चतुर्थांश आहेत.

देशातील एकूण मृत्यूंपैकी ६० टक्क्यांहून अधिक मृत्यूसाठी असंसर्गजन्य रोग जबाबदार आहेत. हृदय आणि फुफ्फुसाचे आजार, पक्षाघात, कर्करोग आणि मधुमेहामुळे दरवर्षी सुमारे ५.८ दशलक्ष भारतीय आपला जीव गमावतात. कर्करोग आणि मधुमेहाच्या वाढत्या प्रवृत्तीसह हृदयविकार हे दोन दशकांहून अधिक काळ भारतातील मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. २०२१ मध्ये जागतिक स्तरावर सर्वात मोठा किलर हा इस्केमिक हृदयरोग होता, जो जगातील सर्व मृत्यूंपैकी १३ टक्के मृत्यूसाठी जबाबदार ठरला.

२०२२ मध्ये भारतातील सरासरी आयुर्मान ६७.७४ वर्षे होते. २०२३ पर्यंत मोनॅकोमधील पुरुष आणि महिलांचे आयुर्मान अनुक्रमे ८४ आणि ८९ वर्षे होते, तर दक्षिण कोरिया, हाँगकाँग, मकाऊ आणि जपानमधील पुरुष आणि स्त्रिया ८१ आणि ८७ वर्षे होती.

ग्रामीण भागातील १७ टक्के वृद्धांना आणि शहरी भागातील २९ टक्के वृद्धांना जुनाट आजार आहेत. सर्व जुनाट आजारांपैकी ६८ टक्के उच्च रक्तदाब आणि मधुमेहाचा वाटा आहे. पाश्चिमात्य देशांपेक्षा भारतात १०-१५ वर्षे आधी हृदयविकार आढळतो हे खूप आश्चर्यकारक आहे. भारतातील मृत्यूंपैकी २४.८ टक्के मृत्यू हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांमुळे होतात, त्यानंतर श्वसनाच्या आजारांमुळे १०.२ टक्के मृत्यू होतात, तर घातक आणि इतर ट्यूमरमुळे ९.४ टक्के मृत्यू होतात.

२०१९ मध्ये प्रदूषणामुळे भारतात २.३ दशलक्षाहून अधिक अकाली मृत्यू झाल्याचे लॅन्सेट अभ्यासात आढळून आले आहे. युनिसेफ आणि अन्न व कृषी संघटनेच्या अहवालानुसार भारतातील ४५ टक्के मुले अविकसित आहेत आणि दरवर्षी पाच वर्षांखालील ६ लाख मुलांना अपुरा शुद्ध पाणीपुरवठा, पौष्टिक आहाराचा अभाव आणि अस्वच्छ परिस्थितीमुळे जीव गमवावा लागतो. शुद्ध पाण्याअभावी दरवर्षी सुमारे २ लाख मृत्यू होतात.

अमेरिकेसह ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, चीन, ब्राझील आणि इंडोनेशियासारख्या देशांपेक्षा भारतात तणावाची पातळी जास्त आहे. आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्सच्या २०२३ इंडिया वेलनेस इंडेक्स अभ्यासानुसार, भारतातील प्रत्येक तिसरा व्यक्ती तणावाचा सामना करत आहे. अहवालात असे म्हटले आहे की ७७ टक्के भारतीयांना नियमितपणे तणावाचे किमान एक लक्षण जाणवते.

भारतात मानसिक आरोग्य व्यावसायिकांची तीव्र कमतरता आहे, प्रति एक लाख लोकांमागे केवळ ०.०७ मानसोपचारतज्ज्ञ आणि ०.१२ मनोचिकित्सक परिचारिका आहेत. बऱ्याचदा, या व्यावसायिकांना नैराश्याचा सामना करण्यासाठी थोडेफार किंवा कोणतेही प्रशिक्षण नसते.

इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन २०२४ नुसार, भारतीय लोकांमध्ये जगात सर्वाधिक लोक आहेत जे दर आठवड्याला सरासरी ४५ तासांपेक्षा जास्त काम करतात, विशेषतः खाजगी संस्था आणि व्यवसायांमध्ये. यामध्ये आपला देश भूतान, लेबनॉन, लेसोथो, संयुक्त अरब अमिराती आणि पाकिस्तान या देशांच्या मागे आहे.

मोठमोठ्या कारखान्यांमधून निघणारे विषारी पाणी आणि धूर आजूबाजूचे वातावरण विषारी करतात. शेतात हानिकारक रासायनिक खतांचाही मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. अलीकडेच एका नवीन अभ्यासातून असे समोर आले आहे की, जगात सर्वाधिक प्लास्टिकचे प्रदूषण भारतातून होत आहे.

देशात सर्व प्रकारच्या प्रदूषणाचीही गंभीर समस्या आहे. हानिकारक कचरा आणि भेसळ या गंभीर समस्येतही आपण अग्रेसर आहोत. शहरातील रस्त्यांवर लोकांपेक्षा जास्त वाहतूक कोंडी दिसून येते. बहुतांश राज्यांमध्ये भंगार असलेल्या सरकारी बसेस आणि स्थानिक प्रशासनाकडून चालवल्या जाणाऱ्या बसेसही प्रदूषण करतात.

शहरांमधून वाहणाऱ्या बहुतांश नद्या ह्या नाल्यांच्या रूपात दिसतात. बांधकाम साइट्स आणि फॅक्टरी क्षेत्रातील बहुतेक कामगार धुळीच्या वातावरणात सुरक्षा साधन व मास्कशिवाय काम करतात. घटणारी जंगले, वाढती काँक्रीटची जंगले, कचऱ्याचे ढीग, ग्लोबल वॉर्मिंग यामुळे सजीवांना धोका निर्माण झाला आहे. वर्षभर हवामानाची परिस्थिती क्षणोक्षणी बदलत राहते, त्यामुळे वर्षभर आजार सुरूच राहतात आणि देशात आरोग्याच्या अपुऱ्या सुविधा असूनही रुग्णालये सतत रुग्णांनी भरलेली असतात.

आता याला नियमांचे उल्लंघन म्हणा किंवा निष्काळजीपणा म्हणा, पण याची शिक्षा आपल्या सर्वांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यास होते, आर्थिक तोटे होतात ते वेगळेच.

भेसळ, प्रदूषण, भ्रष्टाचार यांवर पूर्णपणे नियंत्रण ठेवू न शकणारे आणि प्रत्येकाला पुरेशा आरोग्य सुविधा, पौष्टिक आहार आणि शुद्ध पाणी-प्राणवायू उपलब्ध करून देऊ न शकणारे प्रशासन याला जबाबदार आहे का? किंवा ते स्वार्थी लोक जबाबदार आहेत जे केवळ स्वतःच्या फायद्यासाठी चुकीचे कृत्य करून पर्यावरण आणि सामान्य जनतेच्या आरोग्याची हानी करतात, किंवा आपणच जबाबदार आहोत? जे आपल्या आरोग्याची काळजी घेऊ शकत नाहीत,

कारण अस्वच्छ आहार, अंमली पदार्थांचे व्यसन, अशुद्धता, आळस, आधुनिक जीवनशैली आपल्याला मारत आहे पण आपण सुधारत नाही आहोत. ही जनजागृती प्रत्येकाची जबाबदारी आहे,

आपण सर्वांनी अमूल्य जीवनाचे मूल्य समजून घेतले पाहिजे. जर आपण आताच जागे झालो तर आनंदी आणि निरोगी भारताची निर्मिती करून आरोग्य समस्यांवर दरवर्षी अब्जावधी डॉलर्सची बचत करू शकतो आणि वाढत्या गंभीर आजारांचा वेगही कमी करू शकतो.

●●●●●●●●●

# पीडित जमीन मालकांना मिळणार वक्फ दुरुस्ती विधेयकामुळे दिलासा

**संतोष लांजेवार**
**वरिष्ठ पत्रकार**
**मानकापूर, नागपूर.**

संसदेत वक्फ दुरुस्ती विधेयक - २०२४ मांडण्यात आले. देशभरात काही मुस्लिम बांधवांनी या विधेयकाचे स्वागत केले तर काहींनी विरोधही केला आहे. ज्या लोकांनी स्वागत केले आहे, त्यांनी या विधेयकाचा बरोबर अभ्यास केला नाही, असे म्हटले जात आहे.

वास्तविक परिस्थिती अशी आहे की वक्फ बोर्डाच्या कचाट्यात देशभरातील अनेक जमिनींचा वाद सुरू आहे. त्यामुळे मूळ जमीन मालक त्रस्त आहेत. या वक्फ दुरुस्ती विधेयकामुळे पीडित जमीन मालकांना दिलासा मिळेल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

देशातील सर्व 'वक्फ' बोर्डाकडे आठ लाख एकरपेक्षा जास्त जमिनीवर पसरलेल्या एकूण 8 लाख 54 हजार 509 मालमत्ता आहेत. 2009 मध्ये 'वक्फ बोर्डा'च्या मालमत्ता चार लाख एकर जमिनीवर पसरल्या होत्या. गेल्या 13 वर्षांत 'वक्फ बोर्डा'च्या मालमत्तांमध्ये दुपटीने वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

सध्या देशात वक्फची चर्चा जोरात सुरू आहे.

नुकतीच वक्फ दुरुस्ती विधेयक, २०२४ साठी जेपीसीची स्थापना करण्यात आली. वक्फ दुरुस्ती विधेयक संसदेत मांडण्यात आले होते. काँग्रेस आणि सपासह अनेक विरोधी पक्षांनी या विधेयकाला विरोध केला. त्याचबरोबर या विधेयकाद्वारे वक्फ बोर्डाला देण्यात आलेल्या अमर्याद अधिकारांवर अंकुश ठेवला जाईल आणि त्याचे व्यवस्थापन अधिक चांगल्या आणि पारदर्शक पद्धतीने केले जाईल, असे सरकारने म्हटले आहे. सभागृहात गदारोळ होत असताना सरकारने तो संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्याची शिफारस केली आहे. विधेयक सादर होण्यापूर्वीच काँग्रेससह विरोधी पक्ष संयुक्त संसदीय समितीकडे म्हणजेच जेपीसीकडे पाठवण्याची मागणी करत होते.

**वक्फ बोर्डाचे नवीन प्रस्तावित विधेयक**

नवीन विधेयकानुसार, न्यायाधिकरणा व्यतिरिक्त, जमिनीवर दावा करणाऱ्या व्यक्तीला महसूल न्यायालय, दिवाणी न्यायालय किंवा उच्च न्यायालयात अपील करता येणार आहे.

आता वक्फ न्यायाधिकरणाच्या निर्णयावर उच्च न्यायालयात अपील करता येईल. जर कोणी वक्फला जमीन दान केली नसेल. त्यावर मशीद बांधली तरी ती वक्फची मालमत्ता होणार नाही. वक्फ बोर्डात 2 महिला आणि 2 इतर धर्माच्या सदस्यांना प्रवेश मिळेल.

नव्या कायद्यात 44 दुरुस्त्या केंद्राने सुचविल्या आहेत. यापूर्वी 1923 मध्ये केलेला कायदा व 1975 मध्ये त्यात काही दुरुस्त्या करून मंडळांना जादा अधिकार दिले होते. नव्या दुरुस्ती कायद्यात केवळ मंडळावर मुस्लिम असतीलच असे नाही, तर गैरमुस्लिम प्रतिनिधींचा त्यात समावेश करून शिया, सुन्नी, बोहरा, आगाखानी यांनाही सहभागी करून घेतले जाईल. शिवाय मंडळावर दोन मुस्लिम महिलांचा समावेश होईल.

**या कायद्याची गरज काय आहे?**

विशेष म्हणजे जगात दुसरीकडे कुठेच वक्फ नावाची संस्था नाही. अगदी ज्या देशांमध्ये शरिया कायदा चालतो तिथेही नाही. धर्माच्या आधारावर भारतापासून वेगळे होऊन आपले स्वतंत्र राष्ट्र तयार केलेल्या पाकिस्तानातही नाही. फक्त भारतात, जिथे मुस्लिम हे अल्पसंख्याक आहेत, तिथे ही संस्था आहे. ज्याद्वारे एका विशिष्ट धर्माला देशभरातील कोणत्याही जागेवर आपला हक्क बजावण्याचा अधिकार संवैधानिकरित्या दिला गेला आहे आणि तोही केवळ एका राजकीय पक्षाच्या व्होट बँक पॉलिटिक्सच्या कृपेने.

महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाकडे उपलब्ध असलेल्या ऑनलाइन डेटानुसार राज्यातील एकूण ९२ हजार एकर जमिनीवर 23 हजार 566 नोंदणीकृत वक्फ बोर्डाची मालमत्ता आहे. एका कट्टर धार्मिक संस्थेकडे देशाची एवढी मालमत्ता असणे योग्य आहे का? यामुळेच नवीन कायद्याची गरज भासली आहे.

म्हणजेच, महाराष्ट्रात एकूण ४१ हजार गावे तर ३७८ निमशहरी व शहरी गावे आहेत. त्यानुसार विचार केला तर, प्रत्येक गावात कमीत कमी २ एकर जमीन वक्फकडे आहे. याचाच दुसरा अर्थ दरवर्षी वक्फ बोर्डकडे १५०० एकर जमीन नव्याने समाविष्ट होते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५४ साली वक्फचा कायदा तर महाराष्ट्रात १९६० साली वक्फ बोर्डाची निर्मिती झाली. फक्त ६४ वर्षात वक्फकडे एक लाख एकर जमीन आली कुठून ? इस्लामिक शरिया कायद्याप्रमाणे एकदा वक्फ झालेली जमीन कोणत्याही परिस्थितीत परत मूळ मालकाकडे जात नाही. ती संपत्ती कायमस्वरूपी इस्लामची आहे. त्यावर कुठलाच भारतीय कायदा काहीही करू शकत नाही.

भारतात असलेल्या न्यायसंस्थेसमोर केंद्र सरकारदेखील नमते घेते अशा न्यायपालिकेपेक्षाही जास्त अधिकार वक्फला देण्यात आले आहेत. त्याअंतर्गत कोणतीही मालमत्ता वक्फ मालमत्ता म्हणून घोषित करण्याचा अधिकार मंडळाला दिला जातो. एवढेच नाही तर जर वक्फने तुमची मालमत्ता नोंदणीकृत वक्फची मालमत्ता म्हणून घोषित केली तर तुम्ही त्या विरोधात न्यायालयात जाऊ शकत नाही. तुम्हाला त्यासाठी वक्फकडेच जावे लागेल. वक्फ बोर्डाचा निर्णय तुमच्या विरोधात आला तर वक्फचा निर्णय हा अंतिम निर्णय असेल.

वक्फ कायद्याचे कलम 85 म्हणते की, न्यायाधिकरणाच्या निर्णयाला उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयातही आव्हान देता येत नाही. आतापर्यंत १९५ तक्रारी वक्फ अतिक्रमण विरोधात, तर ९३ तक्रारी वक्फ अधिकाऱ्यांविरोधात नोंदविल्या गेल्या आहेत. त्याचप्रमाणे १२९२७ खटले वक्फ मंडळात, तर १९२०७ खटले वक्फ न्यायाधिकरणात प्रलंबित आहेत.

1000 वर्षे जुन्या मंदिरांवर आणि प्रामुख्याने हिंदुबहुल भागांवरही दावे सांगून राज्यांतील वक्फ बोर्डाने गेल्या काही वर्षांमध्ये दुष्ट पद्धतीचे वर्तन केले आहे

याच कायद्याचा फटका स्वःत मुस्लिमानासुद्धा बसला आहे. मध्यंतरी हरियाणातील एका मुस्लिम कुटुंबाबाबतीतदेखील अशीच घटना घडली आहे. ते कुटुंब एका मशिदीचे चालक आणि मालक होते. ती मशीद त्यांनीच बांधली होती. आता ती जागा वक्फची असल्याचा दावा केल्यामुळे त्यांना त्या जागेवरून हाकलून देण्यात आले आहे.

हा कायदा वक्फ बोर्डाला व्यापक अधिकार प्रदान करत असल्याने आणि वक्फ मालमत्ता देशभरात सुमारे लाखो एकर व्यापत असल्याने ते तिसरे सर्वात मोठे जमीन मालक बनतात आणि विद्यमान कायद्यांच्या संरक्षणाखाली राष्ट्रीय संसाधनांच्या गुप्त अधिग्रहणाबद्दल चिंता वाटू लागते.

■ ■ ■

# मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे अध्वर्यू

भारतीय पत्रकार, समाजसुधारक, विचारवंत, कार्यकर्ता, लेखक, सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटी अशा अनेकविध क्षेत्रात आपल्या कार्याची अमिट छाप सोडणारे मुस्लिम सत्यशोधक चळवळीचे अर्ध्वयू हमिद दलवाई यांची आज जयंती. नास्तिक असूनही त्यांनी भारतीय मुस्लिम समुदायामध्ये अनेक आधुनिकतावादी आणि उदारमतवादी सुधारणांसाठी प्रयत्न केले. विशेष म्हणजे १९६० च्या दशकात तिहेरी तलाक आणि बहुपत्नी प्रथेविरुद्ध त्यांचे आंदोलन गाजले होते. यांनी अनेक पुस्तके देखील लिहिली आहेत, ज्यात मुस्लिम पॉलिटिक्स इन सेक्युलर इंडिया समाविष्ट आहे.

हमिद दलवाई यांचा जन्म २९ सप्टेंबर १९३२ रोजी ब्रिटिश राजवटीत बॉम्बे प्रेसिडेन्सीच्या (आताचा महाराष्ट्र) मिरजोली गावात मराठी भाषिक मुस्लिम कुटुंबात झाला . माध्यमिक शिक्षण त्यांनी चिपळूण येथे घेतले . १९५१ मध्ये मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी मुंबईतील इस्माईल युसूफ कॉलेज आणि रुपारेल कॉलेजमध्ये शिक्षण घेतले .

१९५० च्या मध्यापासून ते १९६० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात, त्यांची समाजवादी पक्षाच्या राजकीय आणि सांस्कृतिक शाखा, राष्ट्र सेवा दलाशी ओळख झाली. त्यांनी मौज, सत्यकथा, वसुधा यांसारख्या मासिकांतून लघुकथा लिहिण्यास सुरुवात केली.

दलवाई यांनी तरुणपणात जय प्रकाश नारायण यांच्या भारतीय समाजवादी पक्षात प्रवेश केला, परंतु मुस्लिम समाजातील सामाजिक सुधारणांसाठी, विशेषतः महिलांच्या हक्कांबाबत स्वतःला समर्पित करण्यासाठी त्यांनी ते सोडले. ज्या काळात बहुतेक लोक कट्टर धार्मिक आणि सनातनी होते अशा काळात राहूनही, हमीद दलवाई हे काही धार्मिक धर्मनिरपेक्ष लोकांपैकी एक होते. त्यांनी धर्मविशिष्ट कायद्यांऐवजी समान नागरी संहितेसाठी प्रयत्न केले आणि भारतात तिहेरी तलाक रद्द करण्यासाठी संघर्ष केला .



आपल्या विचारांना आणि कार्यासाठी एक व्यासपीठ तयार करण्यासाठी, त्यांनी २२ मार्च १९७० रोजी पुण्यात मुस्लिम सत्यशोधक मंडळ (मुस्लिम ट्रुथ सीकिंग सोसायटी) ची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून, हमीद यांनी मुस्लिम समाजातील विशेषतः महिलांबद्दलच्या वाईट प्रथा सुधारण्याचे काम केले.

त्यांनी अनेक मुस्लिम महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी मदत केली. मुस्लिमांना त्यांची मातृभाषा उर्दू ऐवजी राज्य भाषेत शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी त्यांनी मोहीम चालवली. त्यांनी भारतीय मुस्लिम समाजात दत्तक घेणे ही एक स्वीकार्य प्रथा बनवण्याचा प्रयत्न केला.

त्यांनी इंडियन सेक्युलर सोसायटीचीही स्थापना केली. त्यांनी अनेक सार्वजनिक सभा, मेळावे, अधिवेशने आणि परिषदा चांगल्या सामाजिक पद्धतींच्या प्रचारासाठी आयोजित केल्या. ते उत्तम मराठी साहित्यिकही होते. त्यांनी इंधान (इंधन) - एक कादंबरी, लाट (वेव्ह) - लघुकथा आणि धर्मनिरपेक्ष भारतातील मुस्लिम राजकारण यांचा संग्रह - एक विचारप्रवर्तक पुस्तक लिहिले.

त्यांच्या सामाजिक कार्यातील एक अभूतपूर्व घटना म्हणजे त्यांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी त्यांनी मंत्रालयावर (दक्षिण मुंबईतील महाराष्ट्राचे प्रशासकीय मुख्यालय, १९५५ मध्ये बांधलेले) मुस्लिम महिलांचा मोर्चा काढला. हमीद दलवाई यांनी प्रचंड समतोलपणाने विरोधाचा सामना केला आणि यशाच्या संथ गतीने नाउमेद न होता सामाजिक सुधारणेसाठी कार्य केले. या गुणांमुळेच थोर मराठी प्रतिभावंत पु.ल.उर्फ पुला देशपांडे यांनी त्यांचे वर्णन एक महान समाजसुधारक म्हणून केले आणि त्यांना महात्मा ज्योतिबा फुले आणि आंबेडकर या महान भारतीय नेत्यांप्रमाणेच कंसात ठेवले.

३ मे १९७७ रोजी वयाच्या ४४ व्या वर्षी प्रगतीशील मूत्रपिंड निकामी झाल्याने त्यांचे निधन झाले.

**साहित्यिक कार्य**

दलवाई यांनी पत्रकार म्हणून काम केले. मराठीत लॅट (द वेव्ह) आणि इंधान (इंधन) आणि इंग्रजीत मुस्लिम राजकारण, सेक्युलर इंडिया , मराठीत इस्लामचे भारतीय चित्र (इस्लामची भारतीय कथा), राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुस्लिम (राष्ट्रीय एकता आणि भारतीय मुस्लिम) यांचा समावेश आहे . त्यांनी ₹१० रूपयांची गोष्ट नावाची एक लघुकथा देखील लिहिली आहे, जी नंतर धनुर्धारी मासिकात प्रकाशित झाली.

२०१७ मध्ये अभिनेत्री ज्योती सुभाष यांनी हमीद दलवाई यांच्यावर एक माहितीपट बनवला होता . मुस्लीम सत्यशोधक मंडळ महाराष्ट्रात हमीद दलवाईंच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आणि समता, महिला सक्षमीकरण आणि हिंदू-मुस्लिम बंधुता याविषयी जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्रात विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करत आहे. ट्रस्टतर्फे सत्यशोधक पुरस्काराने मान्यवर व्यक्तींचाही सत्कार केला जातो.

२०१९ मध्ये, प्रख्यात मानवतावादी सुश्री झीनत शौकत अली आणि प्रख्यात लावणी लेखक-कवी लोकशाहीर बशीर मोमीन कवठेकर यांना 'सत्यशोधक पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

●●●●●●●●●

# रंगांधळेपणा

**अंतिम भाग**



(कालच्या अंकावरून पुढे)

------------

**इलेक्ट्रोफिजियोलॉजी टेस्ट :** (ईआरजी) इलेक्ट्रोरेटिनोग्राफी डोळ्याच्या प्रकाश-संवेदनशील पेशींच्या विद्युत प्रतिसादाचे मोजमाप करते, ज्यामुळे रंग दृष्टीवर परिणाम करू शकणाऱ्या दृष्टिपटलाच्या स्थितीचे निदान करण्यात मदत होते.

**दृश्य क्षेत्र विश्लेषण:** रंगांच्या आकलनावर परिणाम करू शकणारी कोणतीही कमतरता किंवा विसंगती शोधण्यासाठी दृष्टीच्या संपूर्ण क्षेत्राचे मूल्यांकन करते.

**फंडस ऑटोफ्लोरेसेन्स:** दृष्टी आणि रंगाच्या आकलनावर परिणाम करू शकणाऱ्या असामान्य साठ्यांसाठी किंवा बदलांसाठी दृष्टिपटल तपासते.

**वैद्यकीय व्यवस्थापन:** रंगांधळेपणा आपोआप बरा होत नसला तरी, दृष्टीवर परिणाम करू शकणाऱ्या अंतर्निहित परिस्थितींचे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ, रेटिनल किंवा ऑप्टिक नर्व्हच्या समस्यांवर उपचार केल्याने कॉन्ट्रास्ट सेन्सिटीव्हीटी आणि एकंदर दृश्य कार्य

**कलर करेक्टीव्ह लेन्स:** विशेष चष्मा किंवा कॉन्टॅक्ट लेन्स, जसे की एनक्रोमा किंवा इतर कंपन्यांनी डिझाइन केलेले, प्रकाशाच्या विशिष्ट तरंगलांबी फिल्टर करून रंगभेद वाढवू शकतात.

**ॲप्स आणि तंत्रज्ञान:** विविध स्मार्टफोन ॲप्स व्यक्तींना रंग ओळखण्यास आणि वेगळे करण्यास मदत करू शकतात, दैनंदिन क्रियाकलापांमध्ये व्यावहारिक साह्य उपलब्ध करून देतात.

**जीवनशैलीतील बदल:** डोळ्यांचे एकूण आरोग्य राखणे रंगांधळेपणाच्या प्रभावी व्यवस्थापनास मदत करते.

**संतुलित आहार:** अ, क आणि ई जीवनसत्त्वे तसेच अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असलेला आहार डोळ्यांच्या आरोग्यास मदत करतो. गाजर, हिरव्या पालेभाज्या आणि लिंबूवर्गीय फळे यासारखे पदार्थ फायदेशीर आहेत.

**नियमितपणे डोळ्यांची तपासणी:** डोळ्यांच्या तज्ञांकडून नियमित तपासणी दृष्टीतील बदलांवर लक्ष ठेवू शकते आणि कोणत्याही समस्यांचे त्वरित निराकरण करू शकते.

**संरक्षणात्मक आयवेअर:** सनग्लासेस आणि इतर संरक्षणात्मक आयवेअर डोळ्यांना अतिनील किरणे आणि पर्यावरणीय घटकांपासून संरक्षण देऊ शकतात जे दृष्टीच्या गुणवत्तेवर परिणाम करू शकतात.

**सामाजिक आणि कौटुंबिक साह्य:**

**सर्वसमावेशक रचना:** रंगांव्यतिरिक्त मजकूर लेबल, नमुने किंवा चिन्हे समाविष्ट करणाऱ्या कलर-कोडिंग प्रणालींचा वापर करा, जेणेकरून रंगांधळे असलेल्यांना माहिती उपलब्ध होईल.

**स्पष्ट वर्णन:** रंगांधळी व्यक्ती कार्ये प्रभावीपणे पूर्ण करू शकतात हे सुनिश्चित करण्यासाठी रंगावर अवलंबून असलेल्या कार्यांसाठी किंवा सूचनांसाठी तोंडी वर्णन द्या.

शिक्षण आणि जागरूकता: रंगांधळेपणा आणि त्याच्या आव्हानांविषयी जागरूकता वाढवल्याने समुदाय आणि कार्यालयीन ठिकाणी समजूतदारपणा आणि समर्थन वाढवता येऊ शकते.

**दैनंदिन जीवनावर परिणाम**

**शैक्षणिक आव्हाने:** रंगांधळेपणा असलेल्या विद्यार्थ्यांना कलर-कोड साहित्य आणि उपक्रमांसह संघर्ष करावा लागू शकतो, ज्यामुळे निवास किंवा शिक्षणाच्या पर्यायी पद्धतींची आवश्यकता भासू शकते.

**व्यावसायिक परिणाम:** रचना, कला किंवा वाहतूक व्यवस्थापन यासारख्या रंग धारणेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या क्षेत्रांतील कारकीर्द रंगांधळेपणा असलेल्या व्यक्तींसाठी आव्हाने निर्माण करू शकतात. कामाच्या ठिकाणचे रुपांतर आणि साधने ही आव्हाने कमी करण्यास मदत करू शकतात.

**दैनंदिन कामे:** रंगांधळे असलेल्यांसाठी खरेदी, स्वयंपाक करणे किंवा सार्वजनिक ठिकाणी मार्ग शोधणे यासारख्या साध्या क्रिया गुंतागुंतीच्या होऊ शकतात. अनुकूल साधने आणि धोरणे वापरातील अडचणी कमी करू शकतात.

व्यावसायिक मदत कधी घ्यावी. रंगांधळेपणाची लक्षणे आढळल्यास किंवा रंगांच्या आकलनाबद्दल चिंता असल्यास, डोळ्यांची सखोल तपासणी करणे आवश्यक आहे. व्यावसायिक मदत मिळवण्याच्या प्रमुख निर्देशकांमध्ये हे समाविष्ट आहे.

**हाय रिफलेक्टीव्ह एरर:** जवळची दृष्टी किंवा दूरदृष्टी यासारख्या लक्षणीय दृष्टी समस्या रंगांच्या आकलनावर परिणाम करू शकतात.

**डोळ्यांच्या हालचालींचे विकार:** डोळ्यांच्या असामान्य हालचाली, जसे की जलद अनैच्छिक हालचाली, रंग दृष्टीवर परिणाम करू शकतात.

**प्रकाशाची संवेदनशीलता:** तेजस्वी दिव्यांची अडचण किंवा मंद प्रकाशाला प्राधान्य देणे हे अंतर्निहित दृष्टीच्या समस्या दर्शवू शकते.

**कौटुंबिक इतिहास:** रंगांधळेपणाचा कौटुंबिक इतिहास ही स्थिती वारशाने मिळण्याची शक्यता वाढवतो.

**संबंधित सिंड्रोम:** रंगीत दृष्टीच्या कमतरतेशी संबंधित अनुवांशिक स्थिती किंवा सिंड्रोमसाठी विशेष मूल्यांकन आणि व्यवस्थापनाची आवश्यकता असू शकते.

**डोळ्यांवर झालेला आघात:** डोळा किंवा रेटिनाला झालेल्या दुखापतींमुळे रंगाच्या आकलनावर परिणाम होऊ शकतो, वेळेवर काळजी घेणे आवश्यक असते.

●●●●●●●●●

## अशोकायन

### टाळु शकता ..!

**जशी करणी**
**तशी भरणी**
**शाश्वत सत्य**
**आहे जिवणी ..!**

**रोपटे लावले बाभळीचे**
**तर येणारच त्यास काटे**
**नको यावयास दुःखाश्रु**
**भविष्यात डोळयावाटे ..!**

**विचार करुनच**
**करावी कृती**
**जीवनी ना येई**
**पश्चातापाची स्थिती ..!**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# वाडीतील उड्डाणपुलाचे लोकार्पण ६ ऑक्टोबरला

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २८ :

येथील नागपूर अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील वाडी पोलीस ठाणे ते गुरूद्वारा पर्यंतच्या 2.3 किलोमीटरचे काम पूर्ण झाले असून उड्डाणपुलाचे लोकार्पण रविवार 6 ऑक्टोबरला होणार आहे. वाडीतील उड्डाणपूल बांधकामाचे भूमिपूजन 2 मार्च 2022 रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमदार समीर मेघे यांच्या उपस्थितीत विधिवत पार पडले.




एकुण 245 कोटी रुपयाचे बहुप्रतिक्षित वाडी उड्डाणपूल रहदारीसाठी 16 सप्टेंबर पासुन खुला केल्यामुळे वाहतुकदारांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले होते. गेल्या दोन-अडीच वर्षांपासून नागपूर आणि वाडी परिसरातील जनतेचा श्वास रोखणाऱ्या पुलाचे एका टप्प्याचे काम अखेर पूर्ण झाले आहे. नागपूर-अमरावती मार्गावरील वाडी-वडधामन्यातील ट्रान्सपोर्ट हब मुळे या मार्गावर वाडी परिसरात वाहनांची दिवसरात्र कोंडी होत होती. त्यामुळे सर्वाधिक त्रास विद्यार्थी आणि रुग्णांना व्हायचा. ते लक्षात घेता राष्ट्रीय महामार्ग 53 वरील रवीनगरपासून वाडीपर्यंतच्या एकूण 5.5 किलोमीटरच्या दोनटप्प्यांतील या उड्डाणपुलाची निर्मिती करण्याचे ठरले होते. त्यासाठी एकूण 478 कोटींचा खर्च मंजूर झाला होता. त्यानुसार उड्डाणपुलाच्या बांधकामाची जबाबदारी टी ॲन्ड टी कंपनीकडे सोपविण्यात आली.

मात्र, मधल्या काळात पुलाचे काम कासवगतीने सुरू होते. रस्त्याच्या मध्ये बांधकामाचे साहित्य अस्तव्यस्त पडून असल्याने सकाळपासून रात्री उशिरापर्यंत या मार्गावर वाहतुकीची प्रचंड कोंडी होऊ लागली. त्याचा प्रचंड त्रास नागरिक, दुकानदारासह सर्वांनाच होऊ लागला. नागरिकांकडून वारंवार ओरडही होऊ लागली. या पार्श्वभूमीवर संबंधित वरिष्ठांकडून कंत्राटदाराला आवश्यक तो डोज मिळाल्यानंतर कामाला गती मिळाली आणि अखेर 245 कोटींच्या पुलाच्या एका टप्प्याचे 2.3 किलोमीटरचे काम पूर्ण झाले त्यानुसार, आता रविवार ऑक्टोबरला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ. समीर मेघे यांच्या उपस्थितीत या उड्डाणपुलाचा लोकार्पण सोहळा पार पडणार आहे.

**नागरीकांना मिळणार वाहतुक कोंडी पासुन सुटका**

या उड्डाणपुलाच्या बांधकामाची जबाबदारी टी ॲन्ड टी नावाच्या कंपनीकडे सोपविण्यात आली होती. काम मार्च 2024 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. अडीच वर्षांच्या अविरत परिश्रमानंतर आणि अनेक अडचणीवर मात करून कंपनीने उद्दिष्ट निश्चित केले.

वर्षभरातच या उड्डाण पुलाच्या वरचे बांधकाम जवळपास पूर्ण झाले होते. नागपूरहून नवनीतनगर, आठवा मैल, वडधामना आणि अमरावतीकडे जाणाऱ्या वाहन चालकांना आणि अमरावतीकडून नागपूरकडे जाणाऱ्या वाहन चालकांना मोठी सोय सोय झाली असून सततच्या वाहतूक कोंडीपासून मुक्ती मिळणार आहे.

बांधकाम सुरू असताना कंपनीला वाडी नगरपरिषद, पोलिस विभाग, वाहतूक संस्था आणि नागरिकांचे खूप सहकार्य मिळाले आहे.

# अनियंत्रित ट्रकची ट्रॅव्हल्सला धडक

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २८ :

एकीकडे वाडीत वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी उड्डाण पुलासह मोठ्या सिमेंट रस्त्याचे बांधकाम तीव्र गतीने सुरू आहे. परंतु वाहन चालक मात्र या रस्त्यावरून गतीने वाहन चालवून अपघाताला आमंत्रण देत आहेत.



अशीच एक घटना शनिवार २८ सप्टेंबर रोजी सकाळी ५ वाजताच्या दरम्यान वाडीतील काटोल बायपास चौकात घडली. प्राप्त माहितीनुसार ट्रक क्रं.एम.एच.४०/सी.एम.-९५१७ चा चालक सुनील सोनवणे वय-२८, रा. बरघट जि.रायपूर हा आपला ट्रक घेऊन दाभ्याकडून वाडीच्या दिशेने येत होता.

दरम्यान अमरावती कडून नागपूरच्या दिशेने येणारी खुराना ट्रॅव्हल्सची बस क्रं .एम. एच.४०/बी.सी.-८७८३ ही काटोल बायपास चौकात पोहोचताच तीव्र गतीने येणारा ट्रक अनियंत्रित होऊन त्याने ट्रॅव्हल्स बसला मधोमध धडक दिली असता ट्रॅव्हल्स उड्डान पुलाच्या पिल्लर वर जाऊन धडकली. अपघाताचा आवाज होताच रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहन चालकांनी आपली वाहने थांबवून घटनास्थळाकडे धाव घेतली. या अपघातात ट्रॅव्हल्स चा पुढील भाग मोठ्या प्रमाणात क्षतीग्रस्त झाला. ट्रकचाही पुढील भाग चकनाचूर झाला. माहिती मिळताच वाडी पोलिसांनी घटनास्थळ गाठून अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या साह्याने हटवली. अपघात झाला त्यावेळी ट्रॅव्हल्स मध्ये चालक शिवाजी तुकाराम एकनारायण रा.वसंत पटेल नगर, हिंगोली सह २४ प्रवासी होते. परंतु सुदैवाने जीवितहानी न झाल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

# नागपूर कराराची होळी

## विदर्भ राज्य आंदोलन समितीचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी,
काटोल, दि. २८ :

विदर्भ राज्य. आं. समिती, शेतकरी कृती समिती वं विदर्भवादी काटोल यांच्या सहकार्याने शनिवार दि 28 सप्टेंबर ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ "नागपूर कराराची होळी "स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीची ज्योत काळम पेटवत ठेवण्याच्या दृष्टीने दरवर्षी प्रमाणे यावर्षी 28/9/53च्या नागपूर कराराची होळी करण्यात आली. विदर्भ आर्थिक दृष्टीने सपन्न आहे.

अलग झाल्यास आमची प्रगती आणखी होईल. जनतेला आमचा प्रश्न आहे. आम्हाला सांगा नागपूर करार हा विदर्भाच्या जनतेवर अन्याय नाही का? विदर्भाच्या लोकांचा राज्याची राजधानी मन्हूण नागपूर शहराशी घनिष्ठ सबंध आहे. हया अनुषंगाने फायदेही मिळवाळची जाणीव आम्हाला आहे.

विदर्भाच्या अमलाबजावणी करिता तज्ञाचा सल्ला विचारात घेऊन योग्य ते पाऊल उचलण्यात येईल हे करारात नमूद आहे.

वेगवेगळ्या घटकातील लोकांचा प्रशासकीय दृष्टीने अधिक चागल्या प्रकारे सहयोग साधने मन्हजे विकेंद्रिकरण होय यावेळी माजी. जि. पं. सदस्य सुरेशराव धोटे, बाबाराव वाघमारे, माजी सभापती डीगांबर डोंगरे, प्रा वीरेंद्र इंगळे, रामराव पाटील, मा. श्री महादेवराव नखाते, कृष्णाजी डफरे, नरेंद्रजी राऊत,देवेंद्रजी रोकडे, देविदासजी घायवंट, सौ पुष्पाताई सावरकर, सौ ज्योतीजी राऊत, प्रिया गोमासे, विनोद गावंडे, अरुणजी पर्बत, बापुजी आरघोडे, शामबाबू महानन्दे, सुरेंद्र सोमकुवर, समाजसेवक सतीश पाटील, आशिष सोमकुवर, सुरेंद्र सोमकुवर यावेळी वेगळ्या विदर्भाच्या समर्थनात घोषणा देण्यात आल्या. जोपर्यत वेगळा विदर्भ मिळत नाही तोपर्यत संघर्ष चालू ठेवण्याचा सर्वांनी सकल्प घेतला यावेळी मोठया संख्येने विदर्भवादी हजर होते.

### निधी बोरीकरला विभागीय जलतरण स्पर्धेत तीन पुरस्कार



■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २८ :

येथील सुरक्षानगर मधील सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र बोरीकर यांची कन्या लाव्हा येथील दिल्ली पब्लीक स्कूलची इयत्ता 9 वीची विद्यार्थीनी निधी बोरीकर (वय 14 वर्ष ) हिने नागपूर येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत 200 मीटर 400 मीटर मध्ये प्रथम, आणि 800 मीटर मध्ये द्वितीय क्रमांक मिळवून तिला विभागीय स्पधेर्साठी निवड करण्यात आली आहे.

वर्धा येथे आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत निधीने 200 मीटर जलतरणात प्रथम, 400 मीटरमध्ये द्वितीय आणि 800 मीटरमध्ये द्वितीय क्रमांक मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली. या निकालाच्या आधारे तिला महाराष्ट्र राज्यस्तरीय जलतरण स्पधेर्साठी पात्र घोषित करण्यात आले आहे.

निधीने या उत्कृष्ट यशाचे श्रेय तिचे जलतरण प्रशिक्षक विशाल चांदूरकर, राजू चहदि, प्रवीण ठोंबरे आणि वडील देवेंद्र बोरीकर, आई पैठणी बोरीकर, मुख्याध्यापिका अनुपमा सगदेव यांना दिले आहे.

# पथविक्रेता निवडणूकीत सहा सदस्याची बिनविरोध निवड



■ महासागर प्रतिनिधी,
भिवापूर, दि. २८ :

येथील नगर पंचायत भिवापूर हददीतील नगर पथ विक्रेता समितीची निवडणूक प्रक्रिया पार पडली आली आहे. सदर निवडणूकीमध्ये नगर पथ विक्रेता ( उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियम) अधिनियम 2014 अंतर्गत नगर पंचायत भिवापूर यांच्या अधिपत्याखालील पथविक्रेता समितीत 08 सदस्यापैकी 06 सदस्य आज दिनांक २७ सप्टेबर दुपारी ४ वाजता बिनविरोध निवड झालेली आहे.

यात बिनविरोध निवडूण आलेली सदस्य नाव जोत्सना सुनिल धनविजय, महेश भिकाजी भजभूजे, माधुरी सुनिल दडमल, प्रितमकुमार गौतम लोखंडे, सोमेश्वर नामदेव भजभूजे, सय्यद हारुण अली सय्यद सदर उमेदवारांना मिलिंद साटोणे निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर पंचायत भिवापूर यांच्या वतीने संपूर्ण उमेदवारांना बिनविरोध निवडून आल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात आले व त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. सदर निवडणूक प्रक्रियेमध्ये नगर पंचायत भिवापूरचे अधिकारी हरीष पाटिल कर निरीक्षक दत्तात्रय वाकचौरे, घनश्याम उईके आदी कर्मचारी उपस्थित होते.

# सावनेर नगर पथविक्रेता निवडणूक बिनविरोधक



■ महासागर प्रतिनिधी,
सावनेर, दि. २८ :

सावनेर नगर परिषद अंतर्गत सावनेर नगर पथविक्रेता निवडणूक बिनविरोध पार पडली नगर परिषद पथविक्रेता सदस्य समितीच्या निवडनुकीत विजय उमेदवारांना निवडनुक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्रीमती किरण बगडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले निवडून आलेल्या नगर पथविक्रेता समिती मधील सदस्यांनी प्रशासनास योग्य ते सहकार्य करण्याचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी किरण बगडे यांनी केले. नगर पथविक्रेता समिती मध्ये बिनविरोध निवडून आलेले सदस्य बबलु दामु सेवके, गजेंद्र पुरुषोत्तम लाडेकर (सर्वसाधारण), राधा अक्षयकुमार राठोर (सर्वसाधारण महिला), गंगाबाई रामजी सेवके (इतर मागासवर्ग महिला), भगवान हरिचंद्र चांदेकर (अनुसुचित जाती), अहमद नादर शाहा (अल्पसंख्याक), चेतन बुद्धजी पारवे (दिव्यांग) हे उमेदवार विनविरोध निवडून आले. या वेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी देवेन कले, कर निरीक्षक, संजय वानखडे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी तसेच नगर पथविक्रेते उपस्थित होते या वेळी रोशन धोटे, समुदाय संघटक यांनी नवनिर्वाचित सदस्याचे आभार मानले.

### संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत पाच हजार अर्जाचा केला निपटारा

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. २८ :

संजय गांधी निराधार अध्यक्ष नरेंद्र वाघ नायब तहसीलदार मेश्राम साहेब व संजय गांधी निराधार कमिटी यांच्या नेतृत्वात मोठ्या प्रमाणात संजय गांधी निराधार श्रावणबाळ कॅन्सर अपंग एच आय व्ही अशा अनेक केसेस मंजूर करण्यात आल्या आणि त्यांना लाभ मिळणे चालू झाले नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला ज्येष्ठ नागरिक विधवा यांना कोणत्याही प्रकारचा त्रास झालेला नाही. कमिटी ही वेळोवेळी योग्य निर्णय घ्यायची आणि प्रत्येक नागरिका पर्यंत योजनेचा लाभ पोहोचण्याचे काम कमिटीने केले योग्य वेळी गावागावामध्ये कॅम्प लावले जेणेकरून खेड्या पाड्याच्या नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून त्यांच्या गावागावांमध्ये जाऊ कॅम्प लावण्यात आले आणि योजनेचा लाभ देण्यात आला. यावेळी कमिटीचे सदस्य विशाल भोसले, प्रमोद डाखळे, दादाराव मुडे, अंकुश बावने विमल मोहितकर, मसराम, मलोदे, चेतनलाल पांडे, राजेभाऊ घाटोळे, गंगाधर नाडे ह्या सर्व कमिटीने गावागावांमध्ये जाऊन त्यांना लाभ देण्याचा प्रयत्न केला.

# किट्स मध्ये डाटा सायंस व कृत्रिम बुद्धिमत्तेवर कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २८ :

कविकुलगुरु इंस्टिटयूट ऑफ टेक्नॉलाजी ॲन्ड सायंस रामटेक मध्ये डाटा सायंस व कृत्रिम बुद्धिमत्ता यामधे रोजगार संधी या विषयावर कार्यशाळा २७ सप्टेंबरला किट्सच्या छत्रपती शिवाजी सेमिनार हाल मधे आयोजित केली. कार्यशाळाचे उद्घाटन प्रमुख वक्ते व फायरब्लेज एआय स्कूल चे संस्थापक अनिरुद्ध काळबांडे यानी केले.



कार्यक्रमाची अध्यक्षता डीन व इलेक्ट्रॉनिकस एंड कॉम्युनिकेशन विभाग प्रमुख डॉ. पंकज आस्टनकर यानी केली. यावेळी प्रामुख्याने आईटी विभाग प्रमुख सरोज शंभरकर, एलेक्ट्रोमैटिक्स फोरमचे अध्यक्ष राजेश कारामोरे सहित विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संखेत उपस्थित होते.

अनिरुद्ध काळबांडे यांनी मानव उत्तक्रांतीच्या ४ हजार वर्षापूर्विच्या इतिहास सांगीतला व म्हणाले की मानवाने टप्पा टप्पा उत्तक्रांती केली. ते म्हणाले १५ ते २० वर्षापूर्वि इंटरनेट महाग होते. परंतू आत्ता सहज उपलब्ध होत आहेत. डाटा सायंस व कृत्रिम बुद्धीमता मध्ये भरपूर रोजगारांच्या संधी आहेत. विद्यार्थ्यांनी संवेदनशील होत एआयच्या वापर करावा. एआय हे गतीशील साफ्टवेअर आहे. ते म्हणाले की विद्यार्थ्यांनी गृप तयार करून प्रथम वर्षापासून स्टार्ट अप चालू करावे जेणेकरून चार वर्षात आपला स्वताच्या व्यवसाय स्थापन करून रोजगार निर्माण करू शकतील. त्यामुळे भारतात रोजगार क्रांति होईल ते म्हणाले की स्टार्ट अप करीता केंद्र सरकारच्या अर्थसहाय व मार्गदर्सन करणाऱ्या अनेक योजना आहेत. त्यांचा लाभ घ्यावा.

कार्यक्रमाचे आयोजन सचिव व्ही. श्रीनिवास राव आणि प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांच्या मार्गदर्शनात एलेक्ट्रोमैटिक्स फोरम ने केले. डॉ. पंकज आस्टनकर यांनी प्रस्तावना केली. संचालन राधिका धोटे व आभार रुपाली गायधने यानी केले.

### उमरेडच्या स्कुटर्सचे मुंबई विमानतळावर स्वागत

■ महासागर प्रतिनिधी,
उमरेड, दि. २८ :

थाईलैंड मध्ये संपन्न झालेल्या इंड्यूरंस इंटरनॅशनल चॅम्पियनशिप मध्ये देशासाठी 6 पदके जिंकणाऱ्या उमरेडच्या कृत्तिका हर्षल चाचरकर व हेमल प्रमोद जळीतचे भारतीय संघातील विजयी स्केटर्स सह व कोच रवींद्र मिसाळ ह्यांच्या सह भव्य जंगी स्वागत करण्यात आले. काल रात्री 12 वाजता थाईलैंड हून भारतीय विजेता संघ मुंबई विमानतळावर पोहोचला. भारतीय संघात स्थान प्राप्त करून ह्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत देशासाठी 6 मेडल्स जिंकून देशाचा गौरव वाढविणारे उमरेडचे दोन्ही स्केटर्स कृत्तिका व हेमल व त्याचे कोच रवींद्र मिसाळ ह्यांचे स्वागत केले.

# पारधी समाजातील राहुल राजपूतची पोलीस उपनिरिक्षकपदी निवड

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २८ :

जन्मजात गुन्हेगारीचा शिक्का बसलेला फासे पारधी समाजातील मुलांना सहजासहजी शिक्षण मिळत नाही. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून कायमच वंचित राहिलेला पारधी समाज, सर्वसामान्य पांढरपेशा समाजाच्या नजरेत उपेक्षित असलेल्या समाजातील ग्रामीण मातीतील विधवा आईच्या संघर्षमय परिस्थितीवर मात करत स्पर्धा परीक्षा देऊन पोलिस अधिकारी बनण्याचे स्वप्न राहुलने बघितले. त्यासाठी त्याने मुंबई, पुणे गाठले. पुण्यातील शैक्षणिक वातावरणाच्या प्रभावामुळे जिद्द, चिकाटी, मेहनत सरावातील सातत्याच्या जोरावर सलग चार वर्षे अभ्यास केला. यामुळेच राहुलच्या मेहनतीला यश आले. गोंडखैरी परिसरात मिरवणूक काढून राहुलचे शाल श्रीफल देवून सत्कार करण्यात आले.



नागपूर जिल्ह्यातील रा.राजुलवाडी पोस्ट उदासा ता. उमरेड येथील पारधी बेड्यावरील तरुण राहुल गंगाधर राजपूत यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परिक्षेतून महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस पोलीस उपनिरिक्षक पदी निवड झाली. राहुल हा नागपूर जिल्ह्यातील फासे पारधी बेड्यावरील पहिला पोलिस उपनिरीक्षक बनण्याचा मान मिळविला आहे.

हालाकिच्या परिस्थितीत बाप नसलेल्या राहुलला आई लिलाबाईने लहानपणापासून सांभाळ केला. परिस्थिती नसताना आईने त्याचे पुर्ण शिक्षण केले. आईची प्रकृती ठिक राहत नसल्याने राहुलने राष्ट्रीय महामार्गावरील गोंडखैरी येथील पारधी बेड्यावरील राजेश्वरी राजू पवार यांचेशी विवाह केले. पत्नी व साळा अक्षय यांनी मला विश्वास दिला. व मला पुणे, मुंबई येथे स्पर्धा परिक्षेच्या अभ्यासक्रमासाठी जाण्यास मदत केली. माझे मार्गदर्शक पारधी समाजातील उच्च शिक्षित शुभम पवार यांच्या बहुमुल्य वेळोवेळी मार्गदर्शनाने मला लक्ष गाठता आले असेही राहूल ने सांगीतले.

पारधी समाजावर अनेक वर्षांपासून गुन्हेगार असल्याचा शिक्का मारला गेला होता. ज्यांच्या मागावर पोलिस सातत्याने असतात त्या पारधी समाजातील तरुणांनी उच्च शिक्षण घेत लोक सेवा आयोगातून (एमपीएससी) महाराष्ट्र पोलीस दलात पोलिस अधिकारी बनण्याची संधी मिळाली आहे. याच समाजातील तरुणांनी केलेल्या प्रयत्नांमुळे त्यांच्यावरील हा शिक्का तर पुसला जाणार आहे. पोलीस दलात चांगले काम करून समाजाची मान अभिमानाने उंचावणार असे राहुल राजपूत यांनी सांगीतले.

# कोलबा स्वामी गणेशोत्सव मंडळ तरुणाईसाठी प्रेरणास्थान

## रोगनिदान शिबिराचे आयोजन, भव्य महाप्रसाद, दिपोत्सव, श्रीचे विसर्जन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी,
कळमेश्वर, दि. २८ :

उत्सव म्हटला की आधुनिक परंपरेत डीजेचा कर्णकर्कश आवाज, धुमाळ पाट्र्या चा धांगडधिंगा असतोच.मात्र ,धापेवाडा येथील तरूणांचा परंपरेची वाट चोखाळली आहे व जल्लोष तोच धडाक्यात शिवमहापुरानची कथा साजरा केला जात आहे. परंतू त्याला आधार भारतीय वाघांच्या कीर्तन -भजन परंपरेतील टाळ - मृदंगांचा आहे.



विदर्भ किंबहुना नागपुरातील प्राचीन परंपरेतील ऐतिहासिक उत्सव म्हणजे हाडपक्या किंवा मस्कऱ्या गणपती. गणेशोत्सव संपताच सुरू होतो पितृपक्ष. या पितृपक्षात सर्व धार्मिक कार्य व उत्सव काही प्रमाणात निषिद्ध असतात. परंतु विदर्भात हाडपक्या गणपती उत्सव साजरा केला जातो.

श्रीक्षेत्र धापेवाडा येथील कोलबास्वामी गणेश मंडळ आगळ्यावेगळ्या उपक्रमाने समोर आले आहे. या मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे दररोज गणेशासमोर सिनेमातील गाण्यांवर किंवा सांस्कृतिक गाण्यांवर तरुणाई चिरकत नाही, तर चक्क हरिपाठात टाळमृदंगांच्या नादात तरुण मंडळी वैष्णव नृत्य करतात. शेकडो भाविक गणपतीसमोर जमतात.

दिनांक २३ ते २९ सप्टेंबर पर्यंत शिवमहापुरान, भागवत कथा श्री दिनेश महाराज मोहतुरे रा. खुबाळा यांच्या कार्यक्रम कथा ठेवण्यात आलेली आहे. गावातील नागरिक ऐकण्याकरिता एकत्र येतात.

गणपती बाप्पाचे विसर्जन दारू पिऊन, डीजे व घुमालचा धिंगाणा घालून न होता टाळमृदंगांच्या तालावर, ज्ञानोबा-तुकोबांच्या नामगजरात्त बाप्पाला निरोप दिला जातो. दरवर्षी या गणेशोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह चालतो. सात दिवस दुपारी भागवत, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री शिवमहापुरान कथा करण्यात येते. गणेशोत्सवातील मुख्य आकर्षण म्हणजे दीपोत्सव, कार्यक्रमाला भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्री गुरु कोलबा स्वामी गणेश मंडळ व धापेवाडा ग्रामवासीयांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता गणेश मंडळाचे कार्यकर्ते नृपंजय वेळेकर, उमेश बारापात्रे, ईश्वर बरवड, रामेश्वर शेटे, रवी निमजे, संकेत हेडाऊ, पंकज निमजे, अक्षय वेळेकर, नरेंद्र धार्मिक, अमित केदार,मनीष बरवड, नितीन शेटे, ज्ञानेश्वर वेळेकर, पंकज हेडाऊ, पलाश डेकाटे, राजेंद्र वेळेकर, प्रदीप झोडे, प्रफुल्ल हेडाऊ, विनोद निमजे, तुषार डेकाटे,धिरज धार्मिक, राहुल शेटे,आदित्य वेळेकर, आकाश शेटे,संकेत धार्मिक, योगेश शेटे,आकाश बरवड, विक्की शेटे,नारायण सोनकुसरे, क्षितीज बारापात्रे, जितेंद्र वेळेकर, सेवकराम शेटे,मयुर धानोरकर, प्रतिक वेळेकर, प्रयत्नशील असतात.

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३



# भक्तिमार्ग

घटस्थापनेनंतरच्या नऊ रात्री म्हणजे ऊर्जा, उत्साह आणि आनंदाने भरलेले कुंभ जणू... स्त्रीशक्तीने एकत्र येण्याचा हा काळ... सर्जनशीलता, सहनशीलता, अफाट कार्यऊर्जा, प्रगल्भता, प्रयोगशीलता आदी गुणांनी युक्त स्त्रीशक्ती एकवटते तेव्हा विधायक विचारांचे अनेक प्रवाह एकत्र येणं स्वाभाविक आहे. हीच खरी घटस्थापना... चेतनेच्या घटात होणारा सर्जनाविष्कार अनुभवणं म्हणजेच नवरात्रीचं साजरीकरण...

## नवरात्रीचा सर्जनाविष्कार

भक्ती विशेष

प्रत्येक सणाप्रमाणे नवरात्र साजरीकरणातही निसर्गाशी जवळीक साधण्याचा प्रयत्न आहेच. शेतीप्रधान संस्कृतीत बीजांचं अंकुरणं, ते दिसामाजी बहरताना पाहणं, अनुभवणं ओघानंच आलं. त्याचंच सूक्ष्म रूप घटात पहायला मिळतं. तबकामधल्या मातीत मिसळलेले बीज घटातून पाझरणाऱ्या पाण्याने पोषीत होतात, अंकुरतात आणि बघता बघता घटालाच वेढून टाकतात. हे वेढून टाकणं म्हणजेच घरादारावर संपन्नेच्या वेली चढणं... कदाचित हा शेताशिवारात बहरलेल्या हिरवाईला घराच्या चौकटीत आणण्याचा प्रयोग असावा. पूर्वी याद्वारे मातीपरिक्षण होत असे असंही म्हणतात. म्हणजेच घटस्थापना या विधीमागे धार्मिक, भौतिक, अध्यात्मिक असे सर्व पैलू मिसळलेले आहेत. हा विधी शूरांना क्षात्रतेज देणारा, महिलांना स्त्रीत्वातील शक्ती दाखवणारा, वृद्धांना आदीशक्तीच्या उपासनेत गुंतवणारा आणि भूमीपुत्रांना मातीचं परिक्षण करुन योग्य निर्णय घेण्यास मदत करणारा आहे. नऊ दिवस घरात विराजमान होणारी आदिशक्ती आणि तिच्यापुढे अखंड तेवणारा नंदादीप प्रत्येकाला प्रकाशकिरणं देऊन जातो. म्हणूनच नवरात्र हा एक सर्वसमावेशक उत्सव ठरतो.

शेताशिवारात होणारी बियांची पेरणी ऐहिक संपन्नतेकडे नेणारी असते तर मनात होणारी सद्‌विचारांची पेरणी आध्यात्मिक सुखाकडे नेणारी असते. नवरात्रीच्या निमित्ताने हे दोन्ही हेतू साध्य होतात. हा उत्सव एकीकडे पूजापाठ-व्रतवैकल्य, उपवास यांना प्राधान्य देतो तर दुसरीकडे संगीत, नृत्यादी कलांना सामावून घेत तनामनातील नकारात्मकताही घालवतो. या उत्साही आणि प्रसन्न वातावरणात मनरूपी घटातील सत्त्वगुणांच्या सृजनाचा उत्सव साजरा करत पूर्ण शरण भावाने आदिमायेच्या चरणी लीन व्हायचं हा संदेश देणारा सण म्हणजे नवरात्र... नवरात्रीला अध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आरोग्यप्रद महत्त्व आहे. कर्म, ज्ञान, भक्तीचा संदेश देणारी शिकवण आहे. यात लोकपरंपरा आणि लोकसंस्कृतीचे संदर्भ आहेत. असे सर्व संदर्भ घेऊन हेमंत ऋतूत येणारा नवरात्रोत्सव अपूर्व आनंददायी आहे. हा केवळ सण नाही तर तो आहे आधिभौतिकाचा पुजोत्सव! निर्गुण, निराकार आदिमायेच्या सगुण भक्तीतून साकारलेल्या विविध रूपांची आराधना

जगदंबामाता प्रकृतीचं रूप आहे. आपण करत असलेल्या कर्माचं स्थान देवीच असते. तीच ऊर्जेचं उगमस्थान असते. ती सत्त्व, रज, तम या तीनही गुणांनी युक्त आहे. हे तीन गुण स्त्रीशक्ती म्हणून ओळखले जातात. नवरात्रीत आपण देवीची पूजा करून या तीन गुणांची उपासना करतो. नवरात्रातील पहिले तीन दिवस तमोगुणाचे असतात, नंतरचे दिवस रजोगुणाचे असतात आणि शेवटचे तीन दिवस सत्त्वगुणांचे असतात. या आदिशक्तीत सर्व देवांची रूपे एकवटली आहेत. ब्रम्हा, विष्णू, महेश, गणेश, कार्तिकेय आदी देवता आदिशक्तीत सामावल्या आहेत. देवी म्हणजे अनेकेश्वरांचे रूप आहे. देवीचे रूप सुंदर आहे.



ती मनाने उदार आहे. भक्तांसाठी करूणामय आणि दुष्टांसाठी कर्दनकाळ आहे. ती प्रेमळही आहे आणि प्रसंगी रूद्रावतार धारण करणारी आहे. ती साऱ्या विश्वाची माता आहे. लेकरांची काळजी घेणारी आई आहे. म्हणूनच तिची सगळी लेकरं एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात.

देवी महात्म्यात देवीसंबंधी तीन कथा सांगितल्या आहेत. भगवान विष्णूंनी महामायेचे रूप घेऊन मधू आणि कैटभ या राक्षसांना ठार केलं. दुसऱ्या कथेत सिंहारूढ देवीचा महिषासुर वधाचा पराक्रम वर्णन करण्यात आला आहे. तिसऱ्या कथेत देवीने शुंभ, निशुंभ आणि त्यांचे साथीदार चंड आणि मुंड यांना कसे ठार केले, त्याचे चित्तथरारक वर्णन करण्यात आले आहे. या कथांमधील सार म्हणजे बळावत चाललेल्या दृष्ट प्रवृत्तींचा नाश करून वसुंधरेचं संतुलन राखण्याचं काम मातेने केलं. सत्प्रवृत्ताने अपप्रवृत्तीवर केलेली मात म्हणून आपण नवरात्रोत्सव साजरा करतो. देवीच्या नवरात्रोत्सवाचा काळ म्हणजे आत्मपरिक्षणाचा, स्वत:चा कायापालट घडवून आणण्याचा काळ असतो. नवरात्रीतील उपवासामुळे शरीरातील विषाक्त घटक निघून जाण्यास मदत होते. मौनामुळे वाणी शुद्ध होते. नामस्मरणाने मन टवटवीत राहते. जपजाप्य केल्यामुळे वृत्ती अंतर्मुख होते आणि ध्यानामुळे अंतरंगात डोकावण्याची संधी मिळते. या सर्वाचा एकत्रित परिणाम म्हणजे नकारात्मता दूर होते. या चैतन्यमय, भक्तीमय काळात आपल्यात गुणात्मक बदल घडून येतो. आत्मजाणिवा शुद्ध होतात.



नवरात्राचे हे महत्त्वही जाणून घ्यायला हवं. केवळ नऊ दिवस उपवास आणि जागर एवढाच या उत्सवामागील उद्देश नाही तर आपल्यातील अंतर्बाह्य बदल हा यातील महत्त्वाचा भाग आहे.

नवरात्राचे पहिले तीन दिवस दैत्याचा संहार करणाऱ्या देवीच्या काली, दुर्गा या उग्र रूपांचं पूजन होतं. नंतरचे तीन दिवस सरस्वतीचं पूजन होतं आणि त्या नंतरचे तीन दिवस महालक्ष्मीचं पूजन होतं.

म्हणजे पहिल्या तीन दिवसात मोह, मद, मत्सर या रिपूंचे दमन करायचं. नंतरच्या तीन दिवसात ज्ञानाची प्राप्ती करून घ्यायची. एकदा षड्‌रिपूचं दमन झालं, ज्ञानाची प्राप्ती झाली की वैभवाला काय तोटा? नवरात्राचा हाच खरा अर्थ आहे. नवरात्र हा सृजनाचा उत्सव आहे. या काळात शेतात नवं धान्य उगवून आलेलं असतं. बळीराजा या सृजनाचा उत्सव साजरा करत असतो. याकाळात सृष्टीचा कायापालट घडतो. अगदी त्याचप्रमाणे आपणही अनिष्ट, अपप्रवृत्तींना त्यागून चांगलं ते स्विकारायचं आणि अंतर्बाह्य बदलून जायचं हासुध्दा संदेश यातून मिळतो. सध्याच्या सुखलोलूप जगात माणूस नको इतका भौतिक सुखांच्या मागे लागला आहे. पण हाच मोह दु:खांचं मूळ आहे. म्हणूनच या मोहावर संयम, विवेक या शस्त्रांनी विजय मिळवायला हवा. सर्वांबद्दलची काम, क्रोध, मद, मोह, मत्सराची जळमटं झाडून मन विकल्परहित, विकाररहित केलं तर परमेश्वर प्राप्तीचा मार्ग सुकर होतो हाच नवरात्राचा संदेश आहे.

---

घरात शांतता नांदण्यासाठी तसंच समृद्धीसाठी वास्तुशी संबंधित उपाय करणं गरजेचं आहे. फेंगशुई या चिनी वास्तुशास्त्राच्या मदतीने तुम्ही घरात सकारात्मक ऊर्जेची निर्मिती करू शकता.

## सकारात्मक उर्जेसाठी...



वास्तु भक्ती

नवं घर घेताना किंवा घर भाड्याने घेताना घराच्या रचनेकडे लक्ष ठेवणं गरजेचं आहे. घराच्या मागच्या भागात कोणतीही पडझड नसावी. पुढच्या भागात बाग असेल तर घरात सकारात्मक ऊर्जेचा वास राहतो.

* फेंगशुई शास्त्रात घराच्या प्रवेशद्वाराचं बरंच महत्त्व आहे. या दाराचा कोणताही आवाज होता कामा नये. यामुळे वातावरणात नकारात्मक ऊर्जेचा वास राहतो. तसंच आपल्या योजना पूर्णत्त्वास जात नाहीत.

* फेंगशुईची ऊर्जा संपूर्ण घरात पसरते. त्यामुळे घरात प्रवेश केल्यानंतर तुमची नजर कशावर पडते, याकडेही लक्ष द्यायला हवं.

* शयनकक्ष, स्वयंपाकघर आणि बाथरूम ही घरातली महत्त्वाची ऊर्जा केंद्रं आहेत. त्यामुळे या स्थानांकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे.

* तुमच्या बाथरूमचं दार कायम बंद ठेवायला हवं. यामुळे नकारात्मक ऊर्जा बाहेर पडत नाही.

* बेडरूममध्ये पलंग ठेवण्याची पद्धतही महत्त्वाची आहे. झोपताना पाय दरवाज्याकडे असू नये. टीव्ही तसंच इतर उपकरणं कायम झाकून ठेवावीत. यामुळे ऊर्जेची बचत होते.

* स्वयंपाकघरसुद्धा ऊर्जेचा सकारात्मक स्रोत आहे. स्वयंपाकघरातल्या कपाटांवर मोकळी जागा असू नये. असल्यास कुंड्या ठेऊन सकारात्मक ऊर्जा प्रवाहित करता येऊ शकेल.

* दारावरची नेम प्लेट सुस्पष्ट असू द्या. यामुळे घरात सकारात्मक ऊर्जा प्रवेश करेल.

---

## सेवाभावी वृत्ती हवी!

बोध

इतर प्राणीमात्रांच्या तुलनेत मनुष्य अनेक गोष्टी करू शकतो. म्हणूनच माणसाचा जन्म सर्वश्रेष्ठ मानला जातो. माणूस परोपकार करू शकतो. लोकांची सेवा करू शकतो. सेवाभावी वृत्तीमुळे माणसाला मोक्ष मिळू शकतो. मानवता आणि मानवतेची सेवा हाच सर्वश्रेष्ठ धर्म आणि कर्म मानणं गरजेचं आहे. माणसात अनेक सद्‌गुण असतात पण आजच्या काळात या सद्‌गुणांचं रूपांतर दुर्गुणांमध्ये होऊ लागलंय. चांगल्या गोष्टी लोप पावू लागल्या आहेत की काय असं वाटू लागलंय. सेवाभावी वृत्ती नष्ट होऊ लागली आहे. अर्थात ती नष्ट होता कामा नये. सेवाभावी वृत्तीची अनेक रूपं आहेत. एकमेकांप्रती समर्पित भाव, इतरांना समजून घेणं, इतरांप्रती आदरभाव दाखवणं, इतरांच्या समस्या सोडवण्यात पुढाकार घेणं ही सगळी सेवाभावी वृत्तीची लक्षणं आहेत.

परमेश्वराला, साधूसंतांनाही हेच अपेक्षित आहे. भगवान महावीर याबद्दल सांगतात की माझी सेवा करण्यापेक्षा वृद्ध, रूग्ण, गरजूंची सेवा करणं जास्त गरजेचं आहे. सेवाभावी वृत्तीमुळे व्यक्ती साधनेच्या परमोच्च स्तराला जाऊन पोहोचू शकते. माणसाच्या आयुष्याचं सोनं होतं. गरजेला धावून जाणं, हीच सेवाभावी वृत्ती म्हटली पाहिजे. मित्र, आप्तस्वकीय यांना गरज पडली की आपण त्यांच्या पाठीशी ठामपणे उभं राहायला पाहिजे. कर्माचं तत्त्वज्ञान फार थोर आहे. आपण केलेली कर्मं आपल्याला भोगावी लागतात. चांगल्या कर्माचं चांगलं फळ मिळतंच मिळतं तर वाईट कर्मांची वाईट फळं भोगावी लागतात. दिसत नसलं तरी हे कटू सत्य आहे. आसपास नजर टाकली की हे आपल्या लक्षात येईल. इतरांना मदत करण्याची वृत्ती नसेल तर माणूस आणि निर्जिव दगड यांच्यात काहीही फरक राहत नाही. संवेदनशीलता आणि सहसंवेदना गरजेची आहे. प्राणीमात्रांनाही दु:खाची जाणीव होते. माणसाचा जन्म मिळायला भाग्य लागतं. त्यामुळे याच जन्मात सत्कर्मं करायला हवीत. सेवाभावी वृत्तीने जगणं हे सत्कर्मांच्या दिशेने टाकलेलं पहिलं पाऊल म्हणता येईल.



---



## थायलंडचं नरक मंदिर...

तीर्थक्षेत्र

मंदिर म्हटलं की देवीदेवता आणि भक्तीमय वातावरणाची अनुभूती होते. पण थायलंडमधल्या चियांग मायी या शहरात एक अनोखं मंदिर आहे. या मंदिरात देवीदेवता वास करत नाहीत तर इथे नरकातल्या पीडा दाखवल्या जातात. जन्म-मृत्यू, स्वर्ग-नरक या संकल्पनांनुसार पापी जीवाला नरकात जावं लागतं. या जीवांना आपल्या पापांची शिक्षा भोगावी लागते. मगच त्यांना मुक्ती मिळते. नरकात दिल्या जाणाऱ्या शिक्षा इथल्या मंदिरात दाखवल्या जातात. या मंदिरात मूर्तींच्या माध्यमातून शिक्षा दाखवण्यात आल्या आहेत. हे स्थान नरक मंदिर याच नावाने ओळखलं जातं. सनातन तसंच बौद्ध धर्माच्या खाणाखुणा इथे आढळतात. या धर्मांमधल्या संकल्पना इथे मांडल्याचं दिसून येतं. या मंदिराच्या रचनेवर भारतीय संस्कृतीचा प्रभाव असल्याचं दिसून येतं. थायलंडची राजधानी बँकॉकपासून ७०० किलोमीटर अंतरावर चियांग मायी नावाचं शहर आहे. या शहरात ३०० मंदिरं आहेत. पण हे नरक मंदिर अनोखं म्हटलं पाहिजे. विशेष म्हणजे या प्रकारचं हे जगातलं एकमेव मंदिर आहे. एका बौद्ध भिक्षूने या मंदिराची निर्मिती केली आहे. या जगात पापं वाढली आहेत. पापं केल्याने मृत्यूनंतर जीवाचं काय होतं, हे दाखवून देण्याच्या उद्देशाने या नरक मंदिराची निर्मिती करण्यात आली. इथल्या मूर्ती फारच भयानक आहेत. पापांपासून मुक्ती मिळवण्याच्या उद्देशाने लोक इथे येतात. या मंदिरात आल्याने पापांचा प्रभाव कमी होतो, अशी लोकांची श्रद्धा आहे. नरकयातना ही काय संकल्पना आहे, हे जाणून घेण्यासाठी या मंदिराला भेट द्यायला हवी.

---

## क्रोधावर नियंत्रण ठेवा...


शिकवण

राग हा आपला शत्रू मानला जातो. माणसाच्या सहा शत्रूंपैकी राग हा सर्वात मोठा शत्रू. त्यामुळे रागावर नियंत्रण आणणं गरजेचं आहे. रागावर नियंत्रण ठेवलं नाही तर कुटुंबाच्या आनंदावर विरजण पडू शकतं. घरातल्या प्रत्येकाने आपला राग काबूत ठेवायला हवा. आजच्या धावपळीच्या जगात छोट्या छोट्या गोष्टींवरून राग येण्याचं प्रमाण वाढतंय. मनाविरूद्ध घडलेली कोणतीही गोष्ट आपल्याला सहन होत नाही. मग राग येतो. राग आला की आपण काहीही बोलून जातो. रागीट व्यक्तीचा दरारा, धाक असतो. अशा लोकांच्या वाट्याला कु णीही जात नाही. त्यामुळे राग आल्यावर तो कमी कसा होईल याकडे लक्ष देणं गरजेचं आहे. तुमच्या ऑफिसमध्ये काही तरी घडलंय. त्यामुळे तुम्ही खूप वैतागला आहात. हा राग घराच्या बाहेर ठेवला पाहिजे. घरात येऊन आपल्या माणसांवर चिडचिड करून, वैतागून काहीही साध्य होणार नाही. यामुळे तुमच्यासह तुमच्या कुटुंबियांनाही त्रास होईल. इतरांवरचा राग आपण दुसऱ्यावर काढतो. कळत-नकळत इतरांना दुखवतो. याचे परिणाम वाईट होतात. इतरांवर राग काढला तरी नराकात्मक ऊर्जा आपल्या शरीरात प्रवेश करत असते. यामुळे इतर लोकही दु:खी कष्टी होतात. आपण याचा अनुभव घेतला असेलच. राग येण्याचं अजून एक कारण म्हणजे इतरांचा आदर न करण्याची वाढत चाललेली वृत्ती. आपण कुणापेक्षा श्रेष्ठ आहोत, ती व्यक्ती आपल्याला असं का बोलली हा विचार मनात येऊन आपण चिडतो. इतरांसोबत भांडतो. यामुळे क्लेष आपल्याला होतात हे लक्षात घ्या. राग आल्यामुळे नकारात्मक ऊर्जा सक्रिय होऊन विनाश होऊ शकतो. रागामुळे आरोग्यावरही विपरित परिणाम होतात. रक्तदाब वाढतो. हृदयविकार होऊ शकतो. या सगळ्या कारणांमुळे संयम बाळगायला शिका. आयुष्यात अडचणी येतच राहणार. त्यांचा फार बाऊ करू नका. समर्थपणे सामना करा. यश तुमचंच आहे.



---

## शनीला प्रसन्न करण्याचे उपाय...



शनी ग्रहाची आपल्याला कायम धास्ती वाटत असते. शनीची साडेसाती किंवा महादशा त्रासदायक ठरते. पण यामुळे आपल्याला आयुष्याचे बरेच धडेही मिळतात. जन्मपत्रिकेत शनी अशुभ असेल तर काही उपायांनी हा प्रभाव शुभ करता येतो. याबाबत जाणून घेऊ या...

जाणून घ्या

* हे उपाय शुक्ल पक्षातल्या शनिवारपासूनच सुरू करावेत.

* पत्रिकेत शनी चतुर्थ स्थानी असेल तर रात्री दूध पिऊ नये.

* शनिवारी हनुमान, शनीदेव आणि भैरवनाथाची पूजा करावी.


* पिंपळाच्या मुळांमध्ये पंचखाद्य पेरावं. हा उपाय वर्षातून दोनदा करावा.

* शनी सातव्या स्थानी असेल तर मद्यपान करू नये.

---

## थोरांचे विचार...

प्रेरणादायी



बेंजमिन फ्रँकलिन यांच्याबद्दल आपण ऐकलंय. फ्रँकलिन हे प्रतिभाशाली व्यक्तिमत्त्व. संशोधक, लेखक, व्यंगचित्रकार, राजकीय विश्लेषक अशा अनेक भूमिका ते लीलया वठवत असत. विज्ञानाच्या क्षेत्रात त्यांनी बरंच काम करून ठेवलंय. अशा महान व्यक्तिमत्त्वांच्या आयुष्याबद्दल आपल्याला उत्सुकता असते. विचार, ध्येय यामुळे ही माणसं आयुष्यात मोठी होतात. फ्रँकलिन यांनीही सकारात्मक विचारांच्या जोरावर मोठी झेप घेतली. त्यांचा स्वत:वर पूर्ण विश्वास होता. विचारांची शक्ती अलौकिक असते असं म्हणतात. त्यामुळेच की काय, विचारसरणीच्या जोरावर ही माणसं मोठी होत असतात. त्यांच्याकडून आपण बरंच काही शिकू शकतो.

बेंजमिन फ्रँकलिन यांनी कायमच कृतीला प्राधान्य दिलं. नुसत्या बडबडीला काही अर्थ नाही असं त्यांचं म्हणणं होतं. चांगलं बोलण्यापेक्षा चांगलं काम करा, असं ते सांगत असत. आपण पैसा गुंतवतो पण ज्ञानात गुंतवणूक करणं अधिक चांगलं असल्याचं ते सांगायचे. ज्ञानासाठी पैसा खर्च करा. तो कधीही वाया जात नाही, असा त्यांचा सल्ला असे. आपण वयाने वाढलो तरी समजूतदार होतोच असं नाही, असंही त्यांचं म्हणणं असे. माणसात समजून घेण्याची क्षमता असणं गरजेचं आहे, असं त्यांचं म्हणणं होतं.

छोट्या छोट्या खर्चांपासून लांब राहा. यामुळे आपलं नुकसान होत असतं. बुद्धीमान व्यक्तींना सल्ल्याची गरज नसते आणि मूर्खांना सल्ला पटत नाही असंही त्यांचं म्हणणं होतं. थोड्याशा सुरक्षेसाठी आपण आपलं स्वातंत्र्य धोक्यात घालतो. अशा व्यक्ती स्वातंत्र्य आणि सुरक्षा या दोन्हींच्या लायकीच्या नसतात, असं ते सांगत. या विचारांची जोड आपल्या आयुष्याला दिली. तर आपलं आयुष्य नक्कीच बदलू शकतं.

## थोडक्यात

### मनोज जरांगे यांचाही दसरा मेळावा



■ **मुंबई:** मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील हेदेखील आता दसरा मेळावा घेणार आहेत. त्यासाठी नारायणगडावर जागेची चाचपणी करण्यात येत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपली राजकीय भूमिका ते या मेळाव्याच्या माध्यमातूनच स्पष्ट करतील, अशी शक्यता देखील व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आता या दसरा मेळाव्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मनोज जरांगे पाटील देखील दसरा मेळाव्याच्या माध्यमातून मराठा समाजाची संवाद साधणार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा समाजाचे उमेदवार उभे करण्याची घोषणा त्यांनी या आधी केली होती. त्यामुळे या संदर्भातली भूमिका ते या मेळाव्यात स्पष्ट करतील, अशी शक्यता देखील वर्तवली जात आहे.

### धनगर समाजाला आदिवासीतून आरक्षण देऊ नका



■ **मुंबई:** धनगर समाजाला एसटी अर्थात अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण दिले तर सर्वच पक्षांतील आदिवासी आमदार आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा देतील, असा इशारा देण्यात आला आहे. या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार नरहरी झिरवळ चांगलेच आक्रमक झाले आहेत. या प्रकरणी सोमवारपासून मंत्रालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशाराच त्यांनी दिली आहे. इतर आदिवासी आमदार देखील त्यांच्यासोबत आहेत. आमदारांच्या या भूमिकेमुळे धनगर आरक्षणाचा प्रश्न अधिकच पेटण्याची शक्यता आहे.

सकल धनगर समाजाने एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी राज्यभर आंदोलन सुर केले आहे. या आंदोलनाची दखल घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनगर समाजाच्या आरक्षणासाठी एक समिती नेमण्याची घोषणा केली होती. तसेच धनगड व धनगर हा शब्द एकच असल्याचा जीआर काढण्याचीही तयारी दर्शवली होती. पण त्यांच्या या घोषणेला आदिवासी आमदारांनी कडाडून विरोध केला जात आहे. त्यातच आता झिरवाळ यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

# पर्यावरण संवर्धनासह पर्यटनासाठीही ऑक्सिजन पार्क उपयुक्त - गडकरी

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २८:**

पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. आपण सारे ध्वनी, वायू, जल प्रदूषणाचा सामना करीत आहोत. प्रदूषणामुळे आयुष्यमान कमी होत आहे. अशात पर्यावरण संवर्धनाची जाणीव प्रत्येकात निर्माण होणे आवश्यक आहे. त्याकडे लक्ष वेधण्यासाठी ऑक्सीजन बर्ड पार्क हे उत्तम माध्यम ठरणार आहे. निसर्ग पर्यटनाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा उद्देश साध्य होणार आहे, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज व्यक्त केला.

गडकरी यांच्या संकल्पनेतून भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) जामठा परिसरात ऑक्सिजन बर्ड पार्क साकारला आहे. या उद्यानाचे लोकार्पण त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. येथील नैसर्गिक तलावाच्या शेजारी गडकरी व इतर पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. गडकरी यांनी आईच्या नावाने वृक्षारोपण केले.

या कार्यक्रमाला खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार टेकचंद सावरकर, आमदार विकास कुंभारे, आमदार आशीष जयस्वाल, भाजपचे जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, एनएचएआयचे सचिव अनुराग जैन, अध्यक्ष संतोष यादव, सल्लागार अशोक जैन, प्रादेशिक अधिकारी आर.पी. सिंग, प्रकल्प संचालक सी.एम. सिन्हा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आर्किटेक्ट हबीब खान, पर्यावरण संवर्धन सल्लागार दिलीप चिंचमलातपुरे, कंत्राटदार शरद मेश्राम यांचा सत्कार करण्यात आला.

गडकरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घोषित केलेल्या एक वृक्ष माँ के नाम या अभियानाचा उल्लेख केला. ते म्हणाले, गेल्या दहा वर्षांत आम्ही ४ कोटी झाडे लावली. ७ लाख झाडांचे ट्रान्सप्लान्टेशन केले. संपूर्ण महाराष्ट्रात जवळपास ५०० तलाव एनएचआयने बांधले. ऑक्सीजन बर्ड पार्क हा देखील हरित संकल्पाचाच एक भाग आहे.

बर्ड पार्कह्मधील नैसर्गिक तलावात सध्या बदक आणि इतर पक्षी आहेत. परंतु फळझाडांची लागवड केल्याने अनेक स्थलांतरित पक्षी सुद्धा येथे येतील. याठिकाणी खास पक्ष्यांसाठी फळझाडे लावण्यात आली आहेत. येथील फळे पर्यटकांसाठी नसून ती केवळ पक्ष्यांनाच खाता येणार आहेत, याचाही गडकरी यांनी आवर्जून उल्लेख केला. खा. श्यामकुमार बर्वे, आ. टेकचंद सावरकर, आ. आशीष जयस्वाल यांनी गडकरी हे व्हिजन असलेले नेते आहेत आणि त्यांच्यामुळे नागपूरची देशात वेगळी ओळख निर्माण होत आहे, असे मत व्यक्त केले.








### असा आहे बर्ड पार्क

जामठा क्लोव्हर लीफ येथे नागपूर-हैदराबाद सेक्शनवर जवळपास २० एकर जागेत ऑक्सिजन बर्ड पार्क विकसित करण्यात आला आहे. १४.३२ कोटी रुपयांमध्ये या प्रकल्प नावारुपाला आला आहे. हरित विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. या उद्यानाचे महत्त्व केवळ ऑक्सिजन (प्राणवायू) देणारा परिसर एवढेच नसून पक्ष्यांच्या विविध प्रजातींसाठी एक आश्रयस्थान म्हणून ते उपयुक्त ठरेल. ८१०४ प्रकारच्या वनस्पतींसह ११ हेक्टर क्षेत्रफळावर ऑक्सिजन पार्क विकसित करण्यात आला आहे. या प्रकल्पात नैसर्गिक तळ्यांनाही समाविष्ट करून घेण्यात आले आहे. या उद्यानात फूड कोर्ट, प्रसाधनगृहे, चालण्याचे मार्ग, जॉगिंग आणि सायकलिंग ट्रॅक, वॉचटॉवर, ॲम्फीथिएटर प्लॅटफॉर्म आणि मुलांसाठी विशेष क्रीडा क्षेत्र यासह विविध प्रकारच्या सुविधा आहेत. प्रवेशद्वारावर आकर्षक आर्किटेक्चरल डिझाईनचे आहे. विशेष म्हणजे हे उद्यान विविध प्रकारची फळे देणाऱ्या वनस्पतींनी समृद्ध आहे. जांभळे, आंबा, पेरू, बेल, चिंच, अंजीर, खिरणी, पिंपळ, सीताफळ, आवळा ही झाडे फक्त पक्ष्यांसाठी संरक्षित आहेत.



### आम्ही संवर्धन करतो

एक झाड कापणे हे एका माणसाची हत्या करण्यासारखे आहे. त्यामुळे वृक्ष लागवडीसह ट्रान्सप्लान्टेशनवर आमचा भर आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे रस्ते निर्मिती सोबतच अनेक पर्यावरण संवर्धनाची कामे केली जात आहेत. वणी-वरोरा या रस्त्यावर बांबूच्या पर्यावरण पूरक क्रॅश बॅरियरची बांधणी, उड्डाणपुलाच्या बांधकामांमध्ये स्टील ऐवजी ग्लास फायबरचा वापर, रस्ते निर्मितीमध्ये म्युनिसिपल वेस्टचा वापर, रस्ते निर्मितीसाठी तलाव खोलीकरणातून मिळणाऱ्या मातीचा वापर केला जात आहे. आम्ही पर्यावरण खराब करणारे नव्हे तर पर्यावरणाचे संवर्धन करणारे आहोत, हेच आम्हाला सांगायचे आहे, असेही गडकरी म्हणाले.






शुभहस्ते



मा.आ.श्री.राजेश पंडीतराव एकडे

मलकापुर विधानसभा मतदार संघाचे आमदार माननीय श्री.राजेश पंडीतराव एकडे
यांच्या अथक प्रयत्नातुन विविध विकास निधी अंतर्गत ११२ कोटी रूपयांच्या
* विकास कामांचा भुमीपुजन समारंभ *

| अ.क्र. | कामाचे नांव | गांव | वेळ | अंदाजे रक्कम | कार्यक्रमाचे अध्यक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | १) चांदुर बिस्वा ता नांदुरा येथे पुल वजा सिमेंट बंधारा बांधकाम करणे | चांदुर बिस्वा | सकाळी ९.०० वाजता | १ कोटी ८० लक्ष | सौ.आशाबाई प्रकाश बोदडे सरपंच |
| | २) चांदुर बिस्वा ता नांदुरा येथे मंडळ अधिकारी कार्यालय बांधकाम करणे | | | ३० लक्ष | |
| | ३) चांदुर बिस्वा ता नांदुरा येथे मंडळ अधिकारी कार्यालय बांधकाम करणे | | | २० लक्ष | |
| | ४) खेरडा पोच रस्ता हिंगणे गव्हाड मोमीनाबाद जोडणारा रस्त्यावर मोरी बांधकाम सा.क्र.२/०० ग्रा.मा.६ | | | ३० लक्ष | |
| | ५) चांदुर बिस्वा ता. नांदुरा येथील तीन व्यायाम शाळांना जिम साहित्याचे वाटप करणे | | | २१ लक्ष | |
| | ६) चांदुर बिस्वा ता.नांदुरा येथे नाभिक समाज वस्तीमध्ये ग्रामपंचायत मालकीच्या मोकळया जागेवर सभा मंडप बांधकाम करणे | | | १० लक्ष | |
| | ७) चांदूर बिस्वा ता.नांदुरा येथे सुपडाजी सोनवणे यांचे यांच्या घरापासून ते आंबेडकर नगर पर्यंत ब्लॉक बसविणे (उद्घाटन) | | | ५ लक्ष | |
| | ८) चांदूर बिसवा ता.नांदुरा येथे अंतर्गत रस्ता कारकीटीकरण करणे (न सुविधा) | | | ९ लक्ष | |
| | चांदुरा बिस्वा तालुका नांदुरा ग्रामपंचायत अंतर्गत रस्ता बांधकाम करणे (भूमिपूजन) | | | ९ लक्ष | |
| | ९. चांदुरात विसावा तालुका नांदुरा अंतर्गत रस्ता बांधकाम करणे (लोकार्पण) | | | ५ लक्ष | |
| २ | १०. हिंगणे गव्हाड नवीन पूर्णर्वसीत गावठाण पुराव्याच्या नागरी सुविधांचे कामे (लोकार्पण) | हिंगणे गव्हाड | सकाळी ९.३० वाजता | ४४ कोटी | सौ.कमलबाई सदानंद इंदोरे उपसरपंच |
| | ११. हिंगणे गव्हाड धनगर वस्तीमध्ये सभामंडपाचे बांधकाम करणे (लोकार्पण) | | | १५ लक्ष | |
| | १२. हिंगणे गव्हाड कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे (लोकार्पण) | | | १ कोटी १९ लक्ष | |
| ३ | १३. टाकळी वतपाळ नांदूर ता. नांदुरा गावाच्या नवीन गावठाणा करिता पोच रस्त्याचे बांधकाम करणे (भूमिपूजन) | टाकळी वतपाळ | सकाळी १०.०० वाजता | ५ कोटी ७६ लक्ष | ज्ञानेश्वरी ज्ञानदेव पांडव,सरपंच, सौ.सरेखा सदानंद तायडे,उपसरपंच |
| ४ | १४. वडगाव दिघी वडोदरा सावरगाव नेहु रस्त्याला जोडणारा रस्ता ग्रा.मा.०५ सा. क्र. ०/०० ते१/०० | वडगाव डिघी | सकाळी १०.३० वाजता | ४० लक्ष | भागवत महादेव लाजुळकर, सरपंच |
| ५ | १५. सावरगांव नेहु अंतर्गत रस्ता बांधकाम करणे (मूलभूत) (लोकार्पण) | खेडगांव | सकाळी ११.०० वाजता | १० लक्ष | ज्ञानेश्वरी ज्ञानदेव पांडव सरपंच, सौ.सरेखा सदानंद तायडे,उपसरपंच |
| | १६. प्रजिमा ०७ सात मोमिनाबाद, सावरगाव, इसरखेड, खेडगाव रस्त्याचे बांधकाम करणे (PMGSY) | | | ४ कोटी ३० लक्ष | |
| | १७. टाकळी वतपाळ तालुका नांदुरा नवीन गावठाण करीता पिण्याचे पाणी पुरवठा योजने करीता इंटेक वालचे काम करणे(भूमिपूजन) | | | ६६ लक्ष | |
| ६ | १८. मामुलवाडी नवीन गावठाणा मध्ये पाण्याचा निचरा करण्यात करिता गटार व इतर अनुषक्ती काम करणे (भूमिपूजन) | मामुलवाडी | सकाळी ११.३० वाजता | ७ कोटी ९२ लक्ष | सौ.पुष्पा विजय गावंडे, सरपंच |
| ७ | १९. मामुलवाडी पातोंडा कोदरखेड पूर्णवस्ती गावामध्ये पाणीपुरवठ्याची काम करणे | पातोंडा | दुपारी १२.०० वाजता | ६८ लक्ष | सौ.रंजनाताई सुभाष धुळे, सरपंच |
| | २०. पातोडा दहिगाव माटोडा पोच रस्ता व नालीचे बांधकाम करणे | | | १२ कोटी ५० लक्ष | |
| | २१. पातोडा अलमपूर येरळी ते एसणब एच २७४ रस्ता सुधारणा करणे इसमा४१ साणब क्रणब २६००ते३६५०० | | | ५ लक्ष | |
| ८ | २२. कादरखेड गावाच्या पूर्वसन अंतर्गत नवीन गावठाणा पुराव्याच्या नागरि सुविधाचे कामे (लोकार्पण) | कोदरखेड | दुपारी १२.३० वाजता | २ कोटी ८२ लक्ष | सौ.रंजनाताई सुभाष धुळे, सरपंच |
| | २३. पातोंडा कोदरखेड मामुलवाडी गावांचे सांडपाण्याकरिता नालीचे काम भूमिपूजन | | | २ कोटी ५ लक्ष | |
| | २४ पलसोडा ता.नांदुरा गावाच्या नवीन गावठाणाकरचा पोत रस्त्याचे बांधकाम करणे भूमिपूजन | | | ३ कोटी ८२ लक्ष | |
| ९ | २५.पलसोडा ता.नांदुरा गावाच्या नवीन गाव ठाण्याकरता गटार व इतर अनुषंगिक काम भूमिपूजन | पालसोडा | दुपारी १.०० वाजता | .३ कोटी ५० लक्ष | निना रविंद्र सुरळकर, सरपंच |
| | २६.पलसोडा ते प्रतिमा ला जोडणारा रस्ता सुधारणा करणे ग्रा मा ०७ साणब क्र ०/०० ते१/०० | | | ४५ लक्ष | |
| | २७.पलसोडा ते प्रतिमा ला जोडणारा रस्त्यावर मोरी दुरुस्ती करणे ग्रा.मा.०७ सा.क्र.१/५०० | | | ३ लक्ष | |
| १० | २८.जिगांव तालुका नांदुरा नवीन गावठाण मुख्यपौर्य रस्ता डांबरीकरण व अनुषंगिक कामे . | जिंगांव नविन गावठान | दुपारी १.३० वाजता | ४ कोटी ४२ लक्ष | सौ.सुलभा शिवाजी काळे,सरपंच |
| | २९.जिगाव तालुका नांदुरा पिण्याच्या पाण्याचा पाणीपुरवठा व्यवस्था करणे | | | २ कोटी ४१ लक्ष | |
| | ३०.दिघी तालुका नांदुरा अंतर्गत रस्ता बांधकाम करणे मूलभूत सुविधा | दिघी | दुपारी २.१५ वाजता | ७ लक्ष | सौ.वृषाली सागर लांडे,सरपंच |
| ११ | ३१.सिरसोडी वडोदरा रस्त्यावर मोठी बांधकाम करणे इजिमा ३३ सा.क्र. ०/२०० | सिरसोडी | दुपारी २.३० वाजता | ३ लक्ष | सौ.दिपाली हर्षवर्धन सरदार,सरपंच |
| १२ | ३२. विठाई येथे अंतर्गत रस्ता बांधकाम करणे मूलभूत सुविधा भूमिपूजन | विटाळी | दुपारी २.४५ वाजता | १० लक्ष | श्री गजानन रुपचंद सागर सरपंच |
| | ३३. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेचे अंतर्गत समशानभूमी बांधकाम व व्यवस्थापन करणे | | | १५ लक्ष. | |
| १३ | ३४. धानोरावी काठी रोड ते परमेश्वर ठाकरे यांच्या शेतापर्यंत शेत रस्ता करणे | धानोरा (वि.) | दुपारी ३.१५ वाजता | २० लक्ष | श्री विशाल विलासराव पाटील सरपंच |
| १४ | ३५. धानोरा येथील गिरणी क्षेत्र रस्ता करणे | | | ५ लक्ष | |
| १५ | ३६. धानोरा वि तालुका नांदुरा अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट करणे लोकार्पण | | | ५ लक्ष | |
| | ३७.धानोरा वि तालुका नांदुरा अंतर्गत रस्ता बांधकाम करणे जन सुविधा | | | ८ लक्ष | |
| | ३८. धानोरा वी ग्रामपंचायत मालकीच्या जागेवर अतिक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे भूमिपूजन | | | ३० लक्ष | |
| | ३९.धानोरा वि. तालुका नांदुरा तलाठी येथे कार्यालयाचे बांधकाम करणे लोकार्पण | | | २४ लक्ष | |
| १६ | ४०.काटी तालुका नांदुरा येथे अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे मूलभूत सुविधा | काटी | दुपारी ३.३० वाजता | १० लक्ष | सौ.साधना शरद हिवाळे सरपंच |
| | ४१.काटी तालुका नांदुरा भवानी माता मंदिरासमोरील सभामंडपाचे लोकार्पण | | | १० लक्ष | |
| | ४२.काती तालुका नांदुरा शाळा खोलीचे बांधकाम करणे भूमिपूजन | | | १० लक्ष | |
| | ४३.क्रांती तालुका नांदुरा अंतर्गत रस्ता बांधकाम करणे भूमिपूजन जन सुविधा | | | ८ लक्ष | |
| १७ | ४४. द्वारयुक्त सिमेंट बंधारा बांधकाम करणे क्र.१ | खातखेड | दुपारी ४.०० वाजता | ४ कोटी ५० लक्ष | |
| १८ | ४४. द्वारयुक्त सिमेंट बंधारा बांधकाम करणे क्र.२ | भुईसिंगा | दुपारी ४.३० वाजता | ४ कोटी ५० लक्ष | सौ.भारती सागर दामोदर सरपंच ग्राप.भुईसिंगा |
| १९ | ४४. द्वारयुक्त सिमेंट बंधारा बांधकाम करणे क्र.३ | नारखेड | | ४ कोटी ५० लक्ष | श्री.प्रसेन्नजित खंडेराव, सरपंच ग्रा.पं.नारखेड |

प्रमुख उपस्थिती : श्री संतोषराव पाटी (मा.जि.प.सदस्य) श्री पदमराव पाटील मा.मुख्य प्रशासक कृ.उ.बा.स. श्री.वसंतराव भोजने जिल्हाप्रमुख शिवसेना उबाटा, श्री.मोहनराव पाटील जि.उपाध्यक्ष रा.काँ.पार्टी. श्री.निलेश पाऊलझगडे जिल्हा सरचिटणिस .काँग्रेस कमेटी श्री.भगवान धाडे, तालुका काँ.कमीटी अध्यक्ष तथा कृ.उ.बा.स.नांदुरा, श्री.संजय चोपडे, तालुकाध्यक्ष रा.काँ.पार्टी , श्री. इश्वर पांडव, तालुकाप्रमुख शिवसेना उबाटा, प्रसाद पाटील माजी. प.स.सदस्य, श्री.पुरषोत्तम झालटे जि.प.सदस्य तथा संचालक कृ.उ.बा.स.नांदुरा श्री.गौरव पाटील संचालक कृ.उ.बा.स. श्री.भानुदास तितरे संचालक कृ.उ.बा.स. नांदुरा, श्री.गजानन गव्हाळे, माजी उपसभापती पं.स., श्री.आकाश वतपाळ, उपाध्यक्ष ता.काँ.क., शंकर बोदडे, ता.अ.ओबीसी. सेल, श्री नारायण कांडेलकर मा.प्रशासक कृ.उ.बा.स. नांदुरा

**अँड्रॉइड आणि आयफोनसारख्या आधुनिक संपर्क तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना संपूर्ण लेबनॉनमध्ये पेजर, वॉकीटॉकी तसेच घरातील सौरऊर्जा प्रणालींमध्ये स्फोट घडवले गेले. एखाद्या संस्थेची, सरकारी खात्याची, देशाच्या संरक्षणप्रणालीची वेबसाईट हॅक करून गोपनीय माहिती हस्तगत केली जाते तसेच पेजरप्रणालीचा ताबा घेऊन हे स्फोट घडवून आणले गेले. या गूढरम्य हल्ल्यांचा खास वेध.**

# पेजर, वॉकीटॉकीच्या स्फोटामागील गूढ



निमित्त

**शंतनु चिंचाळकर**

१२ मार्च १९९३ या दिवशी मुंबई महानगरात वर्दळीच्या ११ ठिकाणी झालेले साखळी बॉम्बस्फोट आज आठवतात. एकाच वेळी एकाच शहरात झालेल्या अनेक स्फोटांनी अख्खा देश हादरून गेला होता. अतिरेक्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन; जेवणाच्या डब्यात बॉम्ब ठेऊन; टायमरने घडवून आणलेले हे स्फोट आपण समजू शकतो, एक वेळ शत्रूराष्ट्राच्या जमिनीवरून केलेले रॉकेट हल्ले आपण समजू शकतो, पण अँड्रॉइड आणि आयफोनसारख्या आधुनिक संपर्क तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना संपूर्ण लेबनॉनमध्ये पेजरसारख्या आऊटडेटेड डिव्हाईसद्वारे, वॉकीटॉकीद्वारे शेकडो साखळी स्फोट घडवून आणले गेले. त्यावर कडी म्हणजे बैरूतच्या अनेक भागात घरातील सौरऊर्जा प्रणालींचेही स्फोट घडवले गेले. हे स्फोट कोणी आणि कसे घडवून आणले हा लेबनानसाठी अभ्यासाचा विषय असला; तरी संपूर्ण जगाच्या आणि खास करून आपल्या देशाच्या दृष्टीने, हा गंभीर विषय आहे. काही तज्ज्ञांच्या मते; एखाद्या संस्थेची, एखाद्या सरकारी खात्याची, तर कधी देशाच्या संरक्षणप्रणालीची कॉम्प्युटर साईट हॅक करून तिच्या कार्यक्षमतेत अडथळे आणले जातात, महत्वाची आणि गोपनीय माहिती हस्तगत केली जाते. त्याप्रकारे पेजर प्रणालीचा ताबा घेऊन हे स्फोट घडवून आणले असावेत. यात तथ्य असेल तर संशयाची सुई आपोआप इस्त्रायलची गुप्तचर संघटना 'मोसाद'कडे वळली. कारण आज जगातली सर्वात कार्यक्षम गुप्तचर यंत्रणा म्हणून या संघटनेचे नाव घेतले जाते आणि लेबनॉनमधील हिजबुल्लाह या अतिरेकी संघटनेला इस्त्रायलची शत्रू मानले जाते. या संघटनेचे अतिरेकी कालबाह्य झालेल्या पेजरप्रणालीचा अजूनही वापर करतात ही गुप्त माहिती हीच संघटना हॅक करू शकते, असे या तज्ञांचे मत आहे.

अवघे जग आज युध्दाच्या रणात इस्रायलचे भय बाळगून आहे. या राष्ट्राने युध्दतंत्रात तसेच शत्रुंचा सूड उगवण्याच्या बाबतीत बरीच मोठी मजल मारली आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही इस्रायलचे नाव कौतुकाने घेतले जाते. अशा या राष्ट्राने शत्रू राष्ट्राच्या हृदयात धडकी भरेल, अशा पध्दतीने तंत्रज्ञानाचा वापर करत लष्करी कारवाया केल्या आहेत. गेल्या काही वर्षांपासून अरब राष्ट्रे अधून मधून इस्रायलची खोड काढतात, या देशावर छोटे-मोठे हल्ले करतात. मात्र त्यानंतर त्यांना मोठ्या हल्ल्यांना सामोरे जावे लागते. इस्रायल त्यांना नेस्तनाबूत करणारे उत्तर देतो. गेल्या वर्षी हमास या अतिरेकी संघटनेने इस्रायलवर गनिमी पध्दतीने हल्ला करत अनेक नागरिकांना उचलून नेऊन गाझा पट्टी आणि अन्य प्रांतांमध्ये ओलिस ठेवले. या बदल्यात इस्रायलवर सूड उगवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र हमासला धडा शिकवण्याबरोबरच अशा कृत्यांना पाठिंबा देणाऱ्या लेबेनॉनच्या हिज्बुल्ला या अतिरेकी संघटनेलाही इस्रायलने तडाखा दिला. ही संघटना आपल्या देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आणत असल्याचा आरोप करत तिचे अनेक मोहरे टिपायला सुरुवात केली. आपल्या देशाविरुध्द कट रचणाऱ्यांना धडा शिकवण्याचा एक प्रयत्न म्हणून लेबेनॉनमध्ये ठराविक लोकांकडे असलेल्या पेजर, वॉकीटॉकी किंवा सौर प्रणालींमध्ये स्फोट घडवून आणण्याचे थक्क करणारे कसब इस्रायलने दाखवून दिले आहे.

काही तज्ज्ञांच्या मते, पेजर प्रणाली इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसमार्फत चालते. रेडिओ सिग्नल्सना मेसेजमध्ये रूपांतरित करणारे तंत्रज्ञान त्यात वापरले गेले आहे. तेव्हा ती डिजिटल डिव्हाईसमार्फत चालणाऱ्या प्रणाली सारखी हॅक करणे शक्य नाही. एक गोष्ट निश्चित, हे कृत्य कोणाचचेही असले तरी एकाच देशात, एकाच वेळेस पेजर, वॉकीटॉकी आणि सौर ऊर्जा प्रणाली या तीन वेगवेगळ्या घटकांमगील तंत्रज्ञान वापरून मानवाने आपल्या सुविधांसाठी लावलेले शोध स्फोट घडवून आणण्यासाठी वापरले गेले. या हल्ल्यांमध्ये टार्गेट केलेली साधने अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून बनवलेली नाहीत आणि आज त्यांचा वापरही मर्यादिपुरताच होत असलेला दिसतो. आज पेजरची आधुनिक आवृत्ती म्हणून स्मार्टफोन, आयफोन यांचे शोध लागले आहेत. आज बहुतेक व्यक्ती त्यांचा वापर करतात. आणि हीच जागाच्या दृष्टीने गंभीर म्हणण्यासारखी बाब आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या एक अब्ज चाळीस कोटींच्या आसपास आहे. किमान ३५ टक्के लोकसंख्या ही डिजिटल डिव्हाईसमार्फत चालणाऱ्या स्मार्टफोनचा वापर करते. अशा स्मार्टफोनना टार्गेट करून ही स्मार्टफोन प्रणाली शत्रू राष्ट्र अथवा अतिरेकी संघटनांकडून अशा पद्धतीने हॅक केली गेल्यास कल्पनाही करवत नाही, अशी भयंकर हानी इथे घडवून आणली जाईल. नव्हे, काही संहारक बुध्दीजीवी या कार्याला लागलेसुध्दा असतील!

आजवर भारतात आयएसआयएस, लष्कर ए तोयबा, हिजबुल मुजाहिद्दीनसारख्या अतिरेकी संघटनांकडून काश्मीर, दिल्ली, मुंबई अगदी पुण्यातसुध्दा बॉम्बस्फोट केले गेले. आज अशा घटनांचे प्रमाण अगदी नगण्य झाले आहे. याचे सगळे श्रेय आपल्या गुप्तचर खात्याला जाते. कारण आपल्या हस्तकांमार्फत आणि स्मार्टफोनवर अतिरेक्यांच्या चालत असलेल्या संभाषणाद्वारे, संदेशवहनाद्वारे त्यांचे अतिरेकी मनसुबे आपले गुप्तचर खाते उधळून लावत असते. पण अलिकडच्या काळात लेबनॉनमध्ये होत असलेले साखळी बॉम्बस्फोट हे देशाच्या संरक्षण आणि गुप्तचर खात्यासाठी चिंतेची म्हणावी अशी बाब आहे. एक तर हे स्फोट करण्यामागे कोणाचा हात आहे, ते करत असताना नक्की कोणती प्रणाली वापरली गेली आणि पेजरसारख्या कालबाह्य आणि इलेक्ट्रॉनिक्स डिव्हाईस मार्फत हे कसे शक्य झाले या गोष्टी गंभीरपणे विचार करायला लावणाऱ्या आहेत. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला होऊन त्याच्या दोन्ही उत्तुंग इमारती जमीनदोस्त केल्या गेल्या. त्यावेळी अतिरेक्यांना विमान चालवण्याचे प्रशिक्षण दिले गेले होते. परदेशी भूमीवर जाऊन नियोजनबध्द पद्धतीने केले गेलेले ते हल्ले पाहून त्यावेळी दहशतवादाची खाण असलेल्या पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे अतिरेक्यांच्या हाती लागण्याची चिंता व्यक्त केली गेली होती. आज पुन्हा जगाला, खास करून भारताला त्याच काळजीने ग्रासले असल्यास नवल नाही.


लेबनॉनमधे स्फोट घडवून आणण्यासाठी वापरले गेलेले अज्ञात तंत्रज्ञान अतिरेकी आत्मसात करू शकले तर आपल्या देशाच्या सार्वजनिक मालमत्तेची आणि मानवी जीवांची अपरिमित हानी घडवून आणली जाईल. आणि ते विनाशकारी तंत्रज्ञान अँड्रॉइड स्मार्टफोन, आयफोनमधील प्रणालीला हॅक करून वापरले गेल्यास सगळे जग हादरवून टाकले जाईल. कारण आजच्या आधुनिक युगात घरोघरी स्मार्टफोन वापरले जातात. या स्फोटांमागील आधुनिक तंत्रज्ञान लवकरच समोर येईल; ते अतिरेकी संघटनांपर्यंत पोहोचल्यास जगाची काय अवस्था होईल याची कल्पनादेखील करवत नाही. दोन राष्ट्रांमधील युध्दात हँडग्रेनेड, बॉम्ब, क्षेपणास्त्रे यांचा वापर केला जातो. १९३८ मध्ये संहारक अण्वस्त्रांचा शोध लागला, कैक देश आज अण्वस्त्रसंपन्न झाले पण, त्यांचा वापर फक्त अमेरिकेने दोन वेळा केला. आजवर ते तंत्रज्ञान वापरून कोणीही समोरच्या शत्रूराष्ट्राची अपरिमित हानी केली नाही. कारण दोन राष्ट्रांचे आपसात कसेही संबंध असले तरी बाह्य जगाला अशा कृतीबाबत उत्तर द्यायची बांधिलकी बहुतेक राष्ट्रे पाळतात. काही राष्ट्रांनी युध्दात रासायनिक अस्त्रांचा वापर केल्याचे आरोप झाले, पण ते तथ्यहीन होते. अतिरेकी कारवायांमध्ये आरडीएक्स, टीएनटीसारखी संयुगे वापरली जातात. त्यांना प्रत्यक्ष हल्ले म्हणता येईल. त्यातून होणाऱ्या हानीची व्याप्ती ठराविक ठिकाणापुरती मर्यादित असते. लेबनॉनमधे स्फोट घडवून आणताना वापरले गेलेले तंत्रज्ञान एका देशाने आपल्या शत्रू अतिरेकी संघटनेविरुद्ध वापरले, असा प्राथमिक संशय आहे. पण हेच तंत्रज्ञान हाती लागल्यास अतिरेकी संघटना त्याचा कुणाविरुध्द वापर करतील याची काहीच शाश्वती नाही.

एक गोष्ट नक्की आपल्या देशाची गुप्तचर संघटना आणि संरक्षण यंत्रणेला यापुढे अधिक कार्यक्षमतेने कार्य करावे लागेल आणि सामान्य जनतेला कुठल्याही क्षणी बसू शकणाऱ्या अनपेक्षित हादऱ्यांना सामोरे जायचे बळ बाळगून राहावे लागेल.

◇◇◇

**सरकारने अलिकडेच ७० वर्षांवरील वृद्धांचा आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत समावेश करण्याचा निर्णय घेतला. या सर्व वृद्धांना पाच लाख रुपयांच्या मोफत आरोग्य विमा कवच योजनेचा लाभ मिळावा, असे सरकारचे उद्दिष्ट आहे. देशातील साडेचार कोटी कुटुंबांमधील सहा कोटी ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ मिळणार आहे. या योजनेचे स्वागत करताना काही त्रुटी आणि अपेक्षित बदलही समजून घेतले पाहिजेत.**

# खऱ्या अर्थाने 'आयुष्मान' करायचे तर...



परामर्ष

**हेमंत देसाई**

ज्येष्ठ पत्रकार

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या अलिकडेच झालेल्या बैठकीत ७० वर्षांवरील वृद्धांचा आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत (एबीपीएम-जे) समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सर्व वृद्धांना पाच लाख रुपयांच्या मोफत आरोग्य विमा कवच योजनेचा लाभ मिळावा, असे सरकारचे उद्दिष्ट आहे. देशातील साडेचार कोटी कुटुंबांमधील सहा कोटी ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ मिळणार आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना नवीन आणि स्वतंत्र आयुष्यमान कार्ड दिले जाणार आहे. या योजनेचे स्वागत केले पाहिजे. 'आयुष्मान भारत' योजनेमध्ये आता आधी समाविष्ट केलेल्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश केला जाणार आहे. या ज्येष्ठांना दर वर्षी पाच लाख रुपयांपर्यंतचे टॉप अप कव्हर मिळेल. सध्या केंद्राच्या कोणत्याही दुसऱ्या आरोग्य योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या जे ज्येष्ठ नागरिकांना 'आयुष्यमान भारत' योजनेत समाविष्ट होण्याचा पर्याय उपलब्ध असेल. एबीपीएम-जे योजना जगातील सर्वात मोठी सार्वजनिक आरोग्य विमा योजना आहे. देशातील तळाच्या वर्गात असलेल्या ४० टक्के लोकसंख्येला त्याचा फायदा होत आहे. ही योजना ज्येष्ठ नागरिकांनाही लागू करण्याचे आश्वासन भाजपने लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात दिले होते. केंद्र सरकारच्या आयुष्मान ॲपमार्फत अथवा सरकारच्या कोणत्याही आरोग्य केंद्रातील 'आयुष्मान भारत' काउंटरवर या विम्यासाठी नोंदणी करता येणार आहे. केवळ ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली की, लाभधारकांना आपल्या विम्याचा वापर करून घेणे शक्य होईल. मात्र एखाद्या कुटुंबात ७० वर्षांवरील दोन व्यक्ती असल्यास पाच लाखांचा विमा त्यांच्यात वाटला जाईल.

एबीपीएमजे योजनेत आत्ताच एक कोटी ७८ लाख व्यक्ती समाविष्ट आहेत. अतिरिक्त टॉप अपचा फायदा देण्याचा सरकारवर येणारा बोजा हा अत्यल्प आहे. आयुष्मान भारत योजनेमध्ये १,६०० विविध प्रकारचे वैद्यकीय उपचार अंतर्भूत आहेत. म्हणजे त्यासाठी येणाऱ्या खर्चाची भरपाई करून दिली जाते. केंद्र सरकारची सीजीएचएस आरोग्य योजना, निवृत्त लष्करी जवानांसाठी असलेली कॉन्ट्रीब्युटरी हेल्थ स्कीम तसेच रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी असणारा विमा अशा वेगवेगळ्या योजनांचा लाभ सध्या ८० लाख लोकांना मिळत आहे. त्याच्या लाभधारकांना विद्यमान योजनेत राहता येईल किंवा 'आयुष्मान भारत' योजनेमध्ये समाविष्ट होता येईल. मात्र राज्य कामगार विमा महामंडळांच्या विमा योजनेमध्ये समावेश असलेल्या व्यक्तींना त्याचे फायदे घेतानाच 'आयुष्मान भारत'चाही लाभ घेता येईल. याचे कारण राज्य विमा योजनेचा प्रीमियम सरकार भरत नाही, तर विमा उतरवणारी व्यक्ती आणि ती काम करत असलेल्या आस्थापनेचा मालक भरत असतात. स्वतःचा खाजगी विमा काढणारेदेखील 'आयुष्मान भारत' विमाछत्राला पात्र असतील. या अशा योजनांचा सरकारवर किती भार येतो, याचा विचार करावाच लागतो. मूळ योजनेचा विस्तार करताना केंद्र सरकारला सुरुवातीला ३,४३७ कोटी रुपये इतका खर्च येणार आहे. चालू वर्षातील सहा महिने आणि पुढील वर्षाचा खर्च त्यातून भागू शकेल.

या योजनेतील ४० टक्के वाटा राज्यांनी उचलायचा आहे. विविध राज्यांची हा वाटा उचलण्याची क्षमता आहे का नाही, हे बघावे लागेल. आज नवी दिल्ली, पश्चिम बंगाल आणि ओडिशा या राज्यांमध्ये 'आयुष्मान भारत' ही योजना राबवली जात नाही. अर्थात असे असले तरी वयस्कर व्यक्तींसाठी सरसकट विमा संरक्षण असणे, अत्यावश्यक आहे. याचे कारण नोकरी-व्यवसाय करताना अनेक शारीरिक आणि मानसिक यातनांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे भारतातील सरासरी आयुर्मर्यादा वाढली असली, तरीदेखील लोकांच्या विविध स्वरूपाच्या आजारांचेही प्रमाण वाढले आहे. त्याचप्रमाणे आज उपचारांचा तसेच औषधांचा आणि खास करून शस्त्रक्रियांचा खर्च मोठा आहे. २०११ ची जनगणना झाली, तेव्हा भारतातील केवळ साडेआठ टक्के लोकसंख्या साठ वर्षांपेक्षा अधिक वयाची होती. २०५० पर्यंत हे प्रमाण १९ टक्क्यांवर जाईल, असा अंदाज आहे. म्हणजे अशांची संख्या येत्या २५ वर्षांमध्ये ३२ कोटींच्या आसपास असेल. म्हणजेच २०११ च्या तुलनेत हे प्रमाण खूपच वाढणार आहे. २०११ मध्ये भारतात साठ वर्षांवरील एकूण दहा कोटी लोक होते. ज्येष्ठ नागरिकांना इस्पितळात अधिक दिवस रहावे लागते आणि त्याचा खर्च मोठा असतो. म्हणूनच ज्येष्ठ नागरिकांना विम्याचा लक्षणीय फायदा होणार आहे. आरोग्य विमा असलेल्यांचे दाखल होण्याचे प्रमाण तरुणांमध्ये सरासरी तीन-चार टक्के तर ज्येष्ठांमध्ये सात टक्के आहे. देशातील साठ वर्षांवरील केवळ वीस टक्के लोकसंख्येला आज कोणते ना कोणते विमा कवच आहे. बाकीच्यांना त्याची नितांत गरज आहे. म्हणूनच केंद्र सरकारने ज्येष्ठांसाठी सुरू केलेल्या योजनेचा सर्वांनी लाभ घेतला पाहिजे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ही योजना अतिशय महत्त्वाकांक्षी आहे. कोणत्याही योजनेचे यश योजना किती चांगली आहे, यापेक्षा ती कशी राबवली जाते, राबवणारी यंत्रणा किती प्रामाणिक आहे आणि या योजनेशी संबंधित घटक ती राबवण्यास कसा हातभार लावतात, यावर अवलंबून असते. 'आयुष्यमान भारत योजने'चेही तसेच आहे. सरकारी आरोग्ययंत्रणा सर्वांना पुरेशी नाही आणि खासगी क्षेत्र तर फुकट (नंतर ते पैसे संबंधितांना मिळणार असताना) उपचार करायला नकार देतात. वास्तविक, अशा महत्त्वाकांक्षी योजनेला ठराविक रुग्णालये न जोडता देशातील सर्व रुग्णालयांना ती सक्तीची करायला हवी. तसेच अशा योजनेतील रुग्णांवर उपचार करण्यास चालढकल करणाऱ्या, दाखल करून न घेणाऱ्या, उपचारात कुचराई करणाऱ्या किंवा उपचार गांभीर्याने न करणाऱ्यांवर कारवाईची तरतूद असायला हवी. त्याचबरोबर चांगली कामगिरी करणाऱ्या, रुग्णसेवेचा चांगला रेशो असणाऱ्या रुग्णालयांना प्रोत्साहनात्मक मदतीची, पाठीवर शाबासकीची थाप मारण्याची व्यवस्था असायला हवी. या योजनेच्या चार वर्षांच्या वाटचालीबाबत उपलब्ध माहितीनुसार ३.९५ कोटी रुग्ण (पेशंट ॲडमिशन्स) भरती करण्यात आले. त्यानुसार गरजू रुग्णांवर या योजनेचा भाग म्हणून सुमारे ४५ हजार २९४ कोटी रुपयांचे उपचार करण्यात आले. कोरोना महासाथीने देशभर थैमान घातल्यानंतर गरजू रुग्णांवर आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपचार करण्यात यावेत, अशा सूचना केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून देण्यात आले; मात्र त्याचे प्रत्यक्ष लाभ नागरिकांना किती मिळाले याबाबत मतमतांतरे आहेत.

जगातील अनेक विकसित आणि विकसनशील देशांच्या अर्थसंकल्पामध्ये आरोग्यासाठी केली जाणारी तरतूद आणि भारतात केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये आरोग्यासाठी केली जाणारी तरतूद यामध्ये कमालीची तफावत आहे. २०१७-१८ या आर्थिक वर्षात देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.३ टक्के एवढी असलेली सार्वजनिक आरोग्य सेवेवरील तरतूद दर वर्षी वाढणे अपेक्षित असताना २०१८-१९ मध्ये ३.२ टक्के पर्यंत खाली आलेली पाहायला मिळाली. या काळात राष्ट्रीय आरोग्य योजनेतील केंद्र सरकारचा वाटाही सातत्याने घसरत चाललेला पहायला मिळत आहे. त्यामुळेच इतर विकसित आणि विकसनशील देशांच्या तुलनेत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण हे भारताच्या प्राधान्यक्रमावरच नसल्याची टीका सातत्याने होताना दिसून येते. आयुष्मान भारत योजना सुरू झाली, तेव्हा नीती आयोगासारख्या इतर विद्यमान आरोग्य सेवा योजनांशी या नव्या योजनेचा ताळमेळ कसा घालायचा हा प्रश्न होता. आज योजनेला चार वर्षे पूर्ण झाल्यानंतरही काही मूलभूत आरोग्यसेवा आव्हाने कायम आहेत. योजनेतील डॉक्टर, आजार, केंद्रांची संख्या असे काही प्रश्न आहेत. अनेक खासगी रुग्णालयांकडून रुग्णांना या योजनेचा लाभ देणे शक्य नसल्याचे वेळोवेळी स्पष्ट करण्यात आले आहे. बनावट देयके सादर करून या योजनेचा गैरवापरही झाल्याची काही उदाहरणे आहेत. ठराविक सुविधाच नसलेल्या रुग्णालयांकडून ते उपचार केल्याचा दावा करून लाभ मिळवण्याचा प्रयत्न झाला आहे. यामुळे काही रुग्णालयांना दंडही ठोठावण्यात आला आहे. आज चार वर्षांनंतरही या योजनेतील त्रुटी दूर करण्यात सरकारला यश आलेले नाही.

◇◇◇

# प्रसादाने श्रद्धांना तडा

वादविवाद

**अजय दीक्षित**

**तिरुपती बालाजी देवस्थानमध्ये देण्यात आलेल्या लाडवांच्या प्रसादात चरबी आणि माशाचे तेल वापरण्यात आल्याच्या आरोपावरून काहूर माजले. हा भाविकांच्या श्रद्धांशी खेळ आहे. त्यावरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकारण सुरू असले, तरी तिरुपती देवस्थानच्या प्रतिमेला धक्का बसतो आहे. या प्रकाराचा नेमका सोक्षमोक्ष लावून वाद संपवणे गरजेचे आहे.**

आंध्र प्रदेशमधील तिरुपती मंदिराच्या प्रसादा(लाडू)मध्ये वापरण्यात आलेल्या तुपात प्राण्यांची चरबी आणि माशाचे तेल असल्याचा एक अहवाल अलिकडेच समोर आला. या प्रकरणावर प्रत्येकजण प्रश्न उपस्थित करत आहे. प्रसादात भेसळ करून हिंदूंच्या श्रद्धेला तडा दिला गेल्याचा आरोप केला जात आहे. लाडू बनवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या तुपात प्राण्यांची चरबी मिसळल्याचे प्रयोगशाळेत केलेल्या चाचण्यांमधून स्पष्ट झाल्याचे आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी जाहीर केल्यानंतर देशभर खळबळ उडाली. दुसरीकडे, अशा प्रकारच्या अहवालालाच आव्हान देण्यात आले आहे. केंद्र सरकारने चार कंपन्यांच्या तुपांचे नमुने तपासले असून एका कंपनीला नोटीस पाठवली आहे. त्याच वेळी नायडू यांच्या आरोपावर माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे तर काहींनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळाच्या अहवालाबाबत चिंता व्यक्त केल्यावर हा वाद सुरू झाला. 'एआर डेअरी फूड प्रायव्हेट लिमिटेड'च्या तुपात प्राण्यांची चरबी मिसळल्याची पुष्टी अहवालात मिळाल्याचे चंद्राबाबूंनी सांगितले; परंतु असे तूप खरेदी केलेच नाही, संशय आल्यानंतर तूप नाकारण्यात आल्याचे माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी सांगितले. कोण खरे, कोण खोटे हे तपासात उघड होईल; परंतु त्यांच्या धार्मिकतेचा आणि तिरुपती देवस्थानमधील लाडवांमध्ये झालेल्या भेसळीचा संबंध लावला जात आहे. मंदीर संस्थानाला तूपपुरवठा करणारे उत्पादक बाजारभावापेक्षा खूपच कमी दराने तूप पुरवत होते, तेव्हा मंदिर संस्थेशी संबंधित लोकांना संशय येऊ लागला. अशा स्थितीत तुपाचा दर्जा तपासण्याची मागणी जोर धरू लागली. संशय अधिक गडद झाल्याने मंदिरात तूपपुरवठा करणाऱ्या सर्व डेअरीच्या तुपाची चाचणी घेण्यात आली. प्रीमियर ॲग्री फूड्स, कृपाराम डेअरी, वैष्णवी, श्री पराग मिल्क आणि एआर डेअरी फूड तिरुमला तिरुपती देवस्थानला तूप पुरवत असे. या घटनेचा परिणाम भारतातील इतर मंदिरांवरही झाला आहे. वाराणसीतील काशी विश्वनाथ मंदिरात अधिकारी आता अतिरिक्त दक्षता घेत आहेत. प्रशासनाने मंदिरात बनवल्या जाणाऱ्या लाडूंची शुद्धता तपासण्यास सुरुवात केली आहे. देशातील प्रत्येक मोठ्या देवस्थानाच्या प्रसादालयात बनवल्या जाणाऱ्या प्रसादासाठी मागवण्यात येणाऱ्या कच्च्या मालाची गुणवत्ता तपासण्यासाठी प्रयोगशाळा असतात. शिर्डीच्या साई संस्थानचीही प्रयोगशाळा आहे. त्यात कच्च्या मालाची गुणवत्ता तपासली जाते. त्याचबरोबर दैनंदिन भोजनालयातील अन्नाची चवही अगोदर प्रसादालय व्यवस्थापक घेतात आणि नंतरच भाविकांना दिले जाते. या पार्श्वभूमीवर तिरुपती बालाजी देवस्थानकडे प्रयोगशाळा असताना तुपातील चरबी त्यांच्या लक्षात आली नाही का, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो.



आंध्र प्रदेशमधील तिरुपती बालाजी भगवान विष्णूचे अवतार आहेत. गेल्या तीनशे वर्षांपासून त्यांच्या मंदिरात येणाऱ्या हिंदू भाविकांना प्रसाद म्हणून लाडू दिले जात असून या लाडूला २०१४ मध्ये 'जीआय' टॅगही मिळाला आहे. म्हणजे तिरुपती तिरुमला नावाचा हा लाडू फक्त आंध्र प्रदेशच्या तिरुपती मंदिरातच मिळतो. असे असताना चंद्राबाबू नायडू यांच्या दाव्यामुळे मोठा राजकीय वाद निर्माण झाला. वायएसआर काँग्रेसच्या जगनमोहन रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तिरुपतीमधील श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिरालाही सोडले नाही आणि लाडू बनवण्यासाठी निकृष्ट साहित्य आणि प्राण्यांची चरबी वापरली, असा आरोप त्यांनी केला. तुपाच्या नमुन्यात प्राण्यांची चरबी, 'लार्ड' (डुकराच्या चरबीशी संबंधित) आणि माशांचे तेल असल्याचा दावाही केला होता. नमुने गोळा करण्याची तारीख ९ जुलै २०२४ होती आणि प्रयोगशाळेचा अहवाल १६ जुलैचा होता. निविदेतील अटीनुसार, तूप खरेदी केल्यानंतर त्याची चाचणी करणे आवश्यक असते. चाचणीनंतरच तुपाचा वापर करायचा असतो. निविदेतील अटींचा भंग करून तूप चाचणीसाठी पाठवण्यात आले नाही. निविदेतील कलम ८० नुसार, पुरवठा केलेल्या तुपाच्या प्रत्येक खेपेसाठी एनएबीएल प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. याशिवाय, निविदा कलम ८१ नुसार तुपाचे नमुने तिरुमला तिरुपती देवस्थान (टीटीडी) ला प्रयोगशाळा चाचणीसाठी पाठवणे बंधनकारक आहे. या पार्श्वभूमीवर ऑगस्ट २०२३ ते जुलै २०२४ या कालावधीत काळ्या यादीत टाकलेल्या कंपनीच्या आधीच्या नमुन्यांमध्ये ही भेसळ कशी आढळून आली नाही, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

तिरुपती देवस्थान ट्रस्टने 'एनएबीएल' प्रमाणपत्रासाठी तसेच चाचणीसाठी नमुने पाठवले नाहीत का, हा प्रश्न उरतो. काळ्या यादीत टाकलेल्या कंपनीच्या ज्या बॅचमध्ये भेसळ आढळली, त्याचे 'एनएबीएल' प्रमाणपत्र सादर केले नाही का? गुणवत्तेच्या कमतरतेचे कारण म्हणजे 'इन हाऊस लॅब'चा अभावही समोर आला. नमुने तपासणीसाठी बाहेरील प्रयोगशाळेत पाठवणे आणि वाजवी दर नसणे या कमतरतांचा फायदा घेत पुरवठादारांनी ३२० ते ४११ रुपये प्रती किलोचा दर घेत तूपपुरवठा केला. तेलगु देसम पक्षाच्या सरकारने तिरुपती देवस्थानचे कार्यकारी अधिकारी म्हणून जे. एस. राव यांची नियुक्ती केली. त्यानंतर भेसळीचा अहवाल आला आणि 'एआर डेअरी फूड'चा करार रद्द करण्यात आला. 'एआर डेअरी'ने म्हटले आहे की नामांकित 'एनएपीएल लॅब'मध्ये चाचणी केल्यानंतर आणि ॲगमार्क प्राधिकरणाद्वारे प्रमाणित केल्यानंतरच आम्ही तुपाचे टँकर पाठवले. पाचपैकी एका टँकरबाबत तिरुपती देवस्थानची तक्रार होती. त्या एका टँकरच्या अहवालालाही आम्ही आव्हान दिले आहे. तिरुपती देवस्थानाला दररोज दहा टन तूप लागते. त्यापैकी आम्ही ०.१ टक्कादेखील तूप पुरवत नाही. अहवालात इतर कारणेही नमूद करण्यात आली आहेत. उदाहरणार्थ, हे चारा किंवा जनावरांच्या औषधामुळेदेखील होऊ शकते. अहवालात आमचे नाव नाही. आम्ही आरोप फेटाळून अहवालाला आव्हान दिले आहे.

तिरुपती मंदिरानंतर पाटण्यातील महावीर मंदिरात लाडूंची सर्वाधिक विक्री होते. बुद्ध मार्गावर असलेल्या एका कारखान्यात तामिळनाडू आणि कर्नाटकमधील कारागीर प्रसाद म्हणून लाडू तयार करतात. तिथे महावीर मंदिराचे लाडू तयार केले जातात. कारखान्याचे प्रभारी आर. शेषाद्री म्हणाले की नैवेद्य तयार करण्यासाठी बेसन, हरभरा डाळ, शुद्ध गायीचे तूप (नंदिनी ब्रँड), काजू, बेदाणे आणि वेलची यांचा वापर केला जातो. तिरुपती मंदिरातही पूर्वी फक्त नंदिनी तूप वापरले जात होते; परंतु भाव वाढल्याने अन्य कंपन्यांचे तूप वापरण्यास सुरुवात झाली. पाटण्याच्या महावीर मंदिरात मात्र भाव वाढल्यानंतरही नंदिनी तूप घेणे थांबवले गेले नाही. तिरुपतीनंतर देशात दुसऱ्या क्रमाकांच्या लाडूची विक्री तिथे होते. शिर्डीतही साई संस्थान पूर्वी भाविकांना लाडू देत होते. कोणतेही तूप वापरले तरी लाडू बनवल्यानंतर काही वेळात गोठते. त्यामुळे लाडवाला बुरशी लागल्यासारखे दिसते. वास्तविक ती बुरशी नसते; परंतु संशयाला जागा नको, म्हणून आता साई संस्थानने भाविकांना लाडूऐवजी बुंदीचा प्रसाद द्यायला सुरुवात केली आहे. बुंदी तेलात तळली जाते. ती सुकवून भाविकांना दिली जाते. त्यामुळे ती कितीही काळ टिकते. लाडवाचे तसे नसते. लाडू गरम गरम असतानाच बांधावे लागतात. ते सुकल्यानंतर काही काळाने तूप पुन्हा गोठते. बुंदी न वाळवता पॅक केली आणि तुपात तयार केली असल्यास वास येतो. या पार्श्वभूमीवर देशात महागाई वाढत असताना उत्पादन खर्चापेक्षा कमी दरात तिरुपती बालाजी देवस्थानला कमी दरात तूप देण्याची तयारी उत्पादकांनी का दाखवली आणि विश्वस्तांनी त्यावर अंधपणाने विश्वास का ठेवला, असे प्रश्न उपस्थित होतात. कर्नाटकच्या नंदिनी दूध संघाने २०१५ मध्ये ३२४ प्रति किलो दर दिला होता, तेव्हा महाराष्ट्रातील 'गोविंद मिल्क अँड मिल्क प्रॉडक्टस्'ची २७६ प्रति किलो दराची निविदा तिरुपती देवस्थानने मंजूर केली होती. आठ वर्षांनंतर महागाई वाढली. गायीच्या तुपाची किंमत ५०० रुपये प्रति किलो असताना एका खासगी कंपनीने ३२० रुपये प्रति किलो दराने कसे देऊ केले, असा प्रश्न विश्वस्त मंडळाला पडला नाही. आत्ता मंदिराने ४७५ रुपये प्रति किलो दराने नंदिनी तूप खरेदी करणे पुन्हा सुरू केले आहे. तिरुपती देवस्थान देत वा विकत असलेले लाडू सुरक्षित आणि भेसळमुक्त आहेत, याची खात्री करण्याची जबाबदारी देवस्थानची आहे; मात्र तूप पुरवठादाराला दोषी ठरवून ते या प्रकरणापासून स्वतःला दूर ठेवू इच्छितात. गोमांस हा वादाचा विषय आहे आणि आता तो प्रसादमशी जोडला गेला आहे, हे पाहता राजकीय पक्षांनी तणाव निर्माण करणे टाळायला हवे होते. आता आरोप-प्रत्यारोप झाले आहेत आणि संशयाची बीजे पेरली गेली आहेत. लाडूचे पावित्र्य विज्ञानाच्या आधारेच ठरवले पाहिजे.

◇◇◇

# माध्यमांवर अंकुश लावण्याला चाप

दृष्टीक्षेप

**महेश जोशी**

**माध्यमांवर अप्रत्यक्ष अंकुश लावण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने अलिकडेच वेसण घातली. उच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या 'माहिती-तंत्रज्ञान नियमावली'तील बदल बेकायदा आणि घटनाविरोधी ठरवला आहे. असे असले, तरी माध्यमे आता किती विश्वासार्ह आहेत हे ही वेळोवेळी दिसले आहे. केंद्र सरकारच्या गळ्यात कुणी तरी घंटा बांधायला हवी होती. ते काम मुंबई उच्च न्यायालयाने केले.**




केंद्र सरकारची 'पीआयबी'यंत्रणा म्हणजे पत्र सूचना कार्यालय केंद्र सरकारच्या विविध खात्यांची माहिती प्रसारमाध्यमांपर्यंत वा थेट लोकांपर्यंत पोहोचवते. 'पीआयबी' केंद्रीय माहिती आणि प्रसारण खात्याच्या अखत्यारीत येते. तिला केंद्र सरकारने व्यापक अधिकार दिले. समाजमाध्यमांवर सरकारचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उल्लेख असलेली कोणतीही माहिती खरी की खोटी, हे तपासण्यासाठी 'पीआयबी फॅक्ट चेक युनिट' स्थापन झाले. 'पीआयबी'च्या या सत्यपरीक्षण शाखेने समाजमाध्यमांवरील कुणाचीही नोंद असत्य किंवा दिशाभूलकारक ठरवल्यास तातडीने काढून न टाकल्यास समाजमाध्यम कंपनीवरच कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार सरकारला मिळाले. राज्यघटनेत याबाबत कोणताही उल्लेख नसताना असा अधिकार देणेच मुळात चूक होते. राज्यघटनेने सरकारला हा अधिकार दिलेला नाही, असे उच्च न्यायालयाने अलिकडेच ठणकावले. समाजमाध्यमांवर खऱ्या आणि खोट्या माहितीचा धबधबा वहात असतो. अशी माहिती टाकणाऱ्यांवरच या माहितीच्या खरेखोटेपणाची जबाबदारी असते. समाजमाध्यम चालवणाऱ्या कंपनीचा या मजकुराशी संबंध नसतो. केंद्र सरकारने 'पीआयबी'ला त्याबाबतचे अधिकार देणे, हे या कंपन्यांवर दबाव आणण्यासारखे होते; परंतु त्याबाबत एकाही समाजमाध्यम कंपनीने केंद्र सरकारच्या विरोधात उच्च न्यायालयात जाण्याचे धाडस केले नाही. कुणाल कामरा या विनोदकाराने उच्च न्यायालयात धाव घेतली. प्रकरण न्यायप्रविष्ट असताना केंद्र सरकारने २० मार्च २०२४ रोजी 'पीआयबी फॅक्ट चेक युनिट'ची स्थापना करून टाकली. या कृतीला सर्वोच्च न्यायालयाने २१ मार्चला स्थगिती दिली. मुंबई उच्च न्यायालयाने त्याच्या पुढे जात हा निर्णयच बेकायदा ठरवला.

राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ (कायद्यापुढे सारे समान), अनुच्छेद १९-१ (उच्चारस्वातंत्र्य) या मूलभूत हक्कांचा भंग करणारा नियम असल्याने उच्च न्यायालयाने तो रद्द ठरवला. 'पीआयबी फॅक्ट चेक युनिट'चा सरकारने घातलेला घाट हा पूर्णत: बेकायदा आणि राज्यघटनेच्या 'पायाभूत चौकटी'च्याही विरुद्ध जाणारा ठरतो. एकीकडे सरकार करत असलेली माध्यमांची मुस्कटदाबी न्यायालये रद्द ठरवत असली, तरी मुद्रित माध्यमे किती निस्पृहतेने आणि निर्भीडपणे काम करतात, हा अभ्यासाचा विषय आहे. निवडणुकीच्या काळातच नव्हे, तर एरवीही माध्यमांची विश्वासार्हता पणाला लागलेली असते. कोणत्याही सत्ताधारी पक्षाला माध्यमांचे स्वातंत्र्य डोळ्यात खुपत असते. त्यातही सत्ताधाऱ्यांनी वाकायला सांगितले, तर माध्यमे आता लोटांगण घालायला तयार असतात. निवडणुकीच्या अगोदरपासूनच जाहिरातीचा मलिदा खाण्याच्या नादात अनेक वृत्तपत्रे आपली विश्वासार्हता गमावत चालली आहेत. 'सोशल मीडिया' हा आपला स्पर्धक असून आपण खरे सांगायला तयार नसलो, तर त्यांचे व्यासपीठ लोकांना उपलब्ध आहे, हे दुर्दैवाने माध्यमांच्या लक्षात येत नाही.

गेल्या लोकसभा निवडणुकीतले चित्र पहा. देशात नरेंद्र मोदी यांच्याबाबत असे वातावरण तयार केले गेले होते, की त्यांनाच चारशेहून अधिक जागा मिळतील आणि विरोधकांना फारशा जागा मिळणार नाहीत. माध्यमांमधील बहुतांश जागा मोदी आणि भाजपला मिळत होती. 'इंडिया शायनिंग'च्या काळातही तसेच होत होते. वृत्तपत्र आणि टीव्ही चॅनल्स वारंवार काय सांगतात आणि प्रत्यक्षात ग्राऊंड रिपोर्ट काय आहे, हे भल्याभल्यांना कळले नाही. लोकसभा निवडणुकीतील काही वार्तापत्रे पाहिली. चार उमेदवार असतील, तर चारहीजणांना विजयाची समान संधी असल्याचा निष्कर्ष काढणारे महाभाग कमी नव्हते. महाराष्ट्रातही महाविकास आघाडीला एवढे यश मिळेल, असे कुणीच सांगत नव्हते. पश्चिम बंगालमध्ये तर ममता बॅनर्जी यांना धक्का बसेल, असे अंदाज लावण्यात आले होते. उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष आणि काँग्रेसला कुणीही दहापेक्षा अधिक जागा द्यायला तयार नव्हते आणि ओडिशात नवीन पटनायक यांचे पानिपत होईल, असे कोणत्याही माध्यमाला वाटले नव्हते. राजस्थानमध्ये माध्यमे काँग्रेसला जास्तीत जास्त पाच जागा द्यायला तयार होती. मध्य प्रदेशमध्येही असेच चित्र रंगवले गेले; परंतु चित्र उलटे होते. असे का होते? माध्यमांची जनमानसाशी नाळ तुटली आहे का? माध्यमे जनतेच्या प्रश्नांना हात घालत नाहीत का? सरकारची ती जास्तच तळी उचलतात का? या प्रश्नांची उत्तरे दुर्दैवाने 'हो' अशी आहेत.

आपली मूळ भूमिका विसरून माध्यमे बेताल होऊ लागली आहेत. कितीही स्वातंत्र्यप्रेमी व लोकशाहीनिष्ठ राजवट असली तरी हाती चाबूक घेऊन माध्यमांना ताळ्यावर आणायला सज्ज होती. किंबहुना, कोणतेही सरकार अशा संधीची वाटच बघत असते. अशा वेळी सर्वसाधारण उदारमतवादी जनतेचीही माध्यमांच्या नावे बोटे मोडण्याचा कल असतो. आपला पाय घसरतो आहे, काही तरी चुकते आहे हे पाहण्यासाठी माध्यमांनी आत्मपरीक्षण करण्याची ती वेळ असते; परंतु ते ती करत नाहीत. आपल्या एका वार्ताहराने पत्रकारितेच्या आचाराच्या मर्यादा तोडल्या म्हणून 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या दोन वरिष्ठ संपादकांनी राजीनामे दिले होते आणि 'टाइम्स'ने आठ कॉलम वृत्त प्रकाशित करून चुकांचे विश्लेषण करत स्पष्टीकरण दिले आणि वाचकांची माफी मागितली. त्या वार्ताहराने कुठली चूक केली हे कळले, तर भारतातील अनेक पत्रकार बेशुद्ध पडतील. कारण आपल्याकडे तसल्या 'चुका' करायला वरिष्ठ संपादक उत्तेजन देतात. एवढेच नव्हे तर, वार्ताहराने सदसदविवेकबुद्धीला स्मरून ती 'चूक' करण्याचे नाकारल्यास मेमो देण्यापर्यंत मजल मारतात. 'सीबीएस'सारख्या वाहिन्यांच्या आचारसंहिता वाचूनच आपल्याकडच्या वाहिन्यांना टाळे लावायला लोक कमी करणार नाहीत, अशी परिस्थिती आहे.

लोकशाही आणि वृत्तपत्रस्वातंत्र्य यांचे नाते अतूट आहे हे अगदी बरोबर. वृत्तपत्र स्वातंत्र्य नाही, तेथे खरी लोकशाही असूच शकत नाही. वृत्तपत्रस्वातंत्र्य म्हणजे लोकशाहीचा प्राणवायू; पण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. टीव्ही वाहिन्यांच्या आशयात काही गैर आढळल्यास शासनाकडे त्यांचे परवाने रद्द करण्याचा अधिकार असावा, असा निर्णय भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला होता; परंतु तो मागे घ्यावा लागला. असे असले, तरी वृत्तपत्रे आणि वाहिन्या या मीडियाच्या दोन्ही अंगांनी आज कठोर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे, हे अद्याप आपल्याकडील अनेक माध्यमांच्या लक्षात आलेले दिसत नाही. माध्यमविश्वाची स्वयंनियंत्रणाची यंत्रणा अस्तित्वात नाही आणि 'प्रेस कौन्सिल'ला कोणी भीक घालत नाहीत. शिवाय प्रेस कौन्सिल दंतहीन असून चुकीला शिक्षा करण्याचे अधिकार तिला नाहीत. वाहिन्यांची 'न्यूज ब्रॉडकास्टर्स असोसिएशन' असून तिची आचारसंहिता व स्वयंनियंत्रणाची यंत्रणा आहे, असे सांगितले जात असले, तरी तिचे अस्तित्व कुठे जाणवत नाही. असेल तर 'टीआरपी'ची व्यवस्था लावणे, जाहिरातीच्या वेळा एकमेकांशी विचार करून 'सिंक्रोनाइज' करणे, असल्या बाबतीत ती कार्यरत असते. नैतिक बंधने, आचारसंहिता याचे भान या असोसिएशनला नाही.

भारतातील 'मीडिया'ची विश्वासार्हता कमी झाली आहे. तो अधिकाधिक पक्षपाती होत चालला आहे. आता तर बहुतांश माध्यमांवर सरकारधार्जिण्या भांडवलदारांचे नियंत्रण आहे. जाहिरातदार, भांडवलदार ही आजच्या माध्यमांची दैवते. त्यामुळे 'पेज थ्री'संस्कृतीला उत्तेजन देणारी. सर्व जग भ्रष्टाचारात बरबटलेले आणि मीडियाचे अँकर-रिपोर्टर-मालक मात्र संतमहात्मे आहेत, असे समजून 'मीडिया ट्रायल' केली जाते. बातमी आणि वैयक्तिक मते यातील फरक तर अनेक माध्यमांनी केव्हाच पुसून टाकला आहे. प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याशिवाय लोकशाही निवडणूक हा विरोधाभास ठरेल. आपली भूमिका निभावण्यासाठी, माध्यमांना त्याच्या कव्हरेजमध्ये उच्च पातळीवरील व्यावसायिकता, अचूकता आणि निष्पक्षता राखणे आवश्यक आहे. कायदा आणि नियमन यांनी माहिती आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्य तसेच सहभागासह लोकशाहीसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत स्वातंत्र्यांची हमी दिली पाहिजे. निःपक्षपाती कव्हरेज आणि विरोधी पक्षांना समान महत्व देण्यासाठी सार्वजनिकरित्या निधी प्राप्त सरकारी माध्यमांची आवश्यकता आहे. याबाबत प्रसारमाध्यमांनी तटस्थ आणि सशक्त असणे अत्यंत आवश्यक आहे.

◇◇◇

# लोकशाहीचा तिसरा स्तंभ किती मजबूत?



**डॉ. अमोल अन्नदाते**

कुठल्याही देशातील लोकशाहीच्या सक्षमतेचे सर्वांत महत्त्वाचे मापक ही त्या देशाची न्यायव्यवस्था असते. आपली लोकशाही सक्षम असल्याच्या आपण कितीही गप्पा मारल्या, तरी न्यायव्यवस्थेत निश्चितपणे न्याय मिळतो किंवा मिळाला तर तो वेळेत मिळतो, याच्याशी सगळेच सहमत असू शकत नाहीत.

याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, स्वातंत्र्याच्या वेळी जी सुधारित न्यायव्यवस्था अमलात आली, ती आज वाढलेली लोकसंख्या आणि गुन्हेगारीच्या तुलनेत अपुरी आहे व ती पुरेशी प्रगतही नाही. आपल्याला निश्चितपणे न्याय मिळू शकतो, ही भावना आणि आत्मविश्वास देशातील प्रत्येक नागरिकाच्या मनात रुजत नाही, तोपर्यंत भारतीय लोकशाही अपूर्ण आहे, असे म्हणावे लागेल.

न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना गुन्हेगारांवर हल्ले होणे, त्यांची हत्या होणे अशा गोष्टी गेल्या काही वर्षांत वाढल्या आहेत. अलीकडे तर सर्वसामान्य जनता आणि नेतेही, गुन्हेगाराला आमच्या ताब्यात द्या, आम्हीच शिक्षा देतो, असे म्हणू लागले आहेत. अशा मागण्या आणि कृत्ये लोकशाहीतील अस्वस्थता दर्शवतात आणि त्या भविष्यातील अराजकाच्या हाका असतात. पण, त्यामागील कारणही तसेच आहे.

गेल्या वर्षी प्रयागराज येथे माजी खासदार असलेला कुख्यात गुंड अतीक अहमद आणि त्याचा भाऊ अश्रफ अहमद या दोघांची पोलिस कोठडीत वैद्यकीय तपासणीसाठी नेत असताना हत्या झाली. त्या अगोदर त्यांची केस वेगवेगळ्या न्यायाधीशांनी ३८ वेळा नॉट बिफोर मी म्हणत दुसऱ्या न्यायाधीशांकडे दिली होती. कायदा हातात घेण्याची प्रक्रिया ही अशी न्यायदानाच्या विलंबातून निर्माण होते.

जगभरातील न्यायदानाच्या स्थितीचा अभ्यास केल्यास, सर्वाधिक प्रलंबित प्रकरणांची संख्या भारतात असल्याचे लक्षात येते. आज भारतात ३० दशलक्ष प्रकरणे न्यायदानाच्या प्रक्रियेत आहेत. त्यातील ४ दशलक्ष खालच्या कोर्टात, तर ६५ हजार प्रकरणे सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहेत.

न्यायदानाच्या या संथ प्रक्रियेमुळे गुन्हे दाखल असणाऱ्यांच्या बाबतीत दोन गोष्टी घडल्या आहेत. सध्या कारागृहांमधील सर्वाधिक कैदी अंडर ट्रायल म्हणजे गुन्हा सिद्ध होऊन शिक्षा होण्याच्या किंवा सुटकेच्या म्हणजेच न्यायदानाच्या प्रतिक्षेत असलेले आहेत. ही संख्या इतकी जास्त आहे की कैदी ठेवण्यासाठी आज कारागृहेच उपलब्ध नाहीत. स्वातंत्र्यानंतर देशात मोठ्या कारागृहांची निर्मिती झालेली नाही.

दुसरीकडे, न्यायदान उशिरा होत असल्याने गुन्हा सिद्ध होऊ न शकलेले आणि जामिनावर सुटलेले गुन्हेगार पुन्हा तेच ते गुन्हे करत असल्याचे दिसते. अनेक श्रीमंत गुन्हेगार नामवंत वकिलांच्या मदतीने मोठ्या गुन्ह्यातूनही सहज सुटत असल्याची अनेक उदाहरणे आपण पाहतो.

पण, वकिलांचा आणि एकूणच न्याय मिळवण्यासाठीचा खर्च न परवडणारे अनेक निर्दोष कारागृहात अनेक वर्षे खितपत पडतात. त्यामुळे न्याय ही अधिकार म्हणून लोकशाहीत मिळणारी नैसर्गिक गोष्ट नव्हे, तर श्रीमंतांना सहज विकत मिळणारी गोष्ट असल्याची धारणा जनतेमध्ये दृढ होत आहे. त्याचवेळी न्यायाधीशांच्या नेमणुका आणि कामातील पारदर्शकता यावरही वेळोवेळी शंका उपस्थित केल्या जात आहेत.

सत्तेतील व्यक्तींनी न्यायव्यवस्थेला प्रभावित करु नये म्हणून लोकशाहीत न्यायालयांची स्वायत्तता टिकवून ठेवण्याची तरतूद करून ठेवली आहे. पण, बऱ्याच प्रकरणांमध्ये सत्तास्थानांकडून झालेल्या चुकांवर अंकुश ठेवण्यास न्यायालये कमी पडत असल्याचे चित्र दिसते.

स्वातंत्र्याच्या आधी या देशावर राज्य करणाऱ्या इंग्रजांनी सहज वाकवता येईल आणि सर्वसामान्य माणसावर सत्तेचा ताबा राहील, अशा न्यायव्यवस्थेची रचना केली होती. त्यामुळे न्यायाधीशांना समाजामध्ये मिसळण्याची संधी नव्हती. बऱ्याच देशांतील न्यायप्रक्रियेत समाजातील लोकांचाच समावेश आहे.

ब्रिटिशकाळापासून सुरू असलेल्या भारतीय न्यायव्यवस्थेत मात्र अशा गोष्टींना स्थान नाही. आज तंत्रज्ञानाच्या नवनवीन साधनांमुळे जग जवळ आले आहे. इंटरनेटवर चालणाऱ्या साधनांमुळे काम साध्य करण्यासाठी प्रत्यक्ष भेटींची गरज जवळपास संपली आहे. न्यायदान मात्र या सर्व साधनांच्या मागे आहे. ह्यफास्ट ट्रॅकह्ण हा शब्द गंभीर गुन्ह्यात वापरला जातो, पण सर्वच प्रकरणासाठी न्यायालये ३६५ दिवस चालतील, या दिशेने आजवर कुठलेही पाऊल उचलण्यात आल्याचे दिसत नाही.

गेल्या दोन दशकात पुढे आलेल्या सायबर आणि आर्थिक गुन्हेगारीच्या प्रकरणांत न्यायदान करताना न्यायव्यवस्था तोकडी पडत असल्याचे दिसते. त्यामुळे असे गुन्हे करणाऱ्यांना कायद्याविषयी भीतीच राहिलेली नाही. कुठलाही देश राहण्यायोग्य आहे की नाही हे ठरवणाऱ्या अनेक घटकांपैकी महत्त्वाचा घटक म्हणजे तिथले न्यायदान होय.

आज सिंगापूरसारख्या छोट्या देशांनीही पारदर्शक, जलद न्यायप्रक्रिया राबवून चांगले उदाहरण घालून दिले आहे. पण, भारतासारख्या मोठ्या लोकशाहीतील न्यायपालिका हा तिचा तिसरा स्तंभ मजबूत नसणे लोकशाहीच्या इमारतीसाठी धोकादायक आहे.

●●●●●●●●●

# अजब बिहार.. गजब परंपरा!

असे म्हणतात की लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधलेल्या- वर संशोधन करा किंवा प्रेम विवाह करा तुमचे सगळे जुळल्या शिवाय लग्न काही होत नाही. सर्व गुण जुळून यावे लागतात. विवाहाच्या जगभर वेगवेगळ्या प्रथा आणि परंपरा आहेत.

विवाहाच्या देखील वेगवेगळ्या परंपरा आहेत. परंतू एका राज्यात मुली पान खावून तिचा भावी साथीदार निवडतात असे सांगितले तर तुम्हाला विश्वास बसणार नाही. बिहारच्या काही भागात अशा प्रकारची प्रथा आहे.

या परंपरेत मुली पान खाऊन आपल्या जीवनाचा साथीदार निवडतात. काय आहे ही विचित्र प्रथा पाहूयातङ्क

खाऊचे पानाला महत्व खूप आहे. मुखशुद्धीसाठी आपल्या येथे नेहमीच पान खाल्ले जायचे. भारतात जेवणानंतर आर्वजून पान खाल्ले जायचे. त्यामुळे जेवण पचन देखील व्हायचे. जर कोणताही मुलगा कोणा मुलीला पान देत असेल आणि तिने ते स्वीकारले तर याचा अर्थ ती मूलगी या मुलाला पसंद करतेय आणि त्याच्याशी लग्न करायला तयार आहे.


या परंपरेत तरुण आणि तरुणींचा मेळावा भरतो. आणि त्यानंतर मुलगा आपल्या आवडत्या मुलीला पान देतो. जी मुलगी त्याचे पान स्वीकारते आणि खाते तिला तो वर पसंद आहे म्हणून त्यांचे लग्न लावून दिले जाते. ही प्रथा अनेक वर्षांपासून सुरु असून आजही सुरु आहे.

ही परंपरा खूप जुनी आहे.आदिवासी समुहाकडून ती पुढे चालत आली आहे. या समुदायात लग्नाच्या प्रथा वेगळ्या आणि विचित्र आहेत. आजच्या काळात विवाह ठरवून न होता लव्ह मॅरेजचे चलन वाढले

## पान खाऊन वधू वराला निवडते



# पोलिस अधिकाऱ्यांनो, सावध व्हा!



**डॉ. भुषणकुमार उपाध्याय**

निष्पक्षपातीपणा हीच कोणत्याही सनदी अधिकाऱ्याची कसोटी असते. एखाद्या राजकीय पक्षाची वा पुढाऱ्याची ओळख घेऊन फिरणारा अधिकारी हा कनिष्ठ कर्मचारी आणि सामान्य जनतेच्या नजरेतूनही उतरतो. त्यातही पोलिस खाते हे अतिशय संवेदनशील आहे. त्यामुळे या मुद्द्यावर व्यापक चर्चा होण्याची आवश्यकता आहे.

अलीकडेच वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीनुसार, सीबीआयने एका प्रकरणात एफआयआर नोंदवलाअसून, त्यामध्ये इतर व्यक्तींबरोबरच पुण्यातील तत्कालीन पोलिस उपायुक्त आणि इतर पोलिस अधिकाऱ्यांना आरोपी दाखवण्यात आले आहे. काही आठवड्यांपूर्वी महाराष्ट्राचे माजी पोलिस महासंचालक असलेल्या एका अधिकाऱ्याविरुद्ध ठाण्यामध्ये फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे.

पुण्यातील अन्य एका पोलिस उपायुक्तांविरुद्धही काही दिवसांपूर्वी गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल होणे काही नवी गोष्ट नाही. पण, गेल्या पाच वर्षांत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध ज्या प्रमाणात गुन्हे दाखल झाले आहेत, ते निश्चितच चिंताजनक आहे.

हे गुन्हे खरे की खोटे, हा तपासाचा आणि न्यायालयाच्या कक्षेतील विषय आहे. पण, या बाबतीत राज्यातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. जवळपास सर्व गुन्ह्यांमध्ये असा आरोप ठेवण्यात आला आहे की, या पोलिस अधिकाऱ्यांनी राजकीय दबावापोटी इतरांविरूद्ध गुन्हे दाखल केले किंवा अशा राजकीय विरोधकाला अडकवण्याचा प्रयत्न वा षडयंत्र केले.

महाराष्ट्र ही छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमी आहे. या राज्याला अत्यंत महान आणि कीर्तिमान परंपरा लाभली आहे. उदात्त संस्कृती, मोठी संतपरंपरा, मोठा त्याग करणारे समाजसुधारक, दूरदृष्टी असलेले राजकीय नेते अशी या राज्याची ख्याती आहे. त्यामुळे देशातील अग्रणी राज्यांमध्ये महाराष्ट्राची गणना होते. मी प्रधान सचिव आणि अप्पर पोलिस महासंचालक (कारागृह) या पदावर कार्यरत असताना अनेकदा राज्याचा प्रतिनिधी म्हणून बैठक किंवा अन्य परिषदांसाठी दिल्लीला जायचो. तेव्हा इतर राज्यांचे अधिकारी बोलत असताना उपस्थित प्रतिनिधी फारसे लक्ष द्यायचे नाहीत. पण, महाराष्ट्राची पाळी यायची त्यावेळी सगळे जण कान देऊन ऐकायचे.

अनेक जण प्रश्नही विचारायचे. हा अनुभव आमचा अभिमान वाढवायचा. चहा-पाणी आणि जेवणाच्या वेळीही अन्य राज्यांतील लोक महाराष्ट्राविषयी चर्चा करायचे. मुंबई पोलिस तर जगात अग्रणी आहे.

पण, मधल्या काळात काही वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध जे गुन्हे दाखल झाले, त्यामुळे महाराष्ट्र पोलिस आणि महाराष्ट्राची खूप बदनामी झाली. हे टाळण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आत्मचिंतन करून राज्याच्या पोलिस दलाची महान परंपरा जपली पाहिजे.

मी ३४ वर्षे महाराष्ट्राच्या पोलिस खात्यामध्ये अनेक महत्त्वाच्या आणि संवेदनशील पदांवर काम केले. लातूर, चंद्रपूर, जळगाव, नागपूर (ग्रामीण) या चार जिल्ह्यांमध्ये १० वर्षे पोलिस अधीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. सोलापूर आणि नागपूरमध्ये पोलिस आयुक्त म्हणून चार वर्षे सेवा बजावली.

या प्रदीर्घ काळात अनेक दिग्गज आणि अत्यंत प्रभावी अशा राजकीय नेत्यांशी संबंध आले. अनेकदा मोठे वादही झाले. पण, विरोधी पक्षांच्या नेत्यांवर, कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करा किंवा पोलिसी खाक्या दाखून त्रास द्या, असा राजकीय दबाव कधी आला नाही. बहुतांश नेत्यांचा सूर आमच्या लोकांना त्रास होऊ नये, असा असायचा. अनेकदा कायद्याच्या पालनासाठी ताठर भूमिकाही घ्यावी लागली, त्यामुळे कालावधी पूर्ण होण्याआधीच बदलीही झाली.

तथापि, महाराष्ट्रातील बहुतांश पोलिस अधिकारी अतिशय प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ होते. आजही अशा अधिकाऱ्यांची कमतरता नाही. पण, बदलत्या परिस्थितीत अनेक अधिकारी चांगल्या पोस्टिंगसाठी काहीही करायला तयार होतात. त्याचा परिणाम म्हणजे काहींच्या बाबतीत असे गुन्हे दाखल होतात. अनेकदा वरिष्ठ अधिकाऱ्यांमुळे कनिष्ठ अधिकारीही भरकटत जातात आणि त्यांच्यावरही गुन्हे दाखल होतात.

आयपीएस अधिकारी उच्चविद्याविभूषित असतात. यूपीएससीसारखी कठीण परीक्षा देऊन ते सेवेत येतात. उच्च दर्जाचे प्रशिक्षण प्राप्त करतात.

संविधानाची शपथ घेऊन सेवेची सुरूवात करतात. तरीही काही अधिकारी राजकीय नेत्यांची मर्जी संपादित करण्यासाठी नीतिमत्ता बाजूला ठेऊन काहीही करायला तयार होतात, ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. याविषयी गांभीयार्ने विचार केला पाहिजे. राजकीय पुढारी आणि वरिष्ठ पोलिस अधिकारी अशा परिस्थितीला सारखेच जबाबदार असतात. पण, शेवटी नुकसान पोलिस अधिकाऱ्यांचेच होते. राजकारणी लोकांचे फारसे काही बिघडत नाही. गुन्हे दाखल झाले तर बदनामी होते, पदोन्नती थांबते आणि एकूणच संपूर्ण सेवाकाळाला गालबोट लागते.

खरे तर, निष्पक्षपातीपणा हीच कोणत्याही सनदी अधिकाऱ्याची कसोटी असते. एखाद्या राजकीय पक्षाची वा पुढाऱ्याची ओळख घेऊन फिरणारा अधिकारी हा कनिष्ठ कर्मचारी आणि सामान्य जनतेच्या नजरेतूनही उतरतो. त्यातही पोलिस खाते अतिशय संवेदनशील असल्याने या मुद्द्यावर व्यापक चर्चा होण्याची आवश्यकता आहे.

कायदा आणि सुव्यवस्था, सामाजिक शांतता - सलोखा, गुन्हे प्रतिबंध, अंतर्गत सुरक्षा आदी खूप महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पोलिस विभागाकडे आहेत. त्यामुळे त्यांची हातळणी करणारे अधिकारीही सचोटीचे असले पाहिजेत. एक प्रामाणिक पोलिस अधिकारीच सक्षमपणे ही जबाबदारी पेलू शकतो.

राजकारणी मंडळी आणि समाजातील अन्य प्रभावशाली घटकांच्या हाताचे बाहुले न होता आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचे पाईक व्हायचे आहे, ही गोष्ट पोलिस अधिकाऱ्यांनी नेहमी लक्षात ठेवली पाहिजे.

**प्रामाणिक अधिकाऱ्यांना हवे पाठबळ**

आपल्याला चुकीचे काम करता येणार नाही, हे नम्रतेने आणि ठामपणे सांगण्याची हिंमत पोलिस अधिकाऱ्यांकडे हवी. लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींना खूप महत्त्व आहे. पण, त्यांचे किती आणि काय ऐकावे, हे पोलिस अधिका?यांना समजले पाहिजे. अशा स्थितीत अतिवरिष्ठ अधिकाऱ्यांनीही कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. असे अनेक करारी वरिष्ठ अधिकारी मी आपल्या सेवाकाळात पाहिलेही आहेत. सध्याच्या काळात मात्र दुर्दैवाने असे होताना दिसत नाही. प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची जाणीव सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जपली पाहिजे. क्षणिक लाभापोटी आपले चरित्र पणाला लावणे अतिशय वाईट आहे.

●●●●●●●●●

# तेरा साहिब है घर माहीं, बाहर नैना क्यों खोले...

**हेमकिरण पत्की**

आपण दिवस-रात्र बोलत असतो. बोलल्याशिवाय कुठं राहवत असतं आपल्याला? कधी सुखाचा अनुभव येतो आणि कुणा दुसऱ्याशी तो आपल्याला वाटून घ्यावा वाटतो, तर कधी दुःखाच्या आघातानं आपलं मन ओझावून जातं. आपण दुसऱ्याशी बोलत राहतो. कधी हा दुसरा आपला मित्र, सहकारी, शेजारी, आप्त, घरातील व्यक्ती किंवा ऐकून घेणारा कुणीही सोशिक माणूस असतो. कधी कधी तर आपलं मन स्वतःशीच बोलत असतं.

आपल्याला शारीरिक, मानसिक पीडा असली की, आपण कुणासमोर तरी बोलून मोकळं होऊ पाहतो. आपलं शरीर, मन, ह्यमीह्णपण अगदी स्वाभाविक स्थितीत असतं, तेव्हा आपल्याला बोलण्याची आवश्यकता भासत नाही, याचं चिंतन आपण कधी करतो का? आपलं बोलणं हे आपणच निर्माण केलेल्या जगाचा एक भाग असतं.

स्वतःशी, इतरांशी बोलणं होत नसताना आपण आपल्या मूळ स्थितीचा अनुभव घेऊ शकतो, याची जाणीव आपल्याला कधी होते का? आपल्या मनात शब्दांच्या येरझारीनं एकसारखी आंदोलनं होत असतात. शब्दांशिवाय आपण असू शकतो, या स्थितीचा बोध आपण असण्याशी समरस झाल्याशिवाय, अकारण आनंदात न्हाल्याशिवाय आपल्याला होईल तरी कसा? असण्याच्या निव्वळ रसधारेत पूर्ण बुडालेले कबीर शुद्ध भावतंद्रेच्या भाषेत आपल्याशी बोलतात, तेव्हा त्यांची स्थितीच बोलकी असते. त्यांच्या मुखातून केवळ या स्थितीचं सूचन *करण्यासाठी शब्द येतात...*

*मन मस्त हुआ तब क्यों बोले,*
*हीरा पायो गांठ गठियायो,*
*बार-बार वाको क्यों खोले।*

कबीर आपल्याशी बोलतात. ते मस्त असताना बोलतात. हे पद म्हणजे त्याचं उदाहरण असतं. कबीरांचं मस्त असणं पूर्ण ईश्वराधीनतेतून जन्मलेलं असतं. त्याला मीपणाचा गंधही नसतो. पंचप्राण जेव्हा केवळ असण्याच्या जाणिवेशी जोडलेले असतात, तेव्हाच ही ह्यमस्तह्ण स्थिती वाट्याला येते. ही स्थिती ना कसली नशा असते ना कशाचा कैफ असते. कबीर म्हणतात, या स्थितीचं वर्णन करायची काय गरज? या स्थितीतला आनंदच पुरेसा असतो.

ईश्वराच्या असण्याविषयी संदेह नसलेल्या सश्रद्ध जीवालाच या आनंदाचा बोध होत असतो. ही स्थिती आपल्या सगळ्यांसाठी कल्पना असते. मात्र, तो कबीरांचा अनुभव असतो. तरीही उमजेल अशा जीवनाशी जोडलेल्या प्रतीकांच्या भाषेतून कबीर हे मस्तपण आपल्यासाठी विशद करतात.

अचानक हिऱ्याचा लाभ व्हावा, अशी ही आनंदाची स्थिती असते. या लाभामुळं हृदय आनंदानं भरून गेल्यावर पुन्हा पुन्हा त्या विषयी संदेहग्रस्त होऊन हृदय चाचपून कशाला बघायचं? चित्तानं निश्चिंत असावं, असं कबीर सांगतात...

*हलकी थी तब चढी तराजू,*
*पूरी भई तब क्यों तोले।*
*सुरत कलारी भई मतवारी,*
*मदवा पी गई बिन तोले।*

पुढच्या प्रतीकांतून आनंदाची स्थिती अधिक गडद करून कबीर सांगतात : साधी वस्तू तराजूनं मापून घ्यायची असेल, तर त्याला एका पारड्यात माप आणि दुसरीत वस्तू ठेऊन मापावं लागतं. वस्तूचं पारडं जड होऊन खाली गेलं, तर माप व्यवस्थित असतं. पण, जीवाला मस्त करणारा अनुभव असा तराजूनं तोलण्यासारखा नसतो.

कारण ही वस्तू पारड्यात ठेवली की पारडं जमिनीला टेकतं. अमाप असतो हा मस्त असण्याचा आनंद! त्याची कशाशीच तुलना होऊ शकत नाही. कबीर म्हणतात, एखाद्या मधुशालेत मस्तीचा आनंद घेतलेल्या मद्यपींनी अवघी मधुशालाच पिऊन टाकावी तसा हा अनुभव असतो.

पण, हा अनुभव पदार्थाच्या सेवनावर आधारलेल्या नशेसारखा नसतो. हे आपण समजून घ्यायचं असतं. कबीर प्रतीकांची माळ तयार करत हा मस्त असण्याचा अवर्णनीय आनंद आपल्यापर्यंत पोहचवू पाहतात.

*हंसा पाए मानसरोवर,*
*ताल-तलैया क्यों डोले।*

एकदा जीवाला न कोमेजणाऱ्या मस्त असण्याचा अनुभव आल्यावर तो कशाला क्षुद्र सुखामागं धावेल? त्यात गुंतून पडेल? तो कशाला काही वेळानंतर उतरणाऱ्या नशेचा आधार घेईल? मस्त असण्याचा अनुभव आल्यावर सुख-दुःखाचं द्वंद्व विरून जातं, क्षुद्रतेचं आकर्षण नाहीसं होतं. सुख-दुःखाची आंदोलनं सांगण्यासाठी कुणा दुसऱ्याच्या उपस्थितीची गरज वाटत नाही. एकांताच्या वलयरहित सरोवरात हा प्राणाचा हंसपक्षी मस्त विहरत असतो...

*तेरा साहिब है घर माहीं,*
*बाहर नैना क्यों खोले।*
*कहै कबीर सुनो भाई साधो,*
*साहिब मिल गए तिल ओले।*

आपल्या बोलण्यात कुणी दुसरा अध्याहृत असतो. बोलणं बाहेरच्या जगाशी असलेल्या संपर्कातून घडतं. याचाच अर्थ आपण बहिःर्मुख असतो. केवळ इंद्रियांच्या आधारानं जगणं अनुभवत असतो. पण, आपल्या असण्याचा शुद्ध आनंद आपण बाहेरच्या जगात घेऊ पाहतो, तेव्हा गफलत होते.

कशावरही अवलंबून नसलेला, शब्दांतून व्यक्त करण्याची गरज नसलेला हा नुसतं असण्याचा आनंद कबीरांच्या मते ईश्वरस्वरूप असतो. हाच हृदयाच्या घरात निरंतर वास करणारा साहिब असतो. त्याला पाहण्यासाठी डोळे उघडून बाहेर पाहण्याची गरजच काय?

स्वतःला आलेला हा मस्त असण्याचा अनुभव कबीर म्हणतात की केवळ दृष्टी निरंजन असल्यानेच येतो. तिळाएवढाही दर्शन झाल्याचा अहंकार दृष्टीत नसतो, तेव्हाच आपल्या हृदयातील साहिब इंद्रियांशिवाय जाणवतो. कबीरांच्या दृष्टीनं हेच मस्त असणं असतं. सुख-दुःखांच्या आंदोलनांनी सतत विचलित होणाऱ्या आपल्यासाठी हा मस्तीत जगण्याचा कबीरांचा बोध आपल्याला अहंकारापलीकडं घेऊन जाणारा, निखळ आनंदाचा होऊ शकतो.

●●●●●●●●●

# 'ब्रिजेश मिश्रा' एक द्रष्टा मुत्सद्दी



जागतिक राजकारणाच्या इतिहासात १९९१ हे अत्यंत महत्त्वाचे वर्ष मानले जाते. या काळात घडलेल्या जागतिक राजकारणाचा सर्वच देशांवर दूरगामी परिणाम झाला. पण, भारतावर झालेला परिणाम हा मूलभूत होता. सोव्हिएत महासंघाच्या विघटनामुळे जागतिक राजकारणात भारत एकाकी पडला होता.

अमेरिका ही एकमेव महासत्ता राहिल्याने त्या देशाच्या वर्चस्वाखालील राजकीय व्यवस्थेत स्वतःला सामावून घेणे, हेदेखील भारतीय परराष्ट्र धोरणासमोरचे आव्हान होते. देशांतर्गत राजकारणातही बदलाचे खूप मोठे वारे वाहू लागले होते. राजकीय पातळीवर आघाड्यांचे राजकारण सुरू झाले होते. त्यातून राजकीय अनिश्चिततेची स्थिती निर्माण झाली. दुसरीकडे, आर्थिक संकटामुळे भारताला जागतिकीकरणाचा मार्ग अवलंबावा लागला होता.

या स्थितीला भारत सामोरे जात असतानाच सुरक्षेच्या संकल्पनेतही आमूलाग्र बदल झाले. कारगिल युद्ध, पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद यामुळे भारताच्या अंतर्गत आणि बाह्यसुरक्षेचे प्रश्न अधिक गंभीर होत चालले होते. परिणामी भारताची राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरण यामध्ये संकल्पनात्मक बदलांची गरज होती, जेणेकरून जागतिक राजकारणातील नव्या प्रवाहांना भारत आत्मविश्वासाने सामोरे जाऊ शकेल. हा आत्मविश्वास निर्माण करणाऱ्यांमध्ये तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे प्रधान सचिव आणि भारताचे पहिले राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार ब्रिजेश मिश्रा यांचे महत्त्वाचे योगदान होते.

अणुचाचणी हा भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत कळीचा मुद्दा होता. चीनची अण्वस्त्र क्षमता ही चिंतेची बाब होतीच, पण चीनकडून पाकिस्तानला अण्वस्त्रसज्ज बनवण्यासाठी सुरू असलेली मदत अधिक गंभीर होती. अण्वस्त्र प्रसारबंदीच्या नावाखाली अमेरिकेने भारतावर अणुचाचणी न करण्यासाठी १९६८ पासूनच दडपण ठेवले होते.

या पार्श्वभूमीवर मिश्रा यांनी अणुचाचणीचा आक्रमकपणे पुरस्कार केला. त्यांच्याच आग्रहामुळे तत्कालीन राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या निवडणूक जाहीरनाम्यात अण्वस्त्र धोरणाचा समावेश करण्यात आला. भारताने केलेली अणुचाचणी ही भारतीय जनतेची इच्छा आहे आणि तो भारताचा सार्वभौम निर्णय आहे, हे जागतिक समुदायावर बिंबवण्याचा यशस्वी प्रयत्न मिश्रा यांनी केला.

वाजपेयींच्या नेतृत्वाखाली झालेली अणुचाचणी हे मिश्रांच्या दूरदृष्टीचे यश होते. या चाचणीनंतर भारतावर जणू जागतिक बहिष्कार घातला गेला. अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, जपान यांसारख्या देशांनी आवश्यकतेपेक्षा जास्त भारतविरोधी पवित्रा घेतला. अशा बिकट काळात प्रमुख देशांसोबतच्या संबंधांची पुनर्बांधणी करण्यात मिश्रांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी राजनयिक कौशल्याचा खुबीने वापर करत भारताला या संकटातून बाहेर काढण्यात यश मिळवले.

पंतप्रधान वाजपेयी यांच्याशी असलेल्या विश्वासाच्या संबंधांचा वापर करत मिश्रा यांनी सक्षमपणे परिस्थिती हाताळली. राजकीय नेते आणि राजनयिक अधिकारी यांचे संबंध कसे असावेत, याचा वस्तुपाठच त्यांनी घालून दिला, असे म्हणता येईल.


अणुचाचणीनंतर मिश्रा यांनी दिलेले दुसरे महत्त्वाचे योगदान म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाची स्थापना. राष्ट्रीय सुरक्षा हा प्रामुख्याने सरकारकेंद्रित विषय होता. मिश्रांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळाद्वारे त्याची व्याप्ती वाढवण्याचा प्रयत्न केला. या नव्या रचनेमध्ये परराष्ट्र धोरण, गुप्तचर आणि सुरक्षा, अण्वस्त्र धोरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान, अर्थशास्त्र आदी क्षेत्रांतील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला. शासनाच्या बाहेर असलेल्या तज्ज्ञांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा राष्ट्रीय सुरक्षेसारख्या विषयावर घेता येईल, अशी मिश्रा यांची त्या मागील धारणा होती. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हे क्रांतिकारी पाऊल होते. भारताचे पहिले राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून मिश्रा यांनी जबाबदारी सांभाळली.

●●●●●

महासागर

# ग्लॅम वर्ल्ड

रविवार ■ दि. २९ ऑगस्ट २०२४





## अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार

# बीग बीची नात

बॉलिवूडमधलं प्रख्यात सेलिब्रिटी कुटुंब बच्चन फॅमिली हे बरंच चर्चेत आहे. अभिषेक-ऐश्वर्या यांच्यातीव बेबनावामुळे कुटुंबात सगळं काही आलबेल नसल्याच्या अफवा उठत आहेत. याचदरम्यान अमिताभ यांच्या नातीने एक महत्वाचं वक्तव्य केलं आहे.

नव्या नवेली नंदा ही अमिताभ बच्चन यांची नात आणि श्वेता बच्चन यांची मुलगी आहे. शोबिझचा भाग नसतानाही, नव्याचा मोठा चाहतावर्ग आहे आणि तिचे पॉडकास्ट व्हॉट द हेल नव्या? याचे दोन्ही सीझन सुपरहिट ठरले. नव्या तिच्या वडिलांच्या निखिल नंदा यांच्या पावलावर पाऊल ठेऊन चालत आहे. तिने फॅमिली बिझनेसमध्ये काम करण्यास सुरूवात केली आहे. एवढंच नव्हे तर नव्याने नुकतीत आयआयएम अहमदाबादमध्ये एमबीसाठी प्रवेश घेतला . या सर्वांदरम्यान तिचा एक इंटरव्ह्यू समोर आला असून कुटुंबातील इतर सदस्यांप्रमाणे ती देखील मनोरंजन सृष्टीत येणार का, ॲक्टिंग करणार का? याबद्दल खुलासा केला आहे. नुकत्याच एका कार्यक्रमात ती सहभागी झाली होती, तेव्हा तिने ॲक्टिंग करिअरबद्दल मोठा खुलासा केला. मला अभिनय करण्यात, ॲक्टिंग करण्यात काहीच रस नाही, असे तिने स्पष्ट केले. हा पूर्णपणे माझा स्वतःचा निर्णय आहे, असेही नव्याने सांगितलं.

नव्याचा भाऊ अगस्त्य नंदा पासून ते तिचे आजी आजोबा , अमिताभ, जया बच्चन, तिचा मामा अभिषेक, मामी ऐश्वर्या राय बच्चन हे सर्वजण मनोरंजन उद्योगात सक्रिय आहेत. नवीन म्हणाली, मी कोणत्याही पार्श्वभूमीतून आलेली असली तरी मला हे करायचे होते. आज वास्तवात मला जी संधि मिळाली त्यासाठी मी कृतज्ञ आहे. भारतातील अनेक लोकांसाठी ही रिॲलिटी नाही. पण मला कधीच अभिनय करायचा नवह्ता, त्यात नाही असं तिने सांगितलं.

**आयआयएम प्रवेशानंतर ट्रोलिंगचा कसा केला सामना?**

काही दिवसांपूर्वीच तिने IIM अहमदाबादमध्ये प्रवेश मिळाल्याची आनंदाची बातमी सोशल मीडियाद्वारे शेअर केली होती, पण यावरून काहींनी तिला ट्रोलसुद्धा केलं होतं. त्यावरही तिला प्रश्न विचारण्यात आला. लोकं जे बोलतात, त्याबद्दल मी वाईट वाटून घेत नाही. लोकांचा फीडबॅक काय मिळतो, ते पाहणं, स्वीकार करणं माझ्यासाठी महत्वाचं आहे. त्यामुळे मी एक चांगली माणूस, चांगली उद्योजिका आणि एका चांगली भारतीय बनू शकते.

लोकांच्या फीडबॅककडे योग्य दृष्टीकोनातून पाहणं खूप गरजेचं आहे, असंही ती म्हणाली. लोकांच्या प्रतिक्रियांचा मी सकारात्मकपणे विचार केला तर माज्यात आणि माझ्या कामात चांगले बदल घडू शकतील. त्यामुळे लोक नकारात्मकतेने काही बोलत असतील तरी त्याबद्दल फार विचार न करता स्वतःत काय बदल घडवता येतील हे मी पाहते, असं नव्याने नमूद केलं.

■ ■ ■



# उर्वशीने केली अर्जुन आणि आदित्य रॉय कपूरची पोलखोल

अभिनेत्री उर्वशी रौतेला हे कायमचच चर्चेत असणारे नाव आहे. फक्त अभिनयच नाही तर उर्वशी रौतेला ही तिच्या खासगी आयुष्यामुळेही चर्चेत असते. सोशल मीडियावर चांगलीच सक्रिय उर्वशी रौतेला दिसते.

उर्वशीचा चाहतावर्गही अत्यंत मोठा आहे. आपल्या चाहत्यांसाठी खास फोटो आणि व्हिडीओ शेअर करताना उर्वशी रौतेला दिसते. उर्वशी रौतेला हिने काही दिवसांपूर्वीच 24 कॅरेट सोन्याचा ड्रेस घातला. या ड्रेसमधील उर्वशी रौतेलाचे फोटो आणि व्हिडीओ हे सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसले. वाढदिवसाला देखील उर्वशी रौतेलाने सोन्यापासून तयार केलेला केक कट केला होता.

नुकतीच उर्वशी रौतेला हिने एक मुलाखत दिली. या मुलाखतीमध्येही काही मोठे खुलासे करताना उर्वशी रौतेला दिसली. उर्वशी रौतेला म्हणाली की, होय मी डेटिंग ॲप रायावर आहे. मी फक्त आणि फक्त माझ्या मित्रांसाठी त्या ॲपवर आहे बाकी दुसरा कोणताही माझा उद्देश नाहीये.

मीच काय तर ऋतिक हा देखील रायावर आहे. मी या ॲपवर आदित्य रॉय कपूरलाही पाहिले आहे. अनेक मोठे कलाकार देखील या डेटिंग ॲपवर आहेत. या डेटिंग ॲपबद्दल अनेक मोठे खुलासे करताना देखील उर्वशी रौतेला ही दिसली. मलायका अरोरा हिच्यासोबत ब्रेकअप झाल्यापासून अर्जुन कपूर हा डेटिंग ॲपवर सक्रिय झाल्याचे सांगितले जातं. हेच नाही तर अनन्या पांडे आणि आदित्य रॉय कपूर यांच्याही ब्रेकअपच्या सतत चर्चा या सुरू आहेत आणि त्यामध्ये आता डेटिंग ॲपवर आदित्यचे देखील प्रोफाईल दिसत आहे.

गेल्या काही दिवसांपासून सतत मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांच्या ब्रेकअपच्या चर्चा या रंगताना दिसत आहेत. मात्र, आपल्या ब्रेकअपवर त्यांनी काहीच भाष्य केले नाही. फक्त हेच नाही तर मलायकाच्या वडिलांचे निधन झाल्यानंतर अर्जुन कपूर हा मलायकासोबतच दिसला. अनन्या पांडे आणि आदित्य यांनीही त्यांच्या ब्रेकअपवर भाष्य केले नाही.

■ ■ ■



## चार लेकरांचा बाप आहे सैफ अली खान

सैफ अली खान हे कायमच चर्चेत असणारे एक नाव आहे. सैफ अली खानची जबरदस्त अशी फॅन फॉलोइंग बघायला मिळते. 2012 मध्ये सैफ अली खान याने करीना कपूर हिच्यासोबत लग्न केले. सैफ अली खान याचे खासगी जीवन कायमच चर्चेत राहिलेले आहे. सारा अली खान आणि इब्राहिम अली खान हे सैफ अली खान आणि अमृता सिंह यांचे मुले आहेत.

सैफ अली खान याचे खासगी जीवन कायमच चर्चेत राहिलेले आहे. सारा अली खान आणि इब्राहिम अली खान हे सैफ अली खान आणि अमृता सिंह यांचे मुले आहेत. तैमूर आणि जेह हे करीना कपूर आणि सैफ अली खानची मुले आहेत. सैफबद्दल अत्यंत मोठा खुलासा करीना कपूर खान हिने केला आहे.

आपल्या चारही मुलांना कशाप्रकारे सैफ वेळ देतो. करीना कपूर म्हणाली की, सैफ सारासोबत खास वेळ घालतो तिच्यासोबत चिल करतो. कारण त्याला त्याच्या चारही मुलांना वेळ द्यायचा असतो आणि त्याने द्यायला हवा. करीना कपूर म्हणाली की, सैफ सारासोबत खास वेळ घालतो तिच्यासोबत चिल करतो. कारण त्याला त्याच्या चारही मुलांना वेळ द्यायचा असतो आणि त्याने द्यायला हवा. याबद्दल इतर लोकांसारखे माझे विचार अजिबातच नाहीत. तो त्याच्या मुलांसोबत बाहेर फिरायला देखील जातो. काही दिवसांपूर्वीच सारा अली खान ही करीनाच्या घरी आपल्या भावांना राखी बांधण्यासाठी पोहोचली होती.

■ ■ ■



# पॉर्न अभिनेत्री रिया बर्डे चक्क बांगलादेशी निघाली



भारतीय पॉर्न इंडस्ट्रीत आरोही बर्डे आणि बन्ना शेख या नावांनी प्रसिद्ध असलेली पॉर्न अभिनेत्री रिया बर्डे हिला गुरुवारी अटक करण्यात आली. ती बांगलादेशी असल्याचे पुरावे पोलिसांना मिळाले आहेत. वृत्तांवर विश्वास ठेवला तर रिया बर्डे ही मूळची बांगलादेशची असून ती बनावट कागदपत्रे बनवून संपूर्ण कुटुंबासह भारतात राहिली होती. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर तिला ठाणे, मुंबई येथून अटक करण्यात आली.

हिल लाइन पोलिसांनी रिया बर्डे आणि तिच्या कुटुंबाविरुद्ध भादंवि कलम ४२०, ४६५, ४६८, ४७९, ३४ आणि १४ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. रिया बर्डे ही बांगलादेशी असल्याचा आरोप होत आहे. तिच्याकडे बनावट भारतीय पासपोर्टही सापडला आहे. याशिवाय तिच्या घरातील संपूर्ण कुटुंबाची कागदपत्रेही बनावट आहेत.

या प्रकरणाचा तपास करत असलेले उपनिरीक्षक संग्राम मालकर यांनी रिया बडेर्ची आई बांगलादेशी असल्याचे माध्यमांना सांगितले आहे. आपल्या दोन मुली आणि मुलासह ती बेकायदेशीरपणे भारतात आली आणि इथेच स्थायिक झाली. काही वर्षांपूर्वी तिने अमरावती येथील एका व्यक्तीशी लग्न केले असून, ती पश्चिम बंगालची आहे. नंतर त्याच्या मदतीने तिने स्वतःसाठी आणि मुलांसाठी बनवलेले बनावट कागदपत्रे मिळवून दिली. स्वतःला भारतीय असल्याचे सिद्ध करण्यासाठी त्याच्याकडे जन्म प्रमाणपत्रापासून पासपोर्टपर्यंतची अनेक बनावट कागदपत्रे आहेत.

रियाशिवाय तिची आई अंजली बर्डे (रुबी शेख), वडील अरविंद बर्डे, भाऊ रवींद्र बर्डे (रियाज शेख) आणि बहीण रितू (मोनी शेख) यांचीही नावे तक्रारीत नमूद आहेत. रियाचे आई-वडील सध्या कतारमध्ये आहेत, तर तिच्या भावंडांचा शोध सुरू आहे.

बनावट पासपोर्ट प्रकरणापूर्वी रिया बर्डे हिलाही वेश्याव्यवसाय प्रकरणी अटक करण्यात आली होती. रिया बर्डे हे पॉर्न इंडस्ट्रीतील एक प्रसिद्ध नाव आहे. ती अनेक प्रोडक्शन हाऊसशी संबंधित आहे, जे पॉर्न कंटेंट तयार करतात. रिया बर्डे उल्लू ?प आणि अनेक पॉर्न वेबसाइटसाठी काम करते.

■ ■




# स्वत:ला रोखू शकला नाही हृतिक रोशन

हृतिक रोशन याची गर्लफ्रेंड आणि अभिनेत्री सबा आझाद हे कायमच चर्चेत असणारे एक नाव आहे. हृतिक रोशन आणि सबा आझाद लग्न करणार असल्याचे सातत्याने सांगितले जाते. आता नुकतेच सबा आझाद हिने अत्यंत खास असे फोटोशूट केले. अत्यंत बोल्ड लूक सबाचा बघायला मिळतोय.

सबा आझादने लाल रंगाच्या डीपनेक गाऊनवर हे फोटोशूट केले. सबा आझाद हिच्या या फोटोवर चाहते हे मोठ्या प्रमाणात कमेंट करताना दिसत आहेत. हेच नाही तर सबाच्या फोटोवर हृतिक रोशन यानेही कमेंट केली. 'वाह' अशी कमेंट हृतिक रोशन याने सबाच्या फोटोवर केलीये. गेल्या काही दिवसांपासून सतत चचेर्चा आहे की, हृतिक रोशन आणि सबाचे ब्रेकअप झाले. सबा आझाद हिने काही दिवसांपूर्वीच थेट म्हटले होते की, हृतिक रोशन याच्यासोबत रिलेशनमध्ये असल्याने मला काम मिळत नाहीये. लोक माझ्याकडे काम घेऊन येत नाहीत.

■ ■ ■

## 'विकी विद्या का वो वाला व्हिडिओ'वरून वाद




लेखक-दिग्दर्शक राज शांडिल्य यांचा 'विकी विद्या का वो वाला व्हिडिओ' हा चित्रपट वादात सापडला आहे. निमार्ता संजय तिवारी यांनी राज शांडिल्य यांच्यावर कथा चोरीचा आरोप केला आहे.

राज शांडिल्य यांच्या 'विकी विद्या का वो वाला व्हिडिओ' या चित्रपटाची कथा त्यांच्या चित्रपटाच्या कथेसारखीच असल्याचे संजय तिवारी सांगतात. तिवारी सांगतात की, त्यांच्या चित्रपटाची कथा गुलबानू खान यांनी लिहिली आहे. 2015 मध्ये, 'सेक्स है तो लाइफ है' या तात्पुरत्या शीर्षकासह चित्रपट लेखक संघात या कथेची नोंदणी झाली.

संजय तिवारी म्हणाले, या विषयावर 2017-2018 मध्ये चित्रपट बनवण्याचा माझा विचार होता. 'सेक्स है तो लाइफ है' या चित्रपटाचे शीर्षक 2018 मध्ये वेस्टर्न इंडिया फिल्म प्रोड्युसर्स असोसिएशन मध्ये नोंदणीकृत होते. पण काही वैयक्तिक कारणांमुळे चित्रपट सुरू होण्यास विलंब झाला, त्यानंतर कोविड सुरू झाला.

जेव्हा आम्ही 'विकी विद्या का वो वाला व्हिडिओ'चा ट्रेलर पाहिला तेव्हा आम्हाला वाटले की ही आमच्या चित्रपटाची कथा आहे. आम्ही 2 दिवसांपूर्वी चित्रपटाच्या निर्मात्यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे. टी-सीरीजचे उत्तर नुकतेच आले आहे. ही त्यांची मूळ संकल्पना असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. राज शांडिल्य यांचे उत्तर येणे बाकी आहे.

याप्रकरणी चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक राज शांडिल्य म्हणाले, जर कोणाला वाटत असेल की चित्रपटाची कथा त्याच्या चित्रपटाशी जुळते तर बोला. ट्रेलर पाहिल्यानंतर त्यांच्या मनात काही प्रश्न आला तर विचारा कथा काय आहे? आम्ही प्रतिसाद न दिल्यास मीडियामध्ये तुमचे मत व्यक्त करा. पण अशा लोकांचं काम नाव झळकावणे आहे.

'विकी विद्या का वो वाला व्हिडिओ' चित्रपटाची निर्मितीही राज शांडिल्य यांनी टी-सीरीज, बालाजी टेलिफिल्म्स आणि वाकाऊ फिल्म्ससोबत केली आहे. या चित्रपटात राजकुमार राव, तृप्ती डिमरी, मल्लिका शेरावत यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

■ ■ ■

# ताजेपणा नसलेला ताजा खबर 2

यूट्यूबर भुवन बामची वेब सिरीज 'ताजा खबर सीझन 2' आजपासून डिस्ने प्लस हॉटस्टारवर प्रसारित होत आहे. भुवन बाम व्यतिरिक्त यात श्रिया पिळगावकर, जावेद जाफरी, देवेन भोजानी, नित्या माथूर, प्रथमेश परब, महेश मांजरेकर या कलाकारांनी काम केले आहे.

स्वच्छता कर्मचारी अचानक श्रीमंत कसा होतो हे पहिल्या सीझनने दाखवले. पण कष्ट न करता कमावलेला पैसा आणि सत्ता याचेही दुष्परिणाम होतात. वसंत गावडे (भुवन बाम) याला गरिबांमध्ये पैसे वाटून पाप कमी करायचे आहे. पण काही पापे फक्त रक्त सांडल्यानेच कमी होतात. वास्याची हत्या झाली आहे. पण युसूफ अख्तर (जावेद जाफरी) याला कळते की वास्याची हत्या झालेली नाही. त्याच्या खुनाचे नाट्य त्यानेच रचले. तो वास्याला शोधतो आणि त्याला 2 आठवड्यात 500 कोटी रुपये देण्यास सांगतो.

वास्याचे लव्ह लाईफही चढ-उतारातून जाते. त्याची मैत्रीण मधु (श्रिया पिळगावकर), जिवलग मित्र पीटर (प्रथमेश परब), बेकरी मालक मेहबूब भाई (देवेन भोजानी) त्याला 500 कोटी रुपये परत करण्यात कशी मदत करतात. आणि या काळात कोणते त्रास होतात? मालिकेची कथा याच अवतीभवती फिरते.

'ताजा खबर सीझन 2'ची कथा प्रामुख्याने वसंत गावडे ऊर्फ वास्या आणि युसूफ अख्तर यांच्या पात्रांभोवती फिरते. युसूफ अख्तरच्या व्यक्तिरेखेत जावेद जाफरी यांनी प्राण फुंकले आहेत. भुवन बाम यानेही आपल्या व्यक्तिरेखेला पूर्ण न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. पण जाफरीसमोर भुवन जरा कमजोर दिसत होता. किस्मत भाईच्या भूमिकेतील महेश मांजरेकर यांची व्यक्तिरेखा कॅमिओशिवाय काही नाही असे दिसते. देवेन भोजानी मेहबूब भाईच्या भूमिकेत टिकला नाही. देवेन भोजानीसारख्या दिग्गज अभिनेत्याकडून दिग्दर्शकाला काम नीट करून घेता आले नाही. पीटरच्या भूमिकेत प्रथमेश परब मध्येच कॉमेडीचा टच देत राहतो. पण त्याचे पात्रही पूर्णपणे उमटले नाही.

वास्या आणि त्याचे वरदान यांच्यातील चमत्कार आणि जादू या मालिकेचे दिग्दर्शक हिमांक गौर यांनी अशा प्रकारे मांडले आहे. जे जुळत नाही. या मालिकेची संपूर्ण कथा कॉकटेलसारखी आहे. मालिकेची कथा पूर्णपणे काल्पनिक किंवा वास्तवाच्या जवळपासही वाटत नाही. यामुळेच या मालिकेतील इतर पात्रे आपला प्रभाव सोडत नाहीत.

या मालिकेत 6 गाणी असली तरी 'होके मजबूर' आणि 'पैसा' व्यतिरिक्त असे एकही गाणे नाही जे लक्षात राहिल. पार्श्वसंगीत सामान्य आहे. ताजा खबरमध्ये कथेच्या नावात ताजेपणा नाही. तरीही, भुवन बामचे चाहते असाल तर तुम्ही ही सिरीज एकदा पाहू शकता.

■ ■ ■